मूल्य ३० रु. / पृष्ठे १०४ / मे २०१९ / वर्ष १२ वे / अंक ५

# राष्ट्रवादी

स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!



## अनुक्रमणिका


**6**
संपादकीय
बुद्धपौर्णिमेचा संदेश




**10**
दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा
शरद पवार



**16**
वाट संसाराची बिकट
अभय टिळक



**28**
कोयना व टाटाचे पाणी वास्तव काय?
डॉ. सुधीर भोंगळे




**42**
आत्मघात श्रीलंकेत, धोका भारताला!
अरविंद गोखले



**50**
मतांसाठी आगतिक धडपड व सुटलेला तोल!
आकाश




**58**
चला अणुबॉम्ब टाकू या?
तथागत



**66**
चव्हाटा
(हलके-फुलके राजकीय किस्से)
घंटाकर्ण ९०



**74**
निसर्गाचा श्रीमंत प्रवास
(कमल मोरारका यांच्या छायाचित्रांसंबंधी)
डॉ. सुधीर भोंगळे



**90**
महाराष्ट्रातील अवर्षणग्रस्त भागात घडलेला प्रवास
डॉ. दि. मा. मोरे



**98**
'युगार्त'मध्ये ज्योतिबा-सावित्रीबाई यांचे साहित्यिक योगदान
शरद पवार



**102**
शेवटचे पान-
कलेशी प्रामाणिक अवलिया
हेमन्त टकले



**4** सुरुवातीचे
मनापासून आभार! - जयंत पाटील

**5** प्रबंध संपादकीय
एकतेची स्थापना- दिलीप वळसे पाटील



संचालक
हेमन्त टकले

प्रबंध संपादक
दिलीप वळसे पाटील

संपादक
डॉ. सुधीर भोंगळे

या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.

संपादकीय पत्रव्यवहार
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४०० ०३८
०२२-३०२३५५३०/५५/५६

कला निर्देशन
धनंजय सस्तकर

सजावट व मांडणी
दिलीप रोडे

छायाचित्रे
प्रशांत चव्हाण

वर्गणीचे दर-
वार्षिक रु. ५००/-

वर्गणीचा धनादेश
'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'
या नावाने काढावा.

www.ncp.org.in
यावर मासिक उपलब्ध

मुद्रक, प्रकाशक
हेमन्त प्रभाकर टकले यांनी
'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.'
च्या वतीने
मीडिया आर ॲण्ड डी.,
१३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३,
सेक्टर-३,आरएससी-२८, चारकोप,
कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७
येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा
मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट,
मुंबई-४०००२० येथून
अंक प्रकाशित केले.

संपादक-
डॉ. सुधीर जगन्नाथ भोंगळे


# मनापासून आभार

आपण सारेजण गेले दोन महिने लोकसभा निवडणुकीच्या कामात गुंतलेले होतो. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शेकाप, रिपब्लिकन पक्ष (गवई व कवाडे गट), स्वाभिमानी शेतकरी पक्ष व समविचारी पक्षांच्या कार्यकर्त्यांनी मोठी मेहनत करुन एकजुटीने व एकदिलाने निवडणुकीत काम करण्याचा प्रयत्न केला व पक्षाने दिलेल्या उमेदवारांचा प्रामाणिकपणे व निष्ठेने प्रचार केला त्याबद्दल सर्व पक्षांच्या कार्यकर्त्यांचे मी प्रदेशाध्यक्ष या नात्याने मनापासून व अंतःकरणपूर्वक आभार मानतो. आभार याचा मूळ अर्थ मधाळ आहे. ज्याने आसमंतातल्या कर्तृत्त्वाने आपल्यावर जो भार टाकला, त्याच्याबद्दलची उत्कट भव्य कृतज्ञता म्हणजे आभार. आ म्हणजे संपूर्ण नि भार म्हणजे अलौकिकत्व. जो मनापासून आदर व्यक्त करावासा वाटतो; त्याची शब्दफुले म्हणजे आभार. आभारातले शब्द मुके होतात. म्हणून आपण हात जोडून मनातली भावना व्यक्त करतो. सगळ्या भावना शब्दातून व्यक्त करता येत नाहीत. ज्या कार्यकर्त्यांनी अहोरात्र तन, मन, धनाने अंग झाडून काम केले आहे व रात्रीचा दिवस करुन आपल्या उमेदवाराचे नाव, निशाणी, त्याचे कर्तृत्व, भावी कार्यक्रम व पक्षाची ध्येयधोरणे तळागाळातील शेवटच्या माणसापर्यंत व घरोघरी पोहोचविण्याचा सचोटीने प्रयत्न केला आहे त्यांचे आभार कोणत्या शब्दांत मानू? त्यासाठी पुरेसे समर्पक शब्द माझ्याकडे नाहीत. म्हणून अत्यंत विनम्र भावे मी आपल्यापुढे हात जोडतो. संत ज्ञानदेवांनी आभार किती सुंदर शब्दातून व्यक्त केले आहेत पाहा –

**“भरोनि सद्‌भावाची अंजुळी ।**
**मियां वोवियां फुले मोकळी ।**
**अर्पिली अंध्रिपद युगुली ।**
**विश्वरूपाच्या ॥”**

याला म्हणतात आभार !

आपले बहुतांश कार्यकर्ते आभारासाठी काम करीत नाहीत याची मला जाणीव आहे. बूथ बांधणीचा जो कार्यक्रम आपण हाती घेतला त्याला कार्यकर्त्यांनी उत्तम प्रतिसाद दिला. त्यामुळे पक्ष बांधणीही थोडीफार होऊ शकली. परंतु अजून पूर्ण पक्की बांधणी बाकी आहे आणि ती विधानसभा निवडणुकीपूर्वी करायची आहे. ऑक्टोबर महिन्यात महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका होतील. 23 मे रोजी लोकसभा निवडणुकांचा निकाल लागणार आहे. लोकसभा निवडणुकीनंतर जवळपास एक महिना कार्यकर्त्यांना विश्रांती मिळालेली आहे. लोकसभा निवडणुकीचा निकाल आपल्या सगळ्यांच्या दृष्टीने समाधानकारक असणार आहे. मागच्या वेळेपेक्षा अधिक जागा आपण यावेळी जिंकणार आहोत. पण तेवढ्यावर समाधान मानून जमणार नाही. महाराष्ट्राच्या सत्तेतून शिवसेना-भाजपसारख्या धर्मांध व जातीयवादी पक्षांना घालवायचे आहे. यासाठी मोठी प्रयत्नांची पराकाष्ठा एकजुटीने, एकदिलाने, खांद्याला खांदा लावून विश्वासाने करावी लागेल. या विधानसभा निवडणुकीतही आपली काँग्रेस व इतर समविचारी पक्षांशी व धर्मनिरपेक्ष शक्तींशी एकजुट असेल, आघाडी असेल. आपण कार्यकर्त्यांनी आपसातले सर्व मतभेद, भांडणे, तंटे, मानमरातब, जुन्या दुश्मनी, गट-तट, जातपात, धर्म, संप्रदाय, उच्च-नीच सारे काही विसरुन आपल्याला भाजप-सेनेला सत्तेतून घालवून पुन्हा सत्तेवर यायचे आहे एवढे एकच लक्ष्य ठेवून काम करावे लागेल. अर्जुनाला जसा फक्त पोपटाचा एक डोळाच दिसत होता तसा आपल्याला नेम लावता आला पाहिजे. यासाठी जून महिन्यापासून पुन्हा ‘घड्याळ’ हातावर बांधून दिवसरात्र काम करावे लागेल. फक्त चार महिने प्रचारासाठी व प्रत्येक माणसापर्यंत पोहोचण्यासाठी हाती असणार आहेत. चार महिने बघता बघता जातील. गाफील राहू नका. रात्र वैऱ्याची आहे !



## सुरुवातीचे



राष्ट्रवादी स्वाभिमानी आवाज! राष्ट्रवादी विचार !!

# एकतेची स्थापना

सध्या देशामध्ये धर्मवाद आणि जातीयवाद व जगामध्ये धार्मिक हिंसाचार व दहशतवाद मोठ्या प्रमाणावर बोकाळलेला दिसतो आहे. अगदी अलिकडे श्रीलंका, फ्रान्स, इंग्लंड, न्यूझीलंड या देशातील धार्मिक स्थळी व पंचतारांकित हॉटेलांमध्ये झालेले बॉम्बस्फोट हे त्याचे निदर्शक आहे. भारतात आणि विशेषतः काश्मिरमध्येही रोज काही ना काही घडते आहे. महानायकांची छाती सांगण्या व मिरवण्यापुरतीच 56 इंचाची आहे. प्रत्यक्षात ‘बडा घर पोकळ वासा’ अशीच त्यांची अवस्था आहे. त्यामुळे देश वाचविण्यासाठी आपल्याला पूर्णपणे त्यांच्यावर विसंबून राहता येणार नाही. त्यांची विश्वासार्हताही आता संपूर्ण ढासळलेली असल्यामुळे विश्वासाने त्यांच्या खांद्यावर मान ठेवता येणार नाही. त्यासाठी आपण सर्वांनी एकजुटीने राजकारणाच्या कक्षा ओलांडून व आपापसातील मतभेद गाडून आणि धर्मांध व जातीयवादी सरकार सत्तेवरुन घालवून देशात एकता स्थापन करणे ही पहिली गोष्ट आहे. आमचा देश मोठा आहे. त्यात ऐक्य असेल तर तो आणखीन मोठा होईल आणि एकता नसेल तर त्याचे मोठेपणच त्याला कमजोर करील. ज्या देशात वेगवेगळ्या प्रकारचे भेद आणि विरोध असतात तो देश जितका मोठा असेल तितका त्याला जास्त धोका आहे. तुम्हाला भेद आहेत ते तसेच ठेवायचे असतील तर आपला देश लहानसा बनवा आणि खूप लढा. परंतु आमच्या पूर्वजांनी व ऋषींनी त्यांच्या कर्तृत्वाने पूर्वीपासूनच देश मोठा विशाल बनविला आहे. म्हणून आमचे हृदयही विशाल झाले पाहिजे. विशाल देश आणि छोटे हृदय यांचा मेळ बसत नाही. हल्ली जे नाहक भेद वाढले आहेत ते नाहीसे केले पाहिजेत.

आला लोकसभेच्या निवडणुका संपल्या आहेत. विधानसभेच्या निवडणुकांना अजून पाच-सहा महिन्यांचा अवकाश आहे. निवडणुकीच्या राजकारणात जरुर एकमेकांच्या गुणदोषांची व मर्यादांची जाहीरपणे चर्चा करा. परंतु निवडणुका संपल्यानंतर विकासाच्या व देश उभारणीच्या कामात पक्षीय राजकारण आणू नका. आपल्या सर्वांच्या कामाचा मूळ उद्देश देशातील गरिबीचे उच्चाटन करणे हाच आहे. त्यासाठी सर्वांनी मिळून गरिबांच्या सेवेला लागले पाहिजे. देशातल्या दुःखितांची माझ्या हातून काही ना काही सेवा व्हावी अशी तीव्र भावना प्रत्येकाच्या मनात असली पाहिजे. आपल्या घासातला घास दुसऱ्याला देण्याची प्रवृत्ती वाढविली पाहिजे. आज अनेक ठिकाणी असे आपण पाहतो की ‘माझे ते माझे आणि तुझे तेही माझे’. दुसऱ्याला ओरबडून स्वतः मोठे श्रीमंत होण्यात काहीच हशील नाही. त्याने पूर्ण समाधानही मिळणार नाही. पण दुसऱ्याला मोठे होण्यासाठी आपला जर काहीसा हातभार लागला असेल

## प्रबंध संपादकीय



तर त्यामुळे मिळणाऱ्या समाधानाची, श्रीमंतीची मोजदाद करता येणार नाही. यासाठी हव्यास सोडून गरिबी व दारिद्र्य निर्मूलनाच्या समान कार्यक्रमात आपण सर्वांनी सहभागी झाले पाहिजे.

भारताचा सर्व इतिहास-सामाजिक नव्हे, राजकीय इतिहास परस्परविरोधाने भरलेला आहे. येथील राजांमध्ये आपसात द्वेष आणि झगडे पुष्कळ चालत. म्हणून आपल्या इतिहासापासून आपण धडा घेतला पाहिजे. हिंदुस्थानात एक गुण आहे त्या बरोबरच एक दोषही आहे. रूपाबरोबर छाया असते तसे गुणांबरोबर दोषही असतातच. हिंदुस्थानचे लोक तत्त्वज्ञानी आहेत आणि तत्त्वज्ञानी प्रायः वादप्रिय असतात. त्यांचा एकमेकांशी मेळ असत नाही. शंकराचार्य, रामानुज यांसारखे मोठे तत्त्वज्ञानी असोत किंवा म. गांधी, नेहरु, सरदार पटेल यांच्यासारखे मोठे नेते असोत किंवा सामान्य लोक असोत, प्रत्येकजण आपापल्या सिद्धांताला चिकटून राहील आणि तडजोडीतून समन्वय होणार नसेल तर चढाओढीत गोधडी जशी बरोबर मध्यभागी फाटते तसे देशाच्या विकासाचे झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून माझी सर्व कार्यकर्त्यांना प्रेमपूर्वक विनंती आहे की निवडणुका झाल्यानंतर मतभेद, पक्षभेद विसरा. सध्या महाराष्ट्रातली जनता खूप मोठ्या प्रमाणावर तीव्र अशा दुष्काळाचा सामना करते आहे. पिण्याच्या पाण्याचा दुष्काळ भयानक मोठा व भयावह आहे. या काळात माणसे, गुरे, जनावरे कशी जगवायची ही समस्या प्रत्येकाकडे आ वासून उभी आहे. अशा संकटसमयी आपण एकमेकांना मदतीचा आधार देत धावून गेले पाहिजे. खऱ्या व प्रामाणिक कार्यकर्त्यांकडून हीच अपेक्षा आहे.

# बुद्धपौर्णिमेचा संदेश

## संपादकीय



संपूर्ण जग अहिंसा आणि शांततेचे प्रतिक म्हणून भगवान गौतम बुद्ध यांच्याकडे पाहते. येत्या 18 मे रोजी बुद्धपौर्णिमा म्हणजे गौतम बुद्धांची जयंती आहे. जगभर हिंसाचार, दहशतवाद आणि विध्वंसक अतिरेकी कारवाया प्रचंड बोकाळलेल्या असताना व बहुसंख्य समाज भिती, नैराश्य व स्वातंत्र्याच्या संकोचामुळे दडपणाखाली जीवन कंठत असतानाही जगभर बुद्धपौर्णिमा मोठ्या उत्साहाने साजरी होते याला एक वेगळा अर्थ आहे. आज जगातील अधिकांश लोकांचे भगवान बुद्धाबद्दलचे आकर्षण वाढत आहे. ज्या व्यक्तीची जयंती तिच्या जन्मानंतर अडीच हजार वर्षांनी देखील साजरी केली जाते, तिची आयुष्यमर्यादा किती दीर्घ असेल? आज हिंदू धर्मात कोणत्याही धर्म कार्याचा संकल्प करण्याच्या वेळी 'बौद्धावतारे वैवस्वते मनव्तंरे कलियुगे' असे म्हणतात. याचा अर्थ असा की आज ही आम्ही बुद्धाच्या युगातच वावरत आहोत. बुद्ध युगाचा जणू आरंभ होत आहे. मातीत जसे बीज झाकले जाते आणि नंतर त्यातून ते अंकुरित होते, त्याचप्रमाणे मधल्या काळात बुद्धाच्या शिकवणीचे बीज काहीसे झाकल्यासारखे राहिले आणि आता ते अंकुरित होत असलेले दिसत आहे. भगवान बुद्धांनी स्पष्ट शब्दांत सांगितले होते...

**"न हि वेरेण वेराणि समन्तीध कुदाचन ।**
**अवेरेणेच समन्ति एस धम्मो सनन्तनो ॥"**

याचा अर्थ, वैराने वैर कदापि शांत होऊ शकत नाही. कितीही प्रयत्न करा, अग्नि शमविण्यासाठी तुप नव्हे तर पाणीच पाहिजे. वैराने वैर शांत होऊ शकत नाही. शत्रुत्वाने शत्रुत्व वाढतेच. हे त्यांच्या शिकवणुकीचे सार आहे. त्यांच्या वाणीत जी शक्ती होती, तिचे भान आज लोकांना होत आहे. याचे मुख्य कारण आमचे 'देशाचे चौकीदार' आणि जगातले काही भ्रमिष्ट सत्ताधारी आता परत अणुबाँबची भाषा बोलू लागले आहेत. दहशतवाद व आंतकवाद निपटून काढण्यासाठी अण्वस्त्र हल्ले करण्यापर्यंतची भाषा वापरली जात आहे. धर्माचा अनाठायी व अतिरेकी आग्रह धरणारे धर्मवेडे जात्यंध या अण्वस्त्रे व अणुबाँबच्या भाषेमुळे नमण्याची व मवाळ होण्याची कितपत शक्यता आहे याचा जाणकारांनी विचार केला पाहिजे. जेव्हा आपण गौतम बुद्धांची मोठ्या उत्साहाने जयंती व बुद्धपौर्णिमा साजरी करतो तेव्हा शांती, दया, अहिंसा, परिवर्तन यांचा आपल्याला विसर कसा पडतो?

इ.स. सहावे शतक हा बुद्धाचा काळ आहे. महावीर हा बुद्धाला थोरला असला तरी समकालीन होता. धम्म किंवा तत्त्वज्ञान हे दोन्ही शब्द बुद्धाच्या शिकवणीला उद्देशून वापरतात. वैदिक, इस्लाम किंवा ख्रिस्त धर्मामध्ये काही ग्रंथ प्रकट झाले आहेत.ते अनादि अपौरुषेय चिरंतन आहेत किंवा प्रेषितामार्फत ईश्वराने ते प्रकट केले आहेत असे मानले जाते. त्याचा विस्तार व विकास करण्यासाठी त्यावर भाष्ये झाली. तसे गौतम बुद्धांच्या शिकवणीचे स्वरूप नाही. तो गूढ आध्यात्मिक मार्ग आहे. ती एक शिकवण आहे. वेद हे नित्य आहेत. परंपरेने चालत आले आहेत. त्याकाळी उपासनेचा, पूजेचा, आराधनेचा प्रमुख मार्ग म्हणजे यज्ञ करणे. देवतांना आवाहन करून, त्यांना इष्ट असलेल्या वस्तू समर्पित करणे. या यज्ञाला पुढे बरेचसे मांत्रिक स्वरूप प्राप्त झाले. योग्य रितीने यज्ञ कसा करावा याचे व त्यासंबंधीच्या आदेशांचे बिनचूक पालन केले तर मुक्रर केलेले फळ अनिवार्यपणे लाभते. अधिकार असलेल्या व्यक्तीने यज्ञ केला तर अपूर्व शक्ती निर्माण होते. पाहिजे ते फळ मिळते हे वेदात प्रकट झाले आहे. यज्ञाकडे बघण्याची ही मांत्रिक पूर्वमीमांसेची दृष्टी सर्वांचीच होती असे नव्हे. अधिक उदात्त दृष्टीनेही याकडे पाहिले गेले आहे. कर्म करीत राहिल्याने सृष्टीच्या शक्तीचे, देवतांचे पोषण होते. ते चालू राहिले तर धर्म, अर्थ, काम हे चक्र चालू राहते. पण बुद्धापुढे जो यज्ञ होता तो मांत्रिक जादू टोण्याचा होता. त्यांना तो मान्य नव्हता. यात गूढ मांत्रिक शक्ती काहीही नाही. या मांत्रिक वाहक शक्तीचे साधन म्हणजे यज्ञ. म्हणून बुद्धाने यज्ञ नाकारला आणि यज्ञाने फळ मिळते हेही नाकारले आणि याकरिता ब्राह्मणांचे श्रेष्ठत्वही नाकारले.

नैतिक जीवनमार्ग जो आहे तो माणसाला बंधनकारक आहे. त्यातूनच त्याला श्रेय मिळते. श्रेष्ठतेचा हा एकमेव निकष आहे. या नैतिक शुद्धीतून माणसाला श्रेय मिळणार. त्याचे वर्णन दुःख निवृत्ती असे केले जात असले तरीही बुद्धाला अभिप्रेत असणारे श्रेय केवळ दुःख निवृत्तीचे नाही. त्याही पलीकडची स्थिती त्यांना अभिप्रेत होती. पण याविषयी ते काहीही बोलायला तयार नव्हते. माणूस ठरवून काही कृत्य करतो, काही घडवून आणतो. त्याला पाप-पुण्य लागते असे येथे काहीच नाही. येथे पाप नाही, पुण्य नाही. जे आहे ते असे चालत आलेले आहे. एवढे माणसाने जाणावे. आचार्य धर्म पाळणारे यती होते. अहिंसावादी होते. माणूस आपल्या कर्माने आपले भवितव्य घडवितो हा गौतम बुद्धांच्या विचाराचा गाभा आहे. कुशल-अकुशल कर्म करण्याची प्रवृत्ती माणसात आहे. प्रेरणेवर मात करीत, कुशल कार्य करीत नैतिक जीवन जगणे हा बुद्धाचा

मार्ग होता. म्हणून अक्रियावादही बुद्धाने नाकारला. मोक्ष, माणसाची मुक्ती येथे एक आत्मा आहे. तो विश्वात प्रकट झाला. त्याच्या आणि आपल्यात भेद नाही. तो आणि आपला आत्मा एकच आहे. ही अद्वैत वेदान्ताची शिकवणही बुद्ध ठामपणे नाकारतो. नित्य असे ब्रह्म आहे. विशिष्ट व्यक्ती शरीराशी बांधलेली आहे हाच खरे पाहता त्या परब्रह्माचा अविष्कार आहे. नित्य जीवात्मा आणि परमात्मा नाही. नित्य असे काहीच नाही. आहे ते अनित्य आहे अशी बुद्धाची शिकवण आहे.

दुशाक्य कुळात इ.स. 580 च्या आसपास बुद्ध जन्माला आले. त्यांचे वडील शुद्धोधन हे दुशाक्य समाजातील श्रीमंत सरदार होते. त्यांचे मायादेवीशी लग्न झाले. त्यांना जो सिद्धार्थ नावाचा मुलगा झाला तोच हा पुढे गौतम बुद्ध या नावाने ओळखला जातो. या सिद्धार्थमध्ये बालपणापासूनच एक विरक्ती आढळून येते. ज्योतिषांनी प्राकथन केले होते की हा चक्रवर्ती सम्राट होईल किंवा परिव्राजक होईल. त्याला दुःखाचे दर्शन होऊ नये. आनंदात राहता यावे म्हणून सर्व सुखसोयी उपलब्ध करून दिलेल्या होत्या. रस्त्याने जाणाऱ्या एका माणसाचे प्रेत पाहिल्यानंतर त्याला प्रचंड दुःख झाले आणि त्याने सर्वस्वाचा त्याग केला असे जे सांगितले जाते ते खरे वाटत नाही, असे मत तत्त्वज्ञानाचे गाढे अभ्यासक डॉ. मे. पुं. रेगे यांनी 9 सप्टेंबर 1996 रोजी पुण्यातील स्नेहसदनमध्ये दिलेल्या व्याख्यानात व्यक्त केले होते. ते पुढे म्हणाले, ''एवढ्या प्रौढ राजकुमाराला माणसांना मरण येते हे माहित नसावे हे मिथ आहे.'' सिद्धार्थने गृहत्याग करून संन्यास का घेतला याचे कारण त्याने स्वतःच दिले आहे. जरा, व्याधी, मरण अटळ आहे. माझा आनंद त्यामुळे पार मावळला आहे. गौतमाला हे जे ज्ञान प्राप्त झाले त्याच्या गाभ्याशी मानवी दुःख आहे. या दुःखाचा नायनाट करण्याचे जे मार्ग आहेत ते अपुरे आहेत. खरे फलदायी नाहीत. ही विरक्तीची जाणीव लहानपणापासूनच मनात उत्पन्न झाली. विवाह केला. पुत्रही झाला आणि अखेरीस दुःख निवृत्तीसाठी तो घराबाहेर पडला. पराकोटीची अशी तपश्चर्या केली. अन्नपाण्याविना राहिला. शरीर दुबळे झाले. आता हा मार्ग बदलायचा असे ठरवून अन्न खायला सुरुवात केली. ज्ञान, बोधिप्राप्त होईपर्यंत ध्यानस्थ बसणार. विचारात गढून जाणार. ज्या ज्ञानाने मला दुःखापासून मुक्ती मिळेल ते मिळेपर्यंत हटणार नाही. या बोधिचा, ज्ञानाचा आशय म्हणजे बौद्ध धर्माचे मूळ, सार, गाभा असे म्हणता येईल

चार आर्यसत्ये बुद्धाला प्राप्त झाली. बौद्ध धर्म दोन पातळ्यांवरचा आहे. उपासकांचा जो मुख्यतः नैतिक धर्म आहे आणि भिक्षुकांचा धर्म हा अध्यात्माकडे जाणारा आहे. उपासकांचा मार्ग अपुरा आहे. खरा बौद्ध मार्ग अध्यात्मिक गूढ असा संपूर्ण दुःख निवृत्तीचा मार्ग आहे. आर्यसत्ये अशी – जग म्हणजे हे मानवी जीवन दुःखमय आहे. अप्रिय वस्तुशी संयोग झाला तरी ते दुःखमय होते. संसार हा दुःखाने ओतप्रोत भरलेला आहे. जीवन दुःखमय आहे ही उत्कट जाणीव हा बौद्ध तत्त्वज्ञानाचा आधारच आहे. दुःखाचे साक्षात दर्शन घेतले पाहिजे. त्याची जाणीव घेतली पाहिजे हे पहिले आर्यसत्य या दुःखाला कारण आहे. त्यामुळे ते अस्तित्वात आहे. तृष्णा किंवा तन्हा हे याचे कारण आहे.

दुःखाचा परिहार करण्याचा प्रयत्न करावा. तृष्णा सर्व तऱ्हेच्या प्रेरणेत गुंतवित असते. आपण कारणांचा निरोध करण्याचा प्रयत्न करावा. हे कारण नष्ट करता येते हे तिसरे आर्यसत्य आहे. कारणही विनाशी आहे आणि त्याचा अंत करता येतो. तृष्णेचा अंत करता आला तर या दुःखाचाही अंत करता येतो. या दुःखाचा अंत कसा करायचा हे चौथे आर्यसत्य.

वेदांनी अष्टांगिक म्हणजे आठ अंगांचा श्रेष्ठ जीवनमार्ग सांगितला. चांगली श्रद्धा हे त्याचे पहिले अंग. चांगला संकल्प, चांगल्या इच्छा करून चांगले भाषण करणे. सत्यप्रिय असे चांगले कर्म करणे, जी लोकांना सुखकारक होतील. चांगली उपजिविका असणे. व्यवसाय लोकांच्या हिताकरिता करणे व अहित होणार नाही अशी व्यवस्था करणे. नीतिने जगण्याचा हा मार्ग मांत्रिक शक्ती विश्वात आहे व ती ब्राह्मणांपासून पृथ्वीवर अवतरते हे वेदातून प्रकट झाले असे सांगितले जायचे. त्याच्या विरुद्ध बुद्ध ठामपणे उभा राहतो. तो सांगतो चांगला जीवनमार्ग हा योग्य जीवनमार्ग आहे. चांगला योग असणे, चांगली स्मृती असणे व चांगले सम्यक स्तुती, योग्य, ध्यान ही नैतिक जीवनाच्या पलीकडे नेतात. सती किंवा स्मृती याचा अर्थ आपण काही विचार, कृती करीत असताना आपण खरोखर काय करीत आहोत, इकडे व्यवस्थित ध्यान देणे. त्याचे स्वरूप, परिणाम काय आहेत या रीतीने जगणे म्हणजे सम्यक सती. आपल्या देशात कितीही भ्रष्टाचार असला, अनैतिकता बोकाळलेली असली तरी बहुसंख्य लोक निती पाळताहेत म्हणून हा समाज चालू आहे. निती ही आपण माफक प्रमाणात पाळतो. मी माझ्या स्वार्थासाठी दुसऱ्याला न दुखावताही त्याला आनंद होईल असे खोटे बोलतोय याचा विचार करून स्वतःचे दिग्दर्शन, नियंत्रण करणे ही भिक्षुंची निती आहे. गृहस्थाला ही निती पाळणं जड आहे. त्यामानाने ती भिक्षुला पाळणे सोपे आहे. सम्यक योग आणि सम्यक ध्यान या बुद्धाने नेहमीच्या नितीपलीकडचा ध्यानमार्ग सांगितला.

हे सगळं इतक्या सविस्तरपणाने का सांगितले असे काहींना वाटण्याची शक्यता आहे. पण आज साऱ्या दुनियेच्या जीवनात संघर्ष आणि असंतोष दिसतो. अनेक कठीण समस्या लोकांपुढे उभ्या आहेत. समाजाचे धुरीण त्या सोडविण्याचा जेव्हा प्रयत्न करतात तेव्हा त्यांना खरं म्हणजे भगवान बुद्धाच्या शिकवणीचे स्मरण व्हायला पाहिजे. पण मतांसाठी लाचार झाल्यामुळे

आणि काहीही करून पुन्हा सत्तेत यायचे असा ध्यास बाळगलेला असल्यामुळे अणुबॉम्ब, ॲटमबाँब, हायड्रोजन बाँब, अण्वस्त्रे यांचीच त्यांना आठवण होते. असे बोलण्याने लोक खूष होतील. म्हणून अणुबाँब फेकीची खोटी खोटी भाषा वापरली जात आहे. या बाँबने दुनियेच्या शक्तीचा क्षय होईल. शक्तिक्षयाचा तो एक कार्यक्रम बनेल. दुनियेला जाणीव होत आहे आणि असा अनुभवही येत आहे की आपली प्रगती न होता आपण जागच्या जागीच राहणार आहोत. आज कित्येक नास्तिकही बुद्धावर विश्वास ठेवू लागले आहेत. मध्यंतरी अडीच हजार वर्षे बुद्ध भगवान गर्भावस्थेत होते. परंतु आज बुद्ध भगवानांच्या विचारांना अंकुर येत आहे.

जे शिक्षण त्यांनी दिले, ते त्यांच्या वेळी सुद्धा नवीन नव्हते. शेकडो संतांनी तेच विचार पुन्हा पुन्हा सांगितले होते. वैराने वैर शांत होत नाही, हा त्यांचा विचार नवा नव्हता. येथे सर्व तऱ्हेचे तत्त्वज्ञान, शेकडो वर्षांचा अनुभव आत्मानात्मविवेक, वेद, उपनिषद, सांख्य, गीता आदि निर्माण झाले होते आणि आम्हाला या सर्वांनी निर्वेरतेचे शिक्षण दिले होते. ऋषींनी गाइले होते :

**मित्रस्य मा चक्षुषा सर्वाणि भूतानि समीक्षन्ताम।**

**मित्रस्य अहम् चक्षुषा सर्वाणि भूतानि समीक्षे॥**

याचा अर्थ – सर्व जगाने माझ्याकडे मित्रत्वाच्या नजरेने पाहावे असे जर आम्हांला वाटत असेल, तर आम्हांला ही जगाकडे त्याच मित्रत्वाच्या भावनेने पाहावे लागले. दुनियेला मी मित्रच करु शकतो, शत्रु करु शकत नाही, हे वेदांनी आम्हांला शिकविले होते. मध्यंतरीच्या हजारो वर्षांत याची कसोटी झाली नाही. शेवटी बुद्धाने आम्हांला हा अनुभव सांगितला. म्हणून बुद्ध भगवांनीनी सांगितलेले विचार जरी नवे नव्हते तरी कदाचित इतक्या स्पष्टपणे पूर्वी कुणी ते सांगितले नसतील म्हणून ते मोलाचे वाटले. बुद्धाच्या नंतरही महात्मा गांधींसारख्या अनेक नेत्यांनी आम्हाला सत्य, अहिंसा, अस्तेय व ब्रह्मचर्य या विषयांचे बाळकडू दिले. आम्ही ते पिऊन कृतीत किती उतरविले हा वेगळा चर्चेचा विषय आहे. दुधाची परीक्षा करतांना शास्त्रज्ञ त्यातील लोण्याचे प्रमाण पाहतात. त्यावरुन दुधाचा कस मोजला जातो. त्याप्रमाणे एखाद्या समाजाचे मूल्यमापन त्या समाजात किती महान सत्पुरुष निर्माण झाले त्यावरुन होते. समाजातील महापुरुष म्हणजे दुधांतील लोणी. भारताच्या उन्नतीच्या आणि अवनतीच्या वेळी देखील महापुरुष निर्माण झाले आहेत. एवढेच काय पण 100-150 वर्षांच्या पारतंत्र्यात आणि विदेशी ब्रिटिश सत्तेखाली दबलो असताना आमची जी अत्यंत हीन दर्जाची स्थिती होती त्या काळीही येथे होऊन गेलेल्या राजाराममोहन रॉय, दयानंद सरस्वती, रामकृष्ण परमहंस, लोकमान्य टिळक, रवींद्रनाथ टागोर आणि महात्मा गांधींसारख्या अनेक महापुरुषांची नावे आपण घेऊ शकतो. हे महापुरुष श्रेष्ठपणात जगातील इतर महापुरुषांपेक्षा मुळीच कमी नाहीत. याचा अर्थ असा की, आपली पुरुषार्थशक्ति आजही कायम आहे हे भारताने सिद्ध केले आहे. प्राचीन काळापासून येथे अशी एक शक्ती काम करीत आहे की जिच्यामुळे प्रतिकूल परिस्थिती असूनदेखील येथे महापुरुष निर्माण होत राहिले.

आता विज्ञानाने खूप प्रगती केली आहे. विज्ञानाच्या सहाय्याने लोकांनी अनेक देश ताब्यात घेतले. इंग्रज भारतात व्यापाराच्या निमित्ताने येऊन मालक होऊन बसले. त्यांनी येथे एक चमत्कार केला. सर्व लोकांच्या हातून शस्त्रे काढून घेतली. ही घटना निमूटपणे आम्ही सहन केली असती तर देशाला अविरत पारतंत्र्य स्वीकारावे लागले असते. परंतु ज्या देशामागे हजारो वर्षांचा अनुभव आहे तो कायमचा गुलाम राहू शकत नाही. निःशस्त्र बनून सुद्धा आम्ही डोके वर काढू शकू आणि पारतंत्र्याच्या शृंखला तोडू शकू असे एखादे शस्त्र आम्हांला हवे होते. त्यासाठी जो सिद्धांत संतांनी आपल्या व्यक्तिगत जीवनात सिद्ध केला, त्याचा प्रयोग सामाजिक जीवनात केला गेला. तत्परिणामी आम्ही स्वतंत्र झालो. आम्हांला जे स्वातंत्र्य मिळाले ते आमच्या अहिंसेमुळेच मिळाले असा दावा कुणी करणार नाही आणि केला तर ते बरोबरही होणार नाही. गीतेने सांगितले आहे कोणतेही काम पाच कारणांमुळे होते. म्हणून केवळ आमच्या अहिंसक प्रयोगामुळेच स्वातंत्र्य मिळाले असे म्हणणे अहंकाराचे होईल. परंतु अहिंसात्मक युद्ध एक मोठे कारण आहे असे आम्ही म्हणू शकतो. हिंदुस्थानचा राजकीय प्रश्न नैतिक उपायांनी सुटला आणि हिंदुस्थानात राष्ट्रीय स्वातंत्र्याचा प्रयत्न करणाऱ्यांना मिळालेले यश अपूर्व आणि अद्भूत होते, असे जगाचा इतिहास लिहिणाऱ्याला नमूद करावे लागेल. त्यामुळेच साऱ्या जगाचे लक्ष भारताने आपल्याकडे खेचून घेतले. अशा रितीने आम्ही एका बलवान राष्ट्राकडून स्वातंत्र्य प्राप्त करुन घेतले हा इतिहास आमचे आजचे नेते का विसरतात?

या देशात दुसरा एक चमत्कार झाला. एवढे मोठे राज्य की ज्यावर कधीच सूर्य मावळत नाही असे बोलले जात असे ते येथून आपला सर्व कारभार आटोपून निघून गेले. एक तारीख निश्चित करुन त्या मुदतीच्या आत त्यांनी तेथून कूच केले. आम्ही स्वातंत्र्यप्राप्तीसाठी उपयोगात आणलेल्या अहिंसक पद्धतीचे जेवढे महत्व आहे तेवढेच महत्व इंग्रजांनी एका निश्चित तारखेला आपली सत्ता येथून काढून घेतली या गोष्टीलाही आहे. हा सुद्धा नैतिकतेचा एक अद्भूत विजय आहे असेच इतिहासकार म्हणतील. वरील दोन्ही चमत्काराहून आणखीन मोठा चमत्कार झाला की ज्या क्षणी लॉर्ड माऊंटबॅटनने हिंदुस्थानचा कारभार हिंदवासीयांच्या हातात सोपविला, त्याच क्षणी आमच्या लोकांनी त्यालाच आपला पहिला गव्हर्नर जनरल नेमले. नैतिक विजयाचे यापेक्षा

श्रेष्ठ उदाहरण दुसरे कोणते असू शकेल? नैतिक पद्धतीने ज्याचा विजय होतो ते तर जिंकतातच परंतु ज्यांचा पराभव होतो ते देखील जिंकतात. हीच नैतिक विजयाची खुबी! एकाच्या पराभवावर दुसऱ्याचा विजय अवलंबून नसतो. उलट आम्हाला इंग्लंडने अनेक प्रकारची दुःखे आणि यातना सोसायला लावल्या, जे काम आज पाकिस्तान व शेजारचे इतर देश करताहेत. परंतु आमच्या मनात इंग्लंडविषयी वैरभाव नाही. इतर कोणत्याही युद्धानंतर असा सद्भाव प्रकट झालेला नाही. या घटनेचे बुद्ध पौर्णिमेच्या निमित्ताने आपण शांत चित्ताने संशोधन व मनन केले पाहिजे.

मागील पाच वर्षांपासून देशात धर्मांध व जातीयवादी सरकार सत्तेवर आले आहे. ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा छुपा अजेंडा उघडपणे देशात राबवित आहे. त्यामुळे दलित, मुस्लिम, अल्पसंख्यांक समाज भयभीत व हतबल झाला आहे. कोणी काय खावे, कोणते कपडे घालावेत इथपासून सर्व प्रकारची बंधने लादली जाताहेत. भारताची राज्यघटना आणि देशाचा तिरंगा झेंडा आम्हाला मान्य नाही असे म्हणून दिल्लीतल्या जंतरमंतरवर हिंदुत्ववादी विचाराच्या संघटनांकडून भारताचा राष्ट्रध्वज म्हणजे तिरंगा जाळला जात आहे. जाहीरपणे त्याची होळी होऊन ती दृश्ये टीव्हीवर दाखविली जात आहेत. पण तो झेंडा जाळणाऱ्यांवर सरकार जाणीवपूर्वक काहीही कारवाई करीत नाही. हे कशाचे लक्षण मानायचे? देशात पुन्हा मनुस्मृती आणण्याची भाषा केली जात आहे. या पार्श्वभूमीवर आपल्याला कोणत्या प्रकारची समाजरचना हवी आणि त्यासाठी कोणाच्या हातात सत्ता द्यावी याचा विचार करण्याची ही वेळ आहे. हा संधिकाल आहे. चिंतन करण्याची वेळ आहे. त्या दिशेने कृती करण्याची आवश्यकता आहे. आज अनेक वाटा मोकळ्या आहेत. कोणत्या वाटेने जायचे ते आपल्याला निश्चित करायचे आहे.

म. गांधीजींच्या वेळी आम्ही अहिंसेचा मार्ग अजमावला होता. परंतु त्यात आमची काहीच विशेषता नव्हती. कारण तेव्हा आम्ही लाचार होतो. तो मार्ग आम्ही स्वीकारला नसता तर मारच खाल्ला असता. दुसरा कोणता हिंसक मार्ग आमच्यासाठी मोकळा नव्हता. म्हणून जो मार्ग आम्ही स्वीकारला होता तो अगतिक होऊनच स्वीकारला होता. तो अनाथांचा आश्रय होता. गांधीजींचे नेतृत्व आम्हाला लाभले होते. आम्ही त्यांची विचारांची पद्धत अजमावून पाहिली. हिंसेच्या बाबतीत आमच्या शक्तीपेक्षा आमचा शत्रू पुष्कळच बलवान होता. परंतु अहिंसेच्या बाबतीत आम्ही त्याच्याहून अधिक शक्तिशाली होतो. म्हणून स्वातंत्र्यप्राप्तीची अभिलाषा सोडून निमुटपणे गुलामी स्वीकारायची की अहिंसक प्रतिकारासाठी तयार व्हायचे हा एकच पर्याय आमच्या समोर होता. त्यावेळी आमच्यासमोर पसंतीचा प्रश्नच नव्हता. परंतु आज स्थिती निराळी आहे. आता आम्ही निवड करु शकतो. सत्ताधारी राज्यकर्ता मतपेटीतून बदलू शकतो. हिंसक की अहिंसक मार्गाचा स्वीकार करायचा हे ठरवू शकतो. देशाला खायला मिळो ना मिळो लष्करी सामर्थ्य व संरक्षणावरचा खर्च वाढवू शकतो. जवानांच्या बलिदानाचे देखील सत्ताधारी राज्यकर्ते कसे भांडवल करु शकतात ते ही पाहू शकतो आणि आज ते पाहतोच आहेत. जवानांच्या प्राणांपेक्षा आणि त्यांच्या हौतात्म्यापेक्षा सत्ता मिळणे जास्त महत्त्वाचे आहे यासाठी 56 इंच छातीचा चाललेला आटापीटाही देश उघडपणे पाहतोच आहे.

आज भारत स्वतंत्र आहे तरी अनेक गोष्टी परदेशातून आयात कराव्या लागत आहेत. आपला देश पूर्ण स्वावलंबी आहे हे चित्र खोटे आणि फसवे आहे. अन्यथा राफेल विमाने फ्रान्सकडून आणि साखर व कांदा 56 इंच छातीने पाकिस्तानातून आयात केलाच नसता! स्वातंत्र्य मिळूनसुद्धा स्वेच्छेने आपण गुलाम बनायचे की कसे हा आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या निमित्ताने आमच्यासमोरचा प्रश्न आहे. ईश्वराने हिंदुस्थानच्या नशिबी असे लिहिले आहे की एक तर त्याने अहिंसेच्या मार्गाने श्रद्धापूर्वक चालावे किंवा जे लोक हिंसेत तरबेज आहेत, त्यांची गुलामी स्वीकारावी. कारण भारत म्हणजे एक पंचरंगी जग असून खंडप्राय देश आहे. यात अनेक धर्म, अनेक जाती, अनेक भाषा, अनेक प्रांत आणि त्यांचे अनेक रितीरिवाज आहेत. अशा अनेकविध वर्गांच्या समाजाला हिंसक पद्धतीने आम्ही एकरस ठेवू शकू का? राज्यकर्ते या समाजांमध्ये मतांसाठी सातत्याने दुही व संघर्ष निर्माण करण्याचा प्रयत्न करताहेत. त्यामुळे रोज नव्या समस्या वाढत जाणार आहेत. या समस्या हिंसक मार्गाने सोडविण्याचा प्रयत्न केला तर देशाचे पुन्हा तुकडे तुकडे होण्यास वेळ लागणार नाही. हिंसक साधनांनी समस्या वाढतच राहतील. परंतु अहिंसक पद्धतीनुसार जर आपले प्रश्न आपण सोडवू तर दुनियेत समस्या उरणारच नाहीत. देशाच्या मर्यादा विचारांना अडवू शकत नाहीत. जशी बाहेरची हवा या देशात येऊ शकते त्याच प्रमाणे येथली हवा देखील बाहेर जावू शकते. भारतात मोदींच्या रुपाने एक अजब तमाशा होऊन राहिला आहे. त्यामुळे सारी सूज्ञ जनता चिंताक्रांत आहे. भगवान बुद्धांच्या शिष्यांनी ज्या निष्ठेने शांती, अहिंसेचा जगभर प्रचार केला तशी निष्ठा घेऊन धर्मनिरपेक्षता, लोकशाही, सर्वधर्मसमभाव, समानता या विचारांचा गजर करणारे कार्यकर्ते देशाला हवे आहेत. असे कार्यकर्ते जागोजागी मोठ्या संख्येने खंबीरपणे उभे राहिले तर भगवान गौतम बुद्धांचा विचार या देशात रुजून अजून जिवंत आहे असे म्हणता येईल. अशा विचारांचे कार्यकर्ते उभे करणे हाच बुद्ध पौर्णिमेचा संदेश आहे. तो ध्यानात घेऊन आपण त्याप्रमाणे वर्तन करुया!

नमस्कार!




आज महाराष्ट्रामध्ये अभूतपूर्व अशी दुष्काळी परिस्थिति आहे. परतीचा पाऊस आलेला नाही आणि त्याची जबरदस्त किंमत ठिकठिकाणी द्यावी लागत आहे. पाण्याचे साठे कमी झालेले आहेत. अनेक ठिकाणी पाणी हे दूरवरून आणावे लागत आहे. कुटुंबातल्या व्यक्तींना दिवसातला बराचसा वेळ हे पाणी आणण्याच्यासाठी द्यावा लागतोय. शेती करपलेली आहे आणि बऱ्याच ठिकाणी पेरण्या झालेल्या नाहीत. जिथं फळबागा आहेत, त्या फळबागा सुकून जातायंत आणि तिथला शेतकरी हा हवालदिल झालेला आहे. पशुंची अवस्था आणखी गंभीर आहे, ज्याचा उल्लेख छगन भुजबळांनी आपल्या भाषणामध्ये केला आणि त्यांनी नाशिकचा अनुभव आपल्याला सांगितला.

साधारणत: महाराष्ट्रामध्ये काही परिसर, जो पर्जन्यछायेत येतो म्हणून ओळखला जातो, तिथं अशा संकटाला तोंड देण्याची समस्या येते. यामध्ये नागपूर, यवतमाळमधला काही भाग येतो. वाशिमची परिस्थिती आणखी गंभीर दिसते. अकोला, बुलडाण्यातसुद्धा हीच चर्चा ऐकायला मिळते. बुलडाण्यातून आपण एकदा जळगावमध्ये प्रवेश केल्याच्यानंतर मराठवाड्यातल्या सगळ्या जिल्ह्यांमध्ये कमी अधिक प्रमाणात ही स्थिती बघायला मिळते आणि मराठवाड्याच्या सीमेवर मग तो सोलापूर असेल, सातारा असेल, जत, आटपाडी असेल, नाशिक जिल्ह्याचा काही भाग असेल, धुळे, जळगाव असेल याहीठिकाणी या प्रश्नाच्याबद्दलची मांडणी त्या त्या भागातल्या लोकांच्याकडून केली जाते. आणि म्हणून एक आव्हानाची परिस्थिती आहे. महाराष्ट्रामध्ये अशा पद्धतीच्या संकटाला यापूर्वीही आपण तोंड दिलं. त्यातून मार्ग काढले. त्याचा उल्लेख मघाशी याठिकाणी केला, की 5-7 वर्षाच्यापूर्वी ज्यावेळेला दुष्काळ पडला, त्यावेळी केंद्र आणि राज्य सरकारांनी, आपल्यासारख्या सहकाऱ्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली आणि माणसं आणि पिकं, पशुधन वाचवायचा प्रयत्न केला. औरंगाबादसारख्या जिल्ह्यामध्ये मोसंबीचं पीक मोठं होतं. जालन्यामध्ये होतं, परभणीमध्ये होतं. बीडच्याही

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे मुंबईत दुष्काळासंबंधी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. शरद पवार मार्गदर्शन करताना. यावेळी त्यांनी दुष्काळाच्या मुद्यावर आपली मते मांडून त्याच्या निवारणासाठी पक्षातर्फे कार्यकर्त्यांना काम करण्याचे आवाहन केले. तसेच दुष्काळ आणि गडचिरोलीतील नक्षलवादी हल्ल्यावरून राज्य सरकारला खडे बोल सुनावले.**



# दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा

## शरद पवार यांचे आवाहन

काही भागामध्ये होतं. ते पीक वाचविण्यासाठीसुद्धा आपण पैसे पुरवले आणि ते फळबागाचं पीक वाचवायची काळजी घेतली.

परवा मी सांगोल्याला सांगत होतो, की शेतकऱ्याचं एखाद-दुसरं पीक कधीकधी जातं, खरीपातलं पीक जातं, रब्बीतलं पीक जातं. ते पीक जातं म्हणजे त्यावेळेला एका हंगामाचं नुकसान होतं. पण फळबागांच्या बाबतीत, आधीच्या वक्त्यांनी जसं सांगितलं. डाळींबाच्या शेतीचा उल्लेख करण्यात आला, आता डाळींब लावल्यानंतर फळ येण्यासाठी पाच वर्षे थांबावं लागतं आणि पाच वर्षे थांबल्याच्यानंतर पुन्हा पंचवीस वर्षे काळजी नसते. त्यामुळं एखादं ज्वारीचं पीक जाणं आणि पाच वर्षे सांभाळून फळावर आलेलं पीक घालवणं म्हणजे पुढच्या पंचवीस वर्षांचं त्या शेतकऱ्याचं नुकसान होतं. अमरावती जिल्ह्यामध्ये ज्याचा उल्लेख मघाशी केला गेला, की संत्रं हे पीक फार महत्त्वाचं पीक आहे. ते हातचं गेलं तर संपूर्ण शेतकरी आणि त्याचा संसार हा उद्ध्वस्त होत असतो आणि ते संकट आज आपल्यापुढं आलेलं दिसतंय.

दुसरं एक याच्यामध्ये मोठं जे संकट आहे, ते पशुधनाच्याबद्दलचं आहे. अनेक शेतकऱ्यांतील घटक असतात, ती त्याचं मुलाप्रमाणं पशुवरदेखील प्रेम असतं. आता ते त्याला पाणी देवू शकत नाही, चारा देवू शकत नाही ही जर अवस्था झाली तर साहजिकच ते घरच अस्वस्थ होतं. आज काही ठिकाणी छावण्या आहेत. पण या छावण्यांची संख्या कमी दिसतेय. राज्य सरकारकडनं मी आकडेवारी मागवली. त्यानुसार अहमदनगरमध्ये 471 छावण्या, नाशिक विभागातच एकंदर 471 छावण्या आहेत. पुणे विभागामध्ये एकंदर 111 छावण्या आहेत. औरंगाबाद विभागामध्ये 682 छावण्या आहेत. यामध्ये अनेक जिल्ह्यांचं नावसुद्धा नाही. राज्य सरकारनं मला काल दिलेलं हे अधिकृत निवेदन आहे. यावरून दुष्काळाची स्थिती कुठेच नाही असा निष्कर्ष काढायचा का? आज छावण्यांची स्थिती ही अतिशय कमी आहे. आता नगर जिल्ह्याचा हा आकडा आणि त्या जिल्ह्याची गरज जर बघितली तर जमीन अस्मानाचा फरक आहे. म्हणून


राज्य सरकारला सुद्धा या कामामध्ये अधिक लक्ष केंद्रीत करायला सांगावं लागेल, विनंती करावी लागेल, नाहीतर लोकांना बरोबर घेवून लोकशाहीच्या मार्गानं काहीतरी कार्यक्रमसुद्धा हातात घ्यावा लागेल. त्याची तयारी करायची भूमिका आपण बनवली पाहिजे.

आज या सगळया कार्यक्रमाच्यासाठी, विशेषत: पशुसंवर्धनासाठी 90 रूपये प्रत्येक मोठ्या जनावरासाठी दिले जातात. 90 रूपयामध्ये चारा, त्याची सावलीची व्यवस्था, पाण्याची व्यवस्था, औषधांची व्यवस्था आणि कुटुंबातली एक किंवा दोन व्यक्ती त्या ठिकाणी असतील दिवसभर तर त्यांची व्यवस्था होऊ शकत नाही. साधारणत: कडब्याचे आजचे भाव बघितले, तर त्या 90 रूपयांमध्ये कुठेही खर्च बसतही नाहीत. एका जनावराला दिवसाचा ३० किलो हिरवा व ६ किलो वाळलेला असा एकूण ३६ किलो चारा लागतो, त्याची एकंदर गरज बघितली तर त्या 90 रूपयांमध्ये हा खर्चच भागत नाही. मग साधारणत: काय दिसतं, बऱ्याचशा भागामध्ये लोक ऊस देतात आणि आजच्याच वर्तमानपत्रात बातमी आहे, की ऊसाचे डायव्हर्सन चारा छावण्यांकडे मोठ्या प्रमाणात व्हायला लागले आहे.

माझा यापूर्वीचा अनुभव असा आहे, की निव्वळ उसाचं वाडं देण्यानंसुद्धा त्या जनावराच्या तोंडामध्ये, जीभेमध्ये चरे पडतात. त्यामुळं त्याला निव्वळ उसाचं वाडं देवून हा प्रश्न सुटत नाही. नाईलाज म्हणून ते खातं. पण ही खरं गरज भागत नाही. त्याच्यामध्ये अन्य प्रकारचा चारासुद्धा द्यायची आवश्यकता असते. पेंड द्यायची आवश्यकता असते. सात-आठ वर्षापूर्वी ज्यावेळेला दुष्काळ पडला होता, त्यावेळेला आपण लाखो जनावरांची व्यवस्था केली होती. आपण चारा दिला. पाचची अट ठेवली नव्हती. कितीही जनावरं आणा. त्यांना चारा चांगला दिला. आपण मोफत पेंडही पुरवली. त्या सगळ्या गोष्टींचा परिणाम हा झाला, की ज्यावेळेला आपल्या लोकांचं राज्य होतं, त्यावेळी भीषण दुष्काळामध्ये चारा छावण्या काढल्याच्यानंतर महाराष्ट्रामध्ये दुधाचं प्रमाण वाढलं. अनेकदा मी छावण्यांवर जायचो, त्यावेळेला लोक म्हणायचे, की हा धंदा बरा आहे. चारा सरकारचा, पेंड सरकारची, दुध आमचं आणि दुधाचे पैसेही आमचे. आणि म्हणून लोकांच्यामध्ये एक प्रकारचं समाधानाचं वातावरण होतं. आज लोक असे त्रासलेले आहेत. ज्यावेळेला दुष्काळासारखं संकट येतं आणि गरजा भागत नाहीत, त्यावेळेला माणसं कावल्यासारखी करतात. कारण तो राग परिस्थितीचा असतो. तो कुणावरही निघतो. कधी मुलाबाळांवर निघतो, नेत्यांच्यावर निघतो, कधी अधिकाऱ्यांच्यावर निघतो. आज अशा प्रकारची परिस्थिती जिथं जिथं दुष्काळ आहे, अशा ठिकाणी बघायला मिळतेय. म्हणून हे एक मोठ्या प्रकारचं आव्हान आपल्या सगळ्यांच्यासमोर आहे. त्या आव्हानाचा लोकांच्या हिताच्यादृष्टीनं कसा लाभ घ्यायचा याची खबरदारी आपल्याला घ्यायची आहे.

आता वॉटर कपसारखी एक मोहीम काही कलेच्या क्षेत्रातल्या लोकांनी दिली होती. त्याच्यामध्ये हजारो लोक सहभागी होतायंत. मला आठवतंय, की सातारा जिल्ह्यामध्ये मागच्या वर्षी आम्ही गेलो होतो याच कार्यक्रमाला, तर मुंबईमध्ये काम करणारे सातारकर दर शनिवारी संध्याकाळी, किंवा शुक्रवारी संध्याकाळी निघायचे, गावाकडे यायचे, दिवसभर श्रमदान करायचे आणि पुन्हा मुंबईला कामाला यायचे आणि हजारो लोक त्याच्यामध्ये सहभागी झाले. त्यातून तलाव झाले, तलावातला गाळ काढला, गाळ काढल्याच्यानंतर जमिनीमध्ये वाहून नेण्याच्यासाठी तोही उपयुक्त असतो, त्याचा लाभही लोकांनी घेतला. आणि एक मोहीम महाराष्ट्रामध्ये तयार झालेली आहे. माझ्या मते अशा मोहिमेमध्ये आपण पक्ष कार्यकर्ता म्हणून अधिक सहभागी झालं तर लोकांच्या हिताची जपणूक तर होतेच, पाण्याचा संचय होण्याच्यासाठी उपयुक्तता होतेच, पण त्याबरोबर लोकांच्या संकटाच्या काळामध्ये उभा राहणारा कोण हेही लोकांना दिसते आणि त्याच्यामध्ये तुमच्या या कष्टाची नोंद हा सामान्य माणूस हा नेहमी घेत राहतो. आणि म्हणून ही आपत्ती आहे. पण ही आपत्तीसुद्धा इष्टापत्तीची लोकांची कशी करता येईल त्या दृष्टीकोनातून आपण त्याच्यावर लक्ष केंद्रीत केलं पाहिजे आणि त्यादृष्टिनं मला स्वत:ला असं वाटतं, की या कामात आपल्याला अधिक लक्ष द्यावं लागेल.

फळबागा वाचवायच्यासंदर्भात आत्ताच मी तुम्हाला सांगितलं. त्याच्यासाठी काळजी घ्यावी लागेल. आता त्याच्यासाठी फळबागांना पाणी द्यायची व्यवस्था आज नाही. टँकरनी पाणी द्यावं लागणार आहे आणि टँकरनी पाणी देवून आपण यापूर्वी बागा वाचवल्या होत्या. त्यामुळं सरकारकडं आपल्याला आग्रह करावा लागेल, की या कामाच्यासाठी तुम्हाला नियम बदलले पाहिजेत. याचा उल्लेख मघाशी याठिकाणी झाला, की काही ठिकाणी वसुली चालली आहे. दुष्काळाची परिस्थिती किंवा आणेवारी ज्यावेळेला होते, त्यावेळी ॲटोमॅटिक वसुली थांबत असते. आणि काही ठिकाणी तर लिलाव काढण्यासंबंधीच्या नोटीसा आत्ता मला दाखवण्यात आल्या. तेही राज्य सरकारशी बोलावं लागेल. सरकारी कर्जांचं पुनर्गठण करावं लागेल. पुढच्या वर्षी पाऊस चांगला झाला तर थकबाकीदार म्हणून त्याला कर्ज मिळत नाही ही स्थिती टाळावी लागेल आणि त्यासाठी पुनर्गठण याची अत्यंत गरज आहे. म्हणजेच नवीन कर्ज मिळू शकेल. ते राज्य सरकारला कळवावं लागेल.



पाच-सात वर्षापूर्वी तुम्हाला आठवत असेल, अशीच स्थिती निर्माण झाली. आपण लोक सत्तेवर होतो. त्यावेळी दुष्काळातल्या विद्यार्थ्यांचीसुद्धा आपण काळजी घेतली होती. आपण त्यांची फी भरली आणि त्यांच्या भोजनाचीही व्यवस्था केली होती. एकट्या मराठवाड्यात आपण 35 ते 40 हजार विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळाला होता. आपल्या काही कार्यकर्त्यांनी त्या काळात अतिशय चांगलं काम केलं होतं. काही ठिकाणी आज या रोजगार हमीच्या कामावर महाविद्यालयीन विद्यार्थी, विद्यार्थिनीसुद्धा येतात, हे आपल्याला बघायला मिळतंय. म्हणून या विद्यार्थ्यांच्याकडं सुद्धा आपल्याला लक्ष द्यावं लागेल.

आणखी एक याच्यातला, युवक काँग्रेस, विद्यार्थी काँग्रेस यांनाही यामध्ये लक्ष द्यावं लागेल. आता हा मे महिना संपला, की महाविद्यालयामध्ये प्रवेश देण्यासंबंधीचा कार्यक्रम सुरू होईल. दुष्काळात सापडलेल्या कुटुंबांच्या मुलांना प्रवेश घेताना फी भरावी लागते, ती भरण्याची ऐपत नसली तर कदाचित त्याला महाविद्यालयामध्ये प्रवेश घेणंसुद्धा अवघड जाईल आणि म्हणून आपल्या युवक आणि विद्यार्थी काँग्रेसनी हे काम प्रत्येक कॉलेजच्या परिसरामध्ये त्या त्या भागातल्या गावामध्ये जे दहावी, बारावी झालेले विद्यार्थी असतील, त्यांना प्रवेश घ्यायचा असेल तर त्या प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची भूमिका त्याठिकाणी आग्रहाने मांडण्याची काळजी घेतली पाहिजे आणि त्यांना त्याठिकाणी आपल्याला मदत करावी लागणार आहे. म्हणून हे सगळं काम अत्यंत महत्त्वाचं असं काम आहे.



डॉ. काळेंनी याठिकाणी सांगितलं, की मागच्या दुष्काळाच्या वेळी आंबेजोगाईच्या सगळ्या भागामध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची शिबिरं घेतली आणि दुष्काळामध्ये सापडलेल्या लोकांना आरोग्यविषय सुविधा देणं त्यादृष्टिनं आरोग्यविषयक कॅम्प आयोजित केले. आपले आप्पासाहेब शिंदे हे या देशातल्या फार्मसी विक्रीची जी शॉप्स आहेत, त्याचे देशाचे अध्यक्ष आहेत. ते आपल्याला हमीची औषधे मोफत देतात. त्यामुळं आपण औषधे घेवू, डॉ. काळे त्याठिकाणी डॉक्टर्स देतील आणि त्या माध्यमातून दुष्काळातल्या लोकांसाठी कॅम्प आयोजित करण्याचं काम आपल्याला करावं लागेल. तुम्ही डॉ. काळेंशी संपर्क साधा. ते तुम्हाला तुमच्या सोयीच्या तारखा देतील, डॉक्टर्स आणतील, तुमच्या शिबिरात येतील, वैद्यकीय तपासणी करतील आणि औषधांची जी गरज आहे तीसुद्धा भागवायची व्यवस्था करता येईल. हा सगळा उपक्रम आपण अशा भागामध्ये घ्यायची खरं तर गरज आहे आणि त्या कामाकडं मला वाटतं की आपण लक्ष द्यावं.

आज टँकर्सची मोठी कमतरता आहे. आज पाणी द्यायलासुद्धा हे टँकर्स सरकारच्यावतीनं काय मिळतील ते मिळतील, पण आपापल्या भागातल्या संस्था, सहकारी संस्था, नगरपालिका, जिल्हा परिषदा, त्याशिवाय काही उद्योग, व्यापारी या सगळ्यांना विनंती केली आणि एखाद-दुसरा टँकर जर त्यांनी दिला, टँकरची व्यवस्था केली किंवा जेसीबीची व्यवस्था केली तर आपण गावाच्या लोकांना सांगू शकतो, की तुम्ही डिझेल द्या, ड्रायव्हरची व्यवस्था तुम्ही करा, हे वाहन आम्ही तुमच्यासाठी देतो. या पद्धतीनं आपण आपल्या संघटनेच्यावतीनंसुद्धा पाणी आणि नाला खोलीकरण असे जे कार्यक्रम असतात, त्या सगळ्या कामांना एकप्रकारची गती देवू शकतो. आणि म्हणून या सगळ्या कामामध्ये अधिक लक्ष केंद्रीत करायची भूमिका आपण इथून गेल्याच्यानंतर केली पाहिजे.

आणखी एका प्रश्नासंदर्भात, ज्याचा उल्लेख याठिकाणी केला गेला, की आपण या सगळ्या कामाचं नियोजन निवडणुकीचा निकाल 23 तारखेला आहे, तो ओपन झाल्याच्यानंतर कुठच्याही कामाला जमायचं असं त्यांनी सुचवलं आणि एका आठवड्याच्या आत जमायची तयारी त्यांनी दाखवलेली आहे. मला वाटतं, की पाच-सात दिवसांत काही होणार नाही. पण दिल्लीमध्ये निवडणुकीचा निकाल लागल्याच्यानंतर लगेचच्या लगेच काय सरकार बनत नसतं. तिथे काही आठ दहा दिवस जावे लागतात. बाकीचे उद्योग करावे लागतात. त्यामुळं तुम्ही त्या आठ दहा दिवसांत आम्हाला कामाला ठेवू नका. त्या वेळेला दुसरीही कामं असतील. आपलेही खासदार यावेळेला चांगले निवडून येतील असं दिसतंय. त्यामुळं एक आठ दहा दिवस जावू द्या. ते झाल्याच्यानंतर पुन्हा एकदा प्रांताध्यक्ष बोलतील, त्यावेळेला जिल्ह्यातल्या प्रमुख लोकांबरोबर बसून मतदारसंघनिहाय चर्चा करावी लागेल. त्याची वेगळी चर्चा करू.

आज आपलं प्राधान्य दुष्काळ, पशुधन वाचवणं, पीक वाचवणं, फळबागा वाचवणं आणि दुष्काळग्रस्त आपल्या सहकाऱ्यांना पूर्ण ताकदीनं मदत करणं हा एककलमी कार्यक्रम याठिकाणी घ्यायचा आहे. नंतरच्या कार्यक्रमाचा विचार आपण नंतर करूया. आज याच्यामध्ये विचार करायची गरज नाही. फक्त एकच आहे, की अध्यक्ष पुन्हा पुन्हा जे बूथ कमिटीचं महत्त्व आपल्याला सांगतायंत, त्याची नोंद आपण फार गांभीर्यानं घेतली पाहिजे. कारण त्याच्याशिवाय पर्याय नाही. आता या निवडणुकीच्या सगळ्या पद्धती बदलतायंत. माझी खात्री आहे, की आणखी दहा वर्षांनी निवडणुका आजपर्यंत करत होतो, तशा पद्धतीच्या होणार नाहीत.

आपल्याला आठवत असेल, की पूर्वी निवडणुका म्हटल्या की मोठे पोस्टर्स लावायचे पण आता कुठे दिसतं का? आज व्हॉटस्‌अ‍ॅपसारखे हे सगळं सुरू झालेलं आहे. त्यामुळं साहजिकच आहे, या सगळ्या पद्धती बदलतायंत. त्या बदलत्या पद्धती लक्षात घेवून आपली भूमिका लोकांच्यासमोर मांडण्याच्या संबंधीचे वेगवेगळे तंत्र आहेत हे तंत्र आपल्याला यशस्वी करायचं असेल तर शेवटी बूथवर काम करणारे आपले सहकारी सगळ्यात महत्त्वाचे घटक आहेत आणि त्याची काळजी हे जे अध्यक्ष सांगतायंत, त्या

पद्धतीनं आपल्याला घ्यावी लागेल. त्याचा विचार आपण आणखी काही दिवसांनी करू एवढंच याठिकाणी सांगायचंय.

आणखी एक, सुरूवातीला आपण जो ठराव केला त्याच्यामध्ये एक चिंताजनक गोष्ट महाराष्ट्रामध्ये घडली. परवा गडचिरोलीला आपल्या 16 जवानांची हत्या त्याठिकाणी झाली आणि एकंदर नक्षलग्रस्तांसंबंधी राज्य सरकारचं एक लक्ष हवंय, त्या पद्धतीचं लक्ष नसल्याने ही किंमत द्यावी लागली आहे. तुम्हाला आठवत असेल, की मुख्यमंत्री कुठून येतात तर विदर्भातनं. नक्षलवाद्यांचा प्रश्न कुठं जास्त आहे, तर विदर्भात. काल मी टीव्हीवर पाहिलं, की गडचिरोलीला मुख्यमंत्री गेले. ठीक आहे, जवानांना आदरांजली देण्याच्या सन्मानासाठी ते गेले. त्याच्याबद्दल माझी काही तक्रार नाही. पण आपल्या चार वर्षाच्या कालखंडामध्ये कितीदा गेले गडचिरोलीला आणि याउलट तुमचा अनुभव वेगळा आहे, की तुमचे सहकारी आर. आर. पाटील हे गृहस्थ मला त्याठिकाणी पालकमंत्रिपद द्या असं म्हणून दर महिन्यातून कितीदा जात होते माहित नाही, पण महिन्यातून किमान एक दोन तरी त्यांच्या चकरा असायच्या. आणि मला अधिकाऱ्यांनी एक दिवस त्यांच्याबद्दल तक्रार केली, की गडचिरोलीच्या एकदम



आतल्या भागात राज्याचा गृहमंत्री मोटारसायकलवरून जातो. तिथल्या लोकांना भेटायला आणि तिथल्या लोकांना धीर द्यायला. म्हणजे आपण हे चित्र पाहिलं, की एक गृहमंत्री मला तिथलं काम द्या म्हणतो, तिथल्या लोकांमध्ये जावून त्यांचा विश्वास संपादन करतो, त्यांचा आत्मविश्वास वाढवतो, अधिकाऱ्यांचा आत्मविश्वास वाढवतो आणि तिथल्या विकासकामांना गती देतो आणि त्याच्यातून नक्षली विचार कसा थांबवता येईल याबद्दलची काळजी घेतो हा अनुभव एका बाजूला आपल्यापुढे आहे आणि दुसऱ्या बाजूला फक्त हत्या झाल्याच्यानंतर चक्र वहायला जाणारे दुसरे गृहमंत्री हे चित्र आपल्याला बघायला मिळतं.

हे अतिशय चिंताजनक चित्र आहे. गंभीर चित्र आहे. आम्ही तर त्यांना सांगितलंच, की तुम्हाला सत्तेवर राहण्याचा नैतिक अधिकारच नाही. इतक्या मोठ्या प्रमाणात हत्या होतायंत आणि सातत्यानं होतायंत आणि काहीच केलं जात नाही, ही गोष्ट काही योग्य नाही. आपण त्यांच्या दुखवट्यामध्ये सहभागी आहोत. पण मला असं वाटतं, की त्या भागातले आपले सहकारी असतील, कार्यकर्ते असतील, त्यांना पक्ष म्हणून धीर द्यावा लागेल. आज हे संकट महाराष्ट्रावरचे संकट आहे. हे संकट संसदीय लोकशाही पद्धतीवर ज्यांचा विश्वास नाही अशा लोकांच्याकडून संकट आहे. आणि म्हणून या प्रश्नाच्याकडं एका वेगळ्या दृष्टिकोनातून राज्य सरकारनं बघायची गरज आहे.

माझ्याकडं ज्यावेळी राज्य सरकारची जबाबदारी होती, त्यावेळी मीसुद्धा अनेकदा त्या भागात जात असे. आणि मी नंतर पोलिस अधिकाऱ्यांशी आणि राज्य सरकारमधील आयएएस अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेतली आणि त्यांना सांगितलं, की मी हा कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न मानतच नाही. नक्षल हा प्रश्न विकासाच्या संदर्भात दुर्लक्ष केलं गेलं, एखादा परिसर मागं राहिला गेला, त्याच्यामुळं लोकांच्यात नाराजी आणि अस्वस्थता आहे आणि या नाराजी आणि अस्वस्थेचा फायदा घेणारी नक्षल प्रवृत्ती ही पुढं आली आणि ती पुढं येत असताना त्यांना विकासही नको होता, त्यांना लोकांना तसंच ठेवायचं होतं आणि त्यामुळं त्या काळात आम्ही एक नवीन धोरण आखलं, की हा लॉ अँड ऑर्डरचा विषयच नाही, हा कायदा आणि सुव्यवस्था तसेच विकास असा संयुक्त कार्यक्रम आहे आणि म्हणून त्यावेळेला महाराष्ट्राच्या अंदाजपत्रकामध्ये गडचिरोली आणि चंद्रपूर या दोन जिल्ह्यांच्यासाठी स्वतंत्र बजेट आपण दिलं होतं विकासासाठी. कारण तिथला विकास जोपर्यंत आपण करत नाही, सगळे प्रश्न जोपर्यंत सोडवत नाही, तोपर्यंत सामान्य माणूस हा नक्षलवाद्यांच्या विरोधात उभा राहणार नाही. त्याच्याकडं दुर्लक्ष जर केलं तर सामान्य माणूस हा नक्षलवाद्यांना, सहानुभुतीचा एक हिस्सेदार बनतो आणि ते बनवण्यासाठी एक वेगळं सूत्र हे बघण्याची गरज होती.

माझी आजच्या मुख्यमंत्र्यांच्याकडून अपेक्षा होती, ते नागपुरातून, विदर्भातून येतात आणि त्यामुळं या प्रश्नाकडं अधिक गांभीर्यानं बघतील. पण ते काही बघितलं गेलं नाही आणि त्याच्याचमुळं आज सोळा जवानांना एवढी मोठी किंमत आपल्याला द्यावी लागली. पण याच्यातनं आपल्याला काही राजकारण करायचं नाही. जे घडलं ते वाईट आहे. राज्यकर्ते दुर्लक्ष करतात, त्याच्याबद्दलची आपली तीव्र नापसंती आहे. एवढंच मला यासंबंधी आपल्याला सांगायचंय. यापेक्षा अधिक बोलून आपला वेळ घेण्याची आवश्यकता नाही. लोकसभा निवडणुकीदरम्यान मी महाराष्ट्रामध्ये बघितलं, की आपल्या कार्यकर्त्यांनी जेवढे कष्ट केले, जिथं आपला उमेदवार असेल तिथेही केले, जिथं आपला उमेदवार नाही, तिथेही केले आणि मला अनेक काँग्रेसच्या उमेदवारांनी सांगितलं, की आमच्यापेक्षा तुमचे कार्यकर्ते अधिक कष्टाने काम करत होते. त्याबद्दल तुम्हा सगळ्यांना मन:पूर्वक अभिनंदन करतो.

# दुष्काळासंबंधी राष्ट्रवादी मुख्यमंत्र्यांना निवेदन देणार



मुंबई दि. ४ मे – राष्ट्रवादी काँग्रेसचे शिष्टमंडळ प्रदेशाध्यक्षांच्या नेतृत्वाखाली दुष्काळ निवारणासाठी मुख्यमंत्र्यांची भेट घेणार असून आमच्या काळात केलेल्या उपाययोजना आणि आजच्या परिस्थितीत काय उपाययोजना केल्या पाहिजेत याचे निवेदन देणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी पत्रकार परिषदेत दिली. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी निवडणूकांची रणधुमाळी संपते ना संपते तोच सोलापूर आणि उस्मानाबाद या दुष्काळी जिल्हयाच्या पाहणी केली. तिथल्या दुष्काळी जनतेशी संवाद साधल्यानंतर आज सकाळी राष्ट्रवादी काँग्रेसची महत्वपूर्ण बैठक घेतली. त्यानंतर शरद पवार यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

दुष्काळ निवारणासाठी काय काय उपाययोजना करता येतील याबाबत राष्ट्रवादीच्या नेत्यांची आज बैठक घेण्यात आली. या बैठकीत परतीचा पाऊस अनेक जिल्ह्यात पडलेला नाही. पर्जन्यछायेत महाराष्ट्रातला बराचसा भाग येतो. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्रातील काही भागात गंभीर दुष्काळ परिस्थिती आहे. पिण्याचे पाणी, रोजगार, चारा छावण्या या तीन उपाययोजना कराव्या लागतात. यासोबतच पिक जर वाया गेले तर त्याला मदत करावी लागते. विशेषत: फळबागांना विशेष मदत द्यावी लागते. कारण फळबागांचा फायदा मिळायला पाच ते दहा वर्ष जातात. त्यामुळे दुष्काळात फळबागायतदारांचे जास्त नुकसान होते या विषयावरही चर्चा झाली. फळबागा वाचवण्यासाठी विशेष उपाययोजना करावी, यावर आमचा भर असणार आहे. पुर्वीचे सरकार चारा छावण्यात शेतकऱ्यांची सरसकट जनावरे घ्यायचे. मात्र आज शेतकऱ्यांचे फक्त पाच जनावरे घेण्याचे बंधन आहे. तसेच प्रत्येक जनावरामागे फक्त ९० रुपये खर्च केले जातात. ते पुरेसे नाहीत. सध्या राज्यात चारा छावण्यात कडबा दिला जातोय, मात्र तो अपुरा आहे. त्यासोबत ऊसाचे वाढे खायला दिले जात आहे, त्यामुळे जनावरांची जीभ कापली जाते.यासोबतच सरकारने सर्व प्रकारच्या वसुली तात्काळ थांबवावी. पिक कर्ज आता शेतकरी देवू शकत नाही. त्यामुळे पुढील काळात कर्जाचे पुर्नगठन करणे आणि पाऊस सुरु झाल्यानंतर शेतकऱ्याला बी–बियाणे, खत विकत घेण्यासाठी पुन्हा कर्ज स्वरुपात मदत दिली गेली पाहीजे अशी मागणी करण्याबाबत बैठकीत चर्चा झाली अशीही माहिती शरद पवार यांनी दिली. त्यासोबत जूनमध्ये महाविद्यालय सुरु होणार आहेत. शैक्षणिक शुल्क माफ केल्यास विद्यार्थी वर्गाला दिलासा मिळू शकेल. या मागण्यांचा आराखडा बनवून सरकारकडे दिला जाईल. राज्याला या अडचणीतून बाहेर काढण्यासाठी सर्वांनी एकत्र प्रयत्न करणे गरजेचे आहे असेही शरद पवार म्हणाले. तसेच सहकारी संस्था, सीएसआर यातूनही शेतकऱ्यांना मदत दिली जावी. तसेच आमिर खानने सुरु केलेल्या वॉटर कपला जास्तीत जास्त लोकांनी पाठिंबा द्यावा अशी सूचनाही शरद पवार यांनी केली. राष्ट्रवादीची विद्यार्थी आणि युवक संघटना दुष्काळग्रस्त भागात काम करणार असल्याचेही शरद पवार यांनी जाहीर केले. सरकारने दुष्काळाचे गांभीर्य घेतले नाही. पंतप्रधानांनी राज्यात सहा ते सात सभा घेतल्या. यात राजकीय टीका होतच राहिली. शरद पवारवर टीका करणे त्यांचा उद्देश असू शकतो. मात्र राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर काय काम करणार? हे सांगण्याची संधी त्यांनी गमावली असा थेट आरोपही शरद पवार यांनी सरकारवर केला. निवडणूक आयोगाची काहीच अडचण नाही आम्ही २०१४ साली निवडणूक आयोगाला फोन वर सांगायचो की, आम्हाला दुष्काळासाठी अमुकतमुक काम करायचे आहे, त्यानंतर एक – दोन तासात आम्हाला आयोगाची परवानगी मिळून जायची. कारण आयोग देखील या देशातीलच आहे. मात्र हे सरकार आयोगाच्या कोणत्या परवानगीसाठी थांबले आहे, माहीत नाही अशी जोरदार टिकाही शरद पवार यांनी केली.

लोकसभा निवडणूक झाल्या झाल्या मी दुष्काळ दौरा केला त्यामुळे सरकार जागे झाले आणि त्यांनी बैठका घ्यायला सुरुवात केली. मी जर दौरा केला नसता तर तेही झाले नसते असेही शरद पवार पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. गडचिरोलीतील प्रकार चिंताजनक आहे. मी मुख्यमंत्री असताना नक्षलवादाची सुरुवात झाली होती. पण आम्ही त्याकडे फक्त कायदा आणि सुरक्षेचा प्रश्न म्हणून पाहीले नाही. तर विकासापासून वंचित राहिलेल्या या परिसराला विकासात कसे आणता येईल? याकडे लक्ष दिले. जर त्यांच्याकडे दुर्लक्ष केले गेले तर नक्षली लोकांच्या नाराजीचा फायदा उचलतात असेही शरद पवार म्हणाले. पूर्वीचे राज्य असताना राज्याचे गृहमंत्री सांगलीचे असूनही त्यांनी गडचिरोलीचे पालकत्व घेतले होते असे स्थानिक लोक मला सांगत होते. मात्र आत्ताचे गृहमंत्री फक्त पुष्पचक्र वाहण्यासाठी गडचिरोलीला जातात हे चित्र चिंताजनक आहे असा टोलाही शरद पवार यांनी लगावला.



लग्न झाले की संसाराला सुरुवात होत असते हे खरे असले तरी लग्न म्हणजेच संसार नव्हे याची आठवण ठेवणे गरजेचे असते. लग्न ही एक दिवसाची हौसमौज असते तर, संसार अनेक वर्षे रोज नेटाने रेटावा लागतो. लग्नामध्ये नातेवाईक, जेवणावळी, मानपान, देवघेव, आहेर, सजावट यांची रेलचेल असते. तर, एकदा का प्रपंच चालू झाला की भवतालचा सगळा गोतावळा विरून जातो. संसारातील रोजच्या चढउतारांना मग त्या नवराबायकोलाच सतत तोंड द्यावे लागते. लग्नाचा नोकझोक पार उतरतो आणि प्रपंचातील कटकटींचा सामना करत कुटुंब चालवण्याखेरीज त्या दांपत्यासमोर पर्यायही उरत नाही. निवडणुका लढवणे आणि सरकार चालवणे यांचे नातेही, एक दिवस मोठ्या थाटामाटात



# वाट संसाराची बिकट









**अभय टिळक**
ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ

लग्नाचा बार उडवून देणे आणि मग अनंत काळ संसार चालवत राहणे यांच्यादरम्यानच्या नातेसंबंधांसारखेच असते. दिल्लीतील सत्तासुंदरीबरोबर 23 मे 2019 या दिवशी ज्या पक्षाचे लग्न लागेल तो 'सरकार' नावाचा संसार त्या नंतर मांडेल. मतदानाच्या निमित्ताने निवडणुकीच्या समारंभात सहभागी झालेले 'मतदार'नामक वऱ्हाडी नवीन सरकार देशाचा संसार कसे चालवते याकडे मग डोळ्यांत तेल घालून बघत राहतील.

आपला घरातील चारचौघांचा प्रपंच चालवणे आणि भारतासारख्या खंडप्राय देशाचा संसार नीट राबवणे यांत जमीनअस्मानाचा फरक आहे. संसार कोणताही असो, तो टाकटुकीने चालवण्यासाठी पैसा लागतोच.

सरकार असो वा एखादा प्रापंचिक, पैशाचे सोंग कोणालाच आणता येत नसते. बळजबरीने कोणी तसे सोंग आणलेच तर ते चार दिवसांत उघडे पडते. लग्न करून संसार मांडण्याची स्वप्ने बघणारे जोडपे प्रपंच कसा चालवायचा या संदर्भात काही एक आखणी मनाशी करत असतेच. 23 मे 2019 नंतर, समजा,







भारताचा संसार चालवण्याची जबाबदारी आपल्याकडे आलीच तर त्या प्रपंचाचे गणित आपण कसे मांडणार-सोडवणार आहोत याचा काही एक आलेख काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष या दोन्ही विवाहोत्सुकांनी निवडणूक जाहीरनामा नावाच्या दस्तऐवजाद्वारे वऱ्हाडी मंडळींच्या पुढ्यात मांडलेलाच आहे. आता, या दोन्ही पक्षांनी दाखवलेल्या त्या सुखस्वप्नांची पूर्तता कितपत, कशी आणि केव्हा होते याची उत्कंठा सगळ्यांनाच आहे. लग्नानंतरचे सगळेच दिवस सारखे नसतात. 'हनिमून'ची नवलाई सरली की प्रपंचाचे चटके जाणवायला लागतात. संसार रेटताना कोणकोणत्या समस्यांचा सामना करावा लागणार आहे याची मग नीट जाणीव होऊ लागते.

थोड्याच काळानंतर केंद्रामध्ये जो कोणता पक्ष संसार मांडेल त्याच्या पुढ्यातील आर्थिक आव्हानांची यादी कमालीची तगडी आहे. दुर्दैवाची बाब म्हणजे, निवडणूक प्रचाराच्या सगळ्या हंगामात देशाच्या अर्थकारणापुढील कठीण समस्यांबाबत कोणीच स्पष्ट व स्वच्छ बोलत नव्हते. सगळ्या प्रचाराचा झोत हा 'नॉन-इश्यूज्'वर कसा राहील, याचीच काळजी सगळ्या सत्ताधाऱ्यांनी घेतली. सर्वसामान्यांना कळीचे जे मुद्दे वाटतात त्यांच्याकडे प्रचार फिरकलाच नाही. देशातील उदंड बेकारी, चांगल्या नोकऱ्या मिळत नसल्याने हतबल आणि अस्वस्थ असलेली तरूणाई, कुंठित बनलेला ग्रामीण भारत, वाढत्या दर एकरी उत्पादनखर्चापायी गांजलेला अल्पभूधारक व कोरडवाहू शेतकरी, प्रचंड तीव्र बनत चाललेल्या स्पर्धेमध्ये टिकाव धरण्याची क्षमता, क्षीण बनत चाललेले देशातील लघु तसेच मध्यम उद्योगव्यवसाय, हातावरती पोट असलेले आपल्या देशातील असंघटित क्षेत्रात रोजीरोटी कमावणारे कोट्यावधी मजूर, वाढती प्रादेशिक विषमता, ठप्प होऊन बसलेली गुंतवणूक, सरकारची वाढती तूट, कच्च्या खनिज

तेलाच्या बाजारभावांची कमान चढती भाजणी दाखवण्याची चिन्हे, तेलाच्या दरवाढीद्वारे निपजणारी सर्वसाधारण महागाई, 2019 सालातील मॉन्सूनबाबतची चिंता...अशा अनेकानेक रोकड्या समस्यांची यादी मारूतीरायाच्या शेपटासारखी सतत





वाढणारी असूनदेखील, सत्ताधारी पक्षाच्या उन्मादी व बेछूट प्रचारादरम्यान त्यांच्या निराकरणाबाबत तर सोडाच पण या भीषण समस्यांच्या अस्तित्त्वाबाबत कोठे





'ब्र'देखील निघाला नाही, ही सर्वांत मोठी शोकांतिका म्हणावयास हवी. खरे तर ही बाब अत्यंत संतापजनक अशीच होय.

परंतु, म्हणून आपल्याला गाफील राहून चालणार नाही. सुजाण नागरिक आणि निवडणुकीद्वारे आपले शासक ठरवणारे मतदार या नात्याने आपल्या देशाच्या अर्थकारणाच्या पुढ्यात उभ्या असलेल्या ताबडतोबीच्या आव्हानांची पुरेशी जाणीव आपल्याला असायलाच हवी. ती तशी नसेल तर आपणच निवडून दिलेल्या सरकारच्या कामगिरीचे काटेकोर मूल्यमापन करण्यासाठी आपल्या हातात काहीच साधन उरणार नाही. त्या दृष्टीने आजघडीला भारतीय अर्थव्यवस्थेच्या पुढ्यातील जटिल व कळीची आव्हाने, त्यांचे स्वरूप, त्या समस्यांची आजवर होत आलेली जडणघडण आणि त्यांच्या सोडवणुकीच्या संभाव्य दिशा या संदर्भातील आपले आकलन तरी पायाशुद्ध असण्याची गरज आहे. कारण, अर्थसाक्षरतेची इयत्ता काही किमान पातळीपर्यंत उंचावलेले समाजच इथून पुढे सत्ताधाऱ्यांना जागे राहणे भाग पाडतील. त्या दृष्टीने आपल्या भवतालातील अर्थवास्तव नीट न्याहाळले तर दिसणारे चित्र कसे आहे ? सभोवतालचे अर्थवास्तव आज कमालीचे अनिश्चित आहे, ही पहिली बाब आपण सगळ्यांनीच नीट समजावून घेणे अत्यंत गरजेचे आहे. ही अनिश्चितता सर्वस्तरीय आणि सार्वत्रिक आहे. वैश्विक अर्थकारण जितके अनिश्चित आहे तितकेच देशी अर्थकारणही अस्थिरतेच्या पर्वातून वाटचाल करते आहे. 23 मे 2019 नंतर देशाचा संसार पेलणाऱ्या सरकारला मुख्य आव्हान राहील ते याच अस्थिर आर्थिक पर्यावरणाचे.

मुळात, आजची जागतिक परिस्थितीच कमालीची अनिश्चित बनलेली आहे. तसे बघितले तर वैश्विक अर्थकारणाच्या पाचवीला अस्थिरता पुजली गेली ती 2008 सालातील सप्टेंबर महिन्यात अमेरिकी अर्थकारणात झालेल्या ‘सब्प्राइम’ कर्जांच्या स्फोटापासून. जागतिक अर्थव्यवस्था त्या दणक्याने पार मंदीच्या खाईत लोटली गेली. आता, त्या नंतर पुरती 11 वर्षे उलटत आली तरी वैश्विक अर्थकारणाचा तेव्हापासून ढासळलेला नूर आजही सावरलेला नाही. ही सारी अस्थिरता साधारणपणे 2020 सालाच्या आगेमागे सरावी असा अनेक अर्थतज्ज्ञांचा कयास होता. परंतु, आजचे चित्र अधिकच गुंतागुंतीचे बनलेले आहे. त्याला कारणीभूत आहे ते डोनल्ड ट्रम्प यांचे राजकारण. कडव्या आर्थिक राष्ट्रवादाचे हाकारे उठवतच ट्रम्प यांनी अमेरिकी सत्तेचे दोर हाती घेतले आणि त्याच धोरणाची तामिली ते आता करत आहेत. त्यांपायी सगळ्यांत मोठी गोची झालेली आहे ती चीनची. दोन बलदंड हत्तींची झुंज जुंपल्यानंतर आजूबाजूचा झाडझाडोरा त्या धुमाकुळात जमीनदोस्त होतो तशी सध्या जगातील अनेक अर्थव्यवस्थांची स्थिती आहे. ट्रम्प यांच्या आर्थिक राष्ट्रवादापायी अमेरिका आणि चीन यांच्यादरम्यान जो व्यापारी ताणतणाव ट्रम्प सत्ताधीश झाल्यापासून सतत नांदतो आहे त्यांपायी उभ्या जागतिक व्यापाराचाच श्वास कोंडत चाललेला आहे. दुसरीकडे, युरोपीय समुदाय आणि ब्रिटन यांच्यादरम्यानची जंगडफक्कडही रंगलेलीच आहे. ‘ब्रेक्झिट’संदर्भात ब्रिटिश नागरिकांच्या कौलापायी उद्भवलेली अवस्था ‘धरले तर चावते आणि सोडले तर पळते’, अशी बनलेली आहे. तिसरीकडे, इराणकडून तेलखरेदी करणाऱ्या देशांवर निर्बंध जारी करण्याचा आसूड ट्रम्प यांनी उगारल्याने, आखातातील आणि पर्यायाने कच्च्या खनिज तेलाच्या जागतिक पुरवठ्यासंदर्भातील अनिश्चितता पुन्हा एकवार बळजोर बनते आहे. त्या अनिश्चिततेचा फटका तेलाच्या बाजारभावांना बसला की जगातील अनेक अर्थव्यवस्थांना चटके बसायला सुरुवात होईल. त्याला भारतही अपवाद असणार नाही. जागतिक स्तरावरील उभे अर्थचित्र आज इतके आणि असे अनिश्चित आणि त्यापायीच अस्थिर बनलेले आहे की, नजीकच्या भविष्यातदेखील वैश्विक अर्थकारण नेमके कसे दिसेल यांबाबत अगदी कसलेले अर्थवेत्तेही मौन बाळगणेच पसंत करतील.








या सगळ्या अशा अस्थिर, अनिश्चित वैश्विक माहौलात नव्याने सत्तारूढ होणाऱ्या सरकारला त्याचा अर्थसंकल्प येत्या काही दिवसांतच सादर करावा लागेल. भारतीय अर्थव्यवस्थेतील जवळपास सगळ्यांच घटकांना आज खरी उत्कंठा लागून राहिलेली आहे ती त्याचीच. आपल्या देशातील संघटित कॉर्पोरेट विश्व आजघडीला कोणताही महत्त्वाचा निर्णय घेण्याच्या मन:स्थितीत नाही. कारण, देशाच्या अर्थकारणाचे जहाज हाकणाऱ्या सरकारचे धोरण नेमके कसे असणार आहे याचा काही तरी अंदाज उद्योगविश्वाला

येईल तो नवीन सरकारच्या पहिल्या अर्थसंकल्पादरम्यानच. नव्याने सत्तारूढ होणाऱ्या सरकारच्या अर्थसंकल्पाचे रंगरूप नेमके कसे राहील, हेही पुन्हा निर्भर असेल ते नवीन सरकारच्या रंगरूपावर. एकपक्षीय सरकार केंद्रात आले तर आर्थिक आघाडीवरील अनिश्चितता बऱ्याच अंशी आटोक्यात येईल. मात्र, संमिश्र सरकारच्या हातात सत्तेच्या दोऱ्या गेल्या तर अर्थकारणाच्या भवितव्यासंदर्भातील अनिश्चितता अधिकच गहिरी बनेल. कारण, नव्याने सत्तारूढ होणाऱ्या सरकारची पक्षीय जडणघडण कशी असेल त्यांवर त्या सरकारच्या अर्थविषयक धोरणांचा चेहरामोहरा अवलंबून राहील. जागतिक स्तरावरील तसेच देशांतर्गत आर्थिक अनिश्चिततेपायी बेचैन असणाऱ्या देशी कॉर्पोरेट विश्वाला सरकारच्या रंगरूपापेक्षाही असोशी आहे, ती किमान आर्थिक आघाडीवरील काही धोरणात्मक स्थैर्याची. कोणतेही सरकार दिल्लीमध्ये उद्या सत्ताधीश बनले तरी सध्याच्या स्थितीत त्या सरकारला तोंड द्यावे लागणाऱ्या आर्थिक आव्हानांची यादी मोठी आहे आणि बिकटही आहे. मुख्य आव्हान आहे ते अर्थकारणाच्या प्रगतीचा वेग टिकवून धरण्याची. भारतीय अर्थव्यवस्थेची जागतिक क्रमवारी आमच्याच कारकिर्दीदरम्यान भरघोस सुधारली असा डंका मोदी सरकारने भले कितीही पिटला तरी, 2018-19 या वित्तीय वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेच्या आगेकूचीचा सरासरी दर सात टक्क्यांच्या आसपासच राहील, असे अगदी अलीकडे खुद्द मोदी सरकारच्याच अर्थमंत्रालयाने कथन केल्याने वल्गना आणि वास्तव यांच्यादरम्यानची तफावत पृष्ठभागावर आलेली आहे. 2018-19 या वित्तीय वर्षात भारतीय अर्थव्यवस्था साधारणपणे 7.3 टक्के वाढ दाखवेल असा प्राथमिक अंदाज होता. मग तो अंदाज 7.2 टक्क्यांवर आणण्यात आला. आता तर, खुद्द अर्थमंत्रालयच वाढीची मात्रा सात टक्क्यांच्या आसपास राहील, असे सांगते आहे. त्याच वेळी, 2018-19 या वित्तीय वर्षादरम्यान सरकारच्या तिजोरीत जमा होणे अपेक्षित असलेल्या करमहसुलातही घट होण्याचा अंदाज करसंकलन विभागाची प्राथमिक आकडेवारी सांगते. हा अंदाज खरा शाबीत झाला तर, भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाटचालीची सरासरी गती वास्तवात सात टक्क्यांपेक्षाही कमी राहते आहे किंवा कसे, अशी शंका बळकट झाल्याखेरीज राहात नाही. करसंकलनामध्ये अपेक्षेच्या तुलनेत खरोखरच घट येणार असेल तर







साहजिकच वित्तीय तुटीची दरी किती रुंदावेल, हा मुद्दा कळीचा बनतो. सात टक्के ही भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीची गती सध्याच्या जागतिक पार्श्वपटावर आकर्षक दिसते, हा मोदी सरकारचा दावा एक वेळ घटकाभर मान्य केला तरी त्यांमुळे देशी अर्थकारणाच्या पुढ्यातील समस्या हलक्या होत नाहीत, हा मुद्दा आहे.

भारतीय अर्थकारणाची आगेकूच दमदार राहणे इथून पुढच्या काळात कळीचे ठरत राहील ते दोन कारणांपायी. आपल्या देशात सणसणीत मात्रेने उपलब्ध असणाऱ्या तरूण मनुष्यबळाच्या ठायी वसणाऱ्या सर्जनशीलतेला सकारात्मक वाट करून द्यावयाची तर सरासरी नऊ ते दहा टक्के दराने किमान 10 वर्षे तरी भारतीय अर्थव्यवस्थेला आगेकूच करत राहण्याखेरीज अन्य पर्यायच नाही. दुसरे म्हणजे, सरकारच्या वित्तीय तुटीवर नियंत्रण राखायचे तर आर्थिक वाढविस्ताराची वार्षिक सरासरी गती मजबूत राखण्याखेरीज गत्यंतर नाही. नाही तर सरकारच्या तिजोरीत करमहसुलाचा बळजोर प्रवाह सतत वाहता राहणे शक्यच बनणार नाही. तसे झाले की वित्तीय तुटीची दरी रुंदावेल आणि मग अर्थकारणाची सगळीच घडी विस्कटून जाईल. 2018-19 या वित्तीय वर्षामध्ये अपेक्षेपेक्षा भारतीय अर्थव्यवस्थेच्या आगेकूचीचा दर खाली




राहण्यामागे केंद्र सरकारच्या अर्थमंत्रालयाने (संभाव्य) कारणांची जी जंत्री सादर केलेली आहे ती खऱ्या अर्थाने मननीय ठरते. नवी दिल्लीमध्ये नव्याने सत्तारूढ होणाऱ्या कोणत्याही पक्षाच्या सरकारला ती कारणमीमांसा नजरेआड करता येणार नाही.

भारतीय अर्थव्यवस्थेची 2018-19 या वित्तीय वर्षातील कामगिरी अपेक्षेइतकी झळाळीची न ठरण्यामागे अर्थमंत्रालयाने सादर केलेली कारणे चौपदरी आहेत. शेतीक्षेत्राची कमालीची निस्तेज कामगिरी हा झाला त्यांतील पहिला व मुख्य पदर. ठप्प होऊ पाहत असलेली नवीन औद्योगिक गुंतवणूक हा आहे कारणपरंपरेतील दुसरा पदर. खालावलेला देशांतर्गत उपभोग (कन्झमशन) हे आहे तिसरे कारण. तर, निस्तेज निर्यात हा आहे कारणमीमांसेतील चौथा पदर. या चारपैकी एकाही घटकाची चर्चा सुटी अथवा अलगपणे करणे केवळ चुकीचेच नव्हे तर अज्ञानपणाचे ठरेल. कारण, भारतीय अर्थव्यवस्थेची कामगिरी खालावण्यास कारणभूत असणारे हे चारही कारणप्रवाह परस्परांशी जैविकरीत्या जोडलेले आहेत. या समस्यांची मुळेच केवळ नव्हे तर खांद्याफांद्याही एकमेकांमध्ये गुंफलेल्या आहेत. इथे सगळ्यांत मोठा गुंता आहे तो भारतीय शेतीक्षेत्राच्या खचलेल्या अवसानाचा. त्यांतच आता भर पडते आहे ती बदलत्या वातावरणाची. गुंतवणुकीबाबत भारतीय शेतीच्या थेट 1980च्या दशकापासून सतत होत आलेल्या उपेक्षेची फळे उदारीकरणाचे पाव शतक उलटून गेल्यानंतर आता आपण सगळेच भोगतो आहोत. एकीकडे,

सिंचनाची क्षमता वाढवत असतानाच शेतीपूरक पायाभूत सेवासुविधांचा ग्रामीण भागातील पसारा वाढवण्यासाठी शासकीय गुंतवणुकीचा भरभक्कम काढा शेतीक्षेत्राला पुरवण्याखेरीज आता काहीही पर्याय नाही. ग्रामीण भागातील दळणवळण, कोठारे व गोदामांची साखळी, विकेंद्रीत बाजारव्यवस्था, शीतगृहांची साखळी, ग्रामीण भागात हमीचा वीजपुरवठा आणि शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांची साखळी अशी शेतीपूरक उपक्रमांची गुंफण केल्याखेरीज भारतीय शेती आणि शेतकरी यांचे नष्टचर्य हटेल, अशी आज तरी परिस्थिती नाही. या सगळ्यालाही पुन्हा आणखी एक तितकेच गहन परिमाण आहे आणि ते म्हणजे भारतीय शेतीची दर एकरी सरासरी उत्पादकता उंचावण्याचे.

अत्यंत दुर्दैवाची बाब म्हणजे, शेतीच्या उद्धारासंदर्भातील यच्चयावत चर्चांदरम्यान या मुद्याला कोणीही महत्त्वच देत नाही. जोवर विविध पिकांच्याबाबतीत दर एकरी उत्पादनाची आपल्या देशातील मात्रा उंचावत नाही तोवर किमान हमीभावांमध्ये सतत वाढ घडवून आणली तरी अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांच्या परिस्थितीमध्ये फारसा फरक पडणार नाही. या ठिकाणी, मग, भारतीय शेतीच्या दुरावस्थेचे निराकरण घडवून आणण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांची बीजे शेतीबाह्य क्षेत्रांमध्ये शोधण्याखेरीज गत्यंतर उरत नाही. मुळात, शेतकरी आणि/अथवा शेतमजूर या नात्याने उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे आपल्या अर्थकारणातील आजचे



अतिरिक्त प्रमाण, ही शेतीच्या उत्थानातील मुख्य धोंड ठरते आहे. यालाच अर्थशास्त्रीय परिभाषेत 'छुपी बेरोजगारी' असे म्हटले जाते. देशातील एकूणांपैकी जवळपास 80 ते 82 टक्के शेतकऱ्यांपाशी पाच एकरांपर्यंतचे लागणक्षेत्र असल्याची आकडेवारी या संदर्भात बोलकी ठरते. इतके अल्पस्वल्प भूधारण असलेला कोणताही शेतकरी शेतीसुधारणेसाठी आपल्या क्षेत्रामध्ये गुंतवणूक करू शकणार नाही. परिणामी, कमी गुंतवणूक, दुबळी उत्पादकता, खुरटलेली उत्पादनवाढ, त्यांपायी कमजोर राहणारे शेतीचे उत्पन्न, परिणामी, कुंठलेली गुंतवणूक...हे दुष्टचक्र सरता सरतच नाही. आपल्या देशातील लागवडक्षेत्र आणि शेतीवर अवलंबून असणारे मनुष्यबळ यांचे गुणोत्तर प्रमाण सुधारायचे असेल तर शेतीमध्ये गुंतलेले अतिरिक्त मनुष्यबळ शेतीमधून बाहेर काढण्याखेरीज अन्य मार्गच













नाही. त्यांखेरीज शेतीक्षेत्राची निस्तेज कामगिरी पालटणे अशक्य आहे. केंद्रीय अर्थमंत्रालयाच्या अगदी अलीकडील निवेदनातील शेतीविषयक विश्लेषणाचा मथितार्थ आहे तो नेमका हाच. आपल्या देशातील शेती आणि शेतकरी यांचे नष्टचर्य हटवण्यासाठीच्या उपायांची बीजे शेतीबाह्य क्षेत्रांमध्ये शोधण्याखेरीज पर्याय नाही, असे म्हणण्याचा

गाभा हाच. शेतीवर अवलंबून असणारे अतिरिक्त मनुष्यबळ बिगरशेती व्यवसायांमध्ये शोषून घेणे हाच शेतीच्या शाश्वात पुनरुत्थानाचा मार्ग ठरेल. त्यासाठीच आपल्या देशातील वस्तुनिर्माण उद्योगाची कामगिरी महत्वाची ठरते. वस्तुनिर्माण उद्योगांमधील रोजगारसंधींमध्ये भरपूर आणि सततची वाढ घडवून आणण्यात यश आल्याखेरीज भारतीय शेतीची दुरवस्था हटणार नाही. त्यासाठी खरी निकड आहे ती भारतीय उद्योगांच्या क्षेत्रातील गुंतवणुकीला चालना मिळण्याची. आणि खरी गोम आज आहे ती नेमकी इथेच.






केंद्र सरकारच्या अर्थमंत्रालयानेही नेमके बोट ठेवले आहे ते याच मुद्यावर. भारतीय अर्थव्यवस्थेमधील कुंठित बनलेली औद्योगिक गुंतवणूक हे 2018-19 या वित्तीय वर्षादरम्यानच्या भारतीय अर्थव्यवस्थेच्या कमअस्सल कामगिरीचे दुसरे कळीचे कारण ठरते, ही अर्थमंत्रालयाची मल्लीनाथी प्रस्तुत ठरते ती इथे आणि अशी. कुंठित बनलेली औद्योगिक गुंतवणूक हे भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये अलीकडील काळात प्रचंड गाजत असलेल्या थकित कर्जांच्या समस्येचा परिपाक आहे. थकित कर्जांच्या डोंगराचा साक्षात्कार आपल्या देशातील धोरणकर्त्यांना पहिल्यांदा झाला तो 2015 साली. भारतीय रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर डॉ. रघुराम राजन यांनी देशातील बँकिंग क्षेत्रामध्ये तुंबलेल्या थकित कर्जांच्या प्रकरणांची छाननी करण्याचा कार्यक्रम नेटाने प्रवर्तित केला आणि एकाएकी या भयकारी वास्तवाचे कंगोरे दिसायला लागले. 'ट्विन बॅलन्सशीट सिन्ड्रोम' ही शब्दावली आपल्या देशातील सार्वजनिक चर्चाविश्वाचा अविभाज्य घटक बनलेली आहे ती तेव्हापासून. बड्या उद्योगांनी उभारलेल्या कर्जांची परतफेड वेळापत्रकानुसार झाली नाही आणि त्यांपायी भारतीय बँका गोत्यात आल्या. या वास्तवाचे फटके दुहेरी बसतात. एकीकडे, उद्योगांच्या माथ्यावर परतफेड न झालेल्या कर्जांचा बोजा असल्याने त्यांना नव्याने कर्जउभारणी करता येत नाही. दुसरीकडे, थकित कर्जांनी ताळेबंद सजलेले असल्यामुळे भांडवली पाया विसविशीत बनलेल्या बँकांना नव्याने कर्जवाटप करता येत नाही. म्हणजेच, भारतीय अर्थव्यवस्थेतील औद्योगिक गुंतवणुकीच्या नळांना अशी दुहेरी बुचे बसलेली आहेत.

आता, ही दुहेरी समस्या निवारण्यासाठी केंद्राने नवीन कायदेशीर संस्थात्मक यंत्रणा (इन्सॉल्व्ह्सी ॲन्ड बॅन्क्रप्टसी बोर्ड) कार्यान्वित केलेली असल्याने औद्योगिक गुंतवणुकीच्या तोंडाला बसलेला तुंबा मोकळा होण्याची निदानपक्षी चिन्हे तरी दिसायला लागलेली आहेत. अजूनही या नवीन संस्थात्मक व्यवस्थेला फारशा गतीने काम करता आलेले नाही, ही वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही. एक तर त्यांत कायदेशीर किचकटी भरपूर आहेत. त्यांतच, 12 फेब्रुवारी 2019 या दिवशी भारतीय रिझर्व्ह बँकेने थकित कर्जांच्या संदर्भात जारी केलेला एक आदेश सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल ठरविल्याने थकित कर्जांच्या चिवट समस्येवर तोडगा शोधण्याच्या प्रयत्नांचा वेग एकंदरीनेच मंदावण्याची शक्यता आता बळावलेली आहे. दुसरे म्हणजे, ज्या थकित कर्जांची वसुली डबघाईला आलेले उद्योग विकून टाकण्याद्वारे करण्याशिवाय अन्य पर्यायच नाही अशा प्रकरणांमध्ये, अडचणीतील उद्योगांचा जमीनजुमला, इमारती, यंत्रसामग्री व अन्य मालमत्ता बाजारात येईल त्या किमतीला विकूनही बँकांच्या थकित कर्जांची पुरेपूर वसुली होत नाही तिथे संबंधित बँकांना वित्तीय खोट सोसावी लागेल हे उघड आहे. अशा परिस्थितीत, अशा बँकांच्या भांडवली पायाला झीज पोहोचणारच. अशा बँकांचे पुनर्भांडवलीकरण घडवून आणायचे तर केंद्र सरकारला अर्थसंकल्पामध्ये तशी तरतूद करणे भाग आहे. परिणामी, केंद्राची वित्तीय तूट वाढणारच. वित्तीय तुटीवर नियंत्रण ठेवण्यासाठी, सरसहा, भांडवली खर्चाला कात्री लावण्याचे हत्यार उपसले जाते. अर्थकारणातील मालमत्ता निर्मितीला मग अशा बचतीचा फटका बसतो. त्यांतून परत हानी होते ती अर्थव्यवस्थेतील प्रस्थापित उत्पादनक्षमतेचीच. म्हणजेच, थकित कर्जांच्या प्रकरणांचा निपटारा कशाही पद्धतीने झाला तरी त्याचा काही ना काही प्रतिकूल घाव अर्थव्यवस्थेला सोसावा लागणार. याला पर्याय दिसत नाही.

अशा परिस्थितीत, वित्तीय तुटीचे व्यवस्थापन करण्याचे आव्हान कमालीचे बिकट बनते. आधीच, 2018-19 या वर्षात अपेक्षेपेक्षा कमी करमहसूल सरकारच्या तिजोरीमध्ये जमा होण्याच्या शक्यतेपायी  वित्तीय तुटीचे व्यवस्थापन धुळीला मिळावे, हे स्वाभाविक ठरते. मग, तुटीची ती दरी भरून काढण्यासाठी केंद्र सरकारला नव्याने कर्जउभारणी अनिवार्य बनते. सरकारनेच एक मुठीने कर्जे उचलली की भांडवलाच्या खुल्या बाजारात व्याजांचे दर वाढतात. व्याजदर वाढले की खासगी गुंतवणूक मार खाते. वित्तीय तुटीचे भगदाड वाढले की दुसरीकडून महागाईला चालना मिळते. महागाईने मान वर काढली की देशामध्ये निर्माण होणाऱ्या वस्तू व सेवांच्या किमती वाढून त्याचा परिपाक देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या चालू खात्यावरील तुटीमध्ये भर पडण्यात घडून येतो. तसे झाले की, एकीकडून वित्तीय तुटीचे नियंत्रण आणि दुसरीकडून आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या चालू खात्यावरील तुटीचे नियंत्रण असे दुहेरी नष्टचर्य सरकारच्या मागे लागते. त्यांतच, आखातातील तणावांपायी उद्या कच्च्या खनिज तेलाच्या बाजारभावांनी उचल खाल्ली तर या दोन्ही तुटींचे व्यवस्थापन करता करता सत्ताधारी सरकारच्या तारांबळीला पारावार उरणार नाही. एकंदरीने बघता, अशा सगळ्या कोंडीमध्ये देशातील औद्योगिक गुंतवणुकीचे चक्र गतिमान बनवणे हे नव्याने सत्तारूढ होणाऱ्या सरकारच्या विषयपत्रिकेवरील सर्वांत चिवट, कटकटीचे व जटिल कलम ठरेल. गुंतवणुकीबाबत खासगी क्षेत्राचा उत्साह आटलेलाच राहिला तर अर्थव्यवस्थेतील मागणी व रोजगारनिर्मिती सक्षम राखण्यासाठी शासनसंस्थेलाच पुढाकार घ्यावा लागेल. म्हणजेच, मोठमोठ्या सरकारी खर्चाची इंजेक्शने भारतीय अर्थव्यवस्थेला टोचण्यासाठी सरकारलाच सरसावणे भाग आहे. सरकारी खर्चाचा हात सैल सोडला की तुटीचे नियंत्रण पुन्हा एकवार अवघड बनावे, यात काहीही अनपेक्षित नाही.

गुंतवणुकीची चाके रुतून बसली की रोजगारनिर्मितीचा गाडा रखडावा हे ओघानेच येते. अर्थव्यवस्थेमध्ये चांगल्या दर्जाचा रोजगार पुरेशा प्रमाणात निर्माण होत नसल्यामुळेच बाजारपेठेतील मागणी क्रमाक्रमाने मलूल होत चालली असावी, असे मानण्यास जागा आहे. देशांतर्गत उपभोगाची मात्रा कमजोर बनत जाणे, हे 2018-19 या वित्तीय वर्षातील भारतीय अर्थव्यवस्थेच्या कमजोर कामगिरीचे जे तिसरे कारण केंद्र सरकारच्या अर्थमंत्रालयाने आपल्या अलीकडील अहवालात नोंदविलेले दिसते, त्याची मुळे याच परिस्थितीत रुजलेली आहेत. रोजगारनिर्मिती होत नसल्याने सर्वसाधारण उपभोगावर त्याची आच यावी, हे अर्थशास्त्रीय तर्काला पटण्यासारखे असले





तरी भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रकृतीच्या दृष्टीने ते कोणालाच रुचणारे नाही. परवडणारे तर मुळीच नाही. अशा परिस्थितीत, मग, नागरिकांच्या उपभोग क्षमतेला हानी पोहोचू नये यासाठी शासनसंस्थेलाच पुन्हा कंबर कसावी लागते. नाना प्रकारची अनुदाने, थेट अर्थसहाय्याच्या योजना, रोजगाराची हमी देणारे कार्यक्रम, सुलभ कर्जवाटप, हमीभावांमध्ये सततची वाढ...अशा प्रकारचे उपाय हाताशी घेतले जातात. या पर्यायांचा आर्थिक भारही पुन्हा पडत राहतो तो सरकारी तिजोरीवरच. याची परिणतीही वित्तीय तुटीच्या व्यवस्थापनाचे आव्हान अधिक कडवे बनण्यातच घडून येते. 23 मे 2019 नंतर केंद्रात सत्तारूढ होणाऱ्या सरकारच्या पुढ्यातील समस्यांचे स्वरूप असे व इतके गुंतागुंतीचे व किचकट राहील.

वैश्विक अर्थकारणातील पर्यावरण कधी बदलेल हे तर आजघडीला कोणीही सांगू शकणार नाही. अशा वातावरणात, निर्यातीच्या आघाडीवरील चित्र गुलाबी दिसेल, अशी आशा अजिबातच बाळगता येत नाही. त्यांमुळे, भारतीय अर्थव्यवस्थेच्या आगेकूचीची वार्षिक सरासरी गती सक्षम राखण्यासाठी देशांतर्गत मागणीवरच कोणत्याही सरकारला अवलंबून राहावे लागेल. सर्वसामान्य नागरिकांच्या उपभोगाला सरकारी अनुदाने व खर्चांच्या योजनांद्वारे हातभार अनंत काळपर्यंत लावत बसणे हे कोणत्याही सरकारच्या वा अर्थव्यवस्थेच्या मुळावर येणारेच असते. त्यांमुळे, भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये भरीव प्रमाणात सर्व स्तरांवर मुबलक प्रमाणात शेतीबाह्य क्षेत्रांमध्ये रोजगारनिर्मितीसाठी चालना देण्याचा धडक कार्यक्रम हाती घेण्याखेरीज नवीन सरकारला आज तरी अन्य पर्याय दिसत नाही. ते करायचे तर कामगारविषयक कायद्यांमध्ये अतिशय मूलगामी व दूरगामी बदल घडवून आणण्याची राजकीय हाराकिरी स्वीकारावीच लागेल. तसे बघितले तर, काँग्रेस







पक्षाच्या निवडणूक जाहीरनाम्यातील न्याय ही योजना, देशातील सर्व शेतकऱ्यांना दरवर्षी सहा हजार रुपयांचे थेट अर्थसाहाय्य बहाल करण्याचे भारतीय जनता पक्षाने त्याच्या निवडणूक जाहीरनाम्यात दिलेले आश्वासन, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कामाची हमी देणाऱ्या दिवसांमध्ये वाढ घडवून आणण्याचे काँग्रेस पक्षाचे आश्वासन, असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी निवृत्तिवेतनाची झालेली तरतूद...अशा या ना त्या स्वरूपात काही ना काही सामाजिक सुरक्षेचे कवच आपल्या अर्थव्यवस्थेमध्ये अलीकडील काळात क्रमाक्रमाने साकारत असल्याने, कामगार भरती तसेच कपातीसंदर्भात उद्योगांना मोकळीक देणाऱ्या कामगारविषयक सुधारणांकडे प्रवास करण्यास, खरे बघता, आता कोणत्याच सरकारला अडचण भासू नये. बाजारपेठेतील व्यापारचक्रामध्ये अनुभवास येणाऱ्या चढउतारांबरहुकूम कारखान्यातील कामगारांच्या संख्येमध्ये वाढ अथवा घट घडवून आणण्यासंदर्भातील लवचिकता उद्योगांना प्रदान केली गेली तर आपल्या देशातील औद्योगिक रोजगाराच्या संधींमध्ये वाढ घडवून आणण्याच्या वाटा भरपूर प्रशस्त बनतील. ते धैर्य नव्याने सत्तारूढ होणारे सरकार दाखवणार का, यावर येत्या काळातील भारतीय रोजगाराचे आणि पर्यायाने अर्थकारणाचे चित्र अवलंबून राहील.

कोणत्याही सरकारने आखलेल्या कसल्याही कल्याणकारी योजनांची व्यवहारातील अंमलबजावणी ही अंतिमत: अवलंबून राहते ती गव्हर्नन्सच्या गुणवत्तेवर. सरकारी मनुष्यबळाची कार्यक्षमता जोवर उंचावत नाही तोवर कोणत्याही कल्याणकारी योजनेची व्यवहारातील अपेक्षित फळे साकारत नाहीत. युत्या–आघाड्यांच्या राजकारणापायी आणि तुष्टीकरणाच्या निकृष्ट राजकीय संस्कृतीपायी आपल्या देशातील गव्हर्नन्सचा दर्जा अलीकडील काळात कमालीचा ढासळलेला आहे. सरकारी खर्चाच्या, आणि त्यांतल्या त्यांतही पुन्हा सरकारच्या महसुली खर्चाच्या, वाढत्या भाराच्या दहशतीपायी, जवळपास सर्वच स्तरांवरील सरकारी नोकरभरती आताशा ठप्प झालेली आहे. गव्हर्नन्सचा दर्जा खालावण्यास तेही एक कारण आहेच आहे. मुळात, पुरेसे मनुष्यबळच सरकारपाशी नसेल तर शासनसंस्थेची 'डिलिव्हरी मेकॅनिझम' निष्प्रभ ठरणारच. त्यांमुळे, सरकारी यंत्रणेतील मनुष्यबळाच्या एकंदरच नियोजनाकडे अत्यंत तातडीने तारतम्यपूरक लक्ष देण्याची गरज आहे. त्या दृष्टीने, केंद्र सरकारच्या सेवेतील रिक्त जागा त्वरित भरण्याचे काँग्रेस पक्षाने त्याच्या जाहीरनाम्यात दिलेले आश्वासन खचितच स्वागतार्ह आहे. परंतु, केवळ इतक्यावरच थांबून चालणार नाही. सरकारी तुटीवर नियंत्रण राखत असतानाच सरकारची 'डिलिव्हरी मेकॅनिझम'ही सुधारायची असेल तर सरकारच्या तिजोरीमधून खर्च होणाऱ्या प्रत्येक रुपयाची उत्पादकता अव्वल राखावी लागेल. या व अशा सगळ्या आव्हानांना नव्याने सत्तारूढ होणारे सरकार कसे सामोरे जाते त्यांवर भारतीय अर्थकारणाचा संसार येत्या काळात सुरळीत चालेल किंवा कसे ते अवलंबून राहील.



# कोयना व टाटाचे पाणी

कोयना जलविद्युत प्रकल्प व टाटा जलविद्युत प्रकल्प समुहात वीज निर्मितीसाठी कृष्णा खोऱ्यातील जे पाणी वापरण्यात येते आणि वीज निर्मितीनंतर ते पाणी विपुलतेच्या कोकण भागात सोडून दिले जाते ते टप्प्याटप्प्याने कमी करण्यासंबंधीचा अभ्यास करण्यासाठी राज्य शासनाने जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त सचिव श्री. अ. पा. भावे यांच्या अध्यक्षतेखाली 2 ऑगस्ट, 2018 रोजी एक अभ्यासगट नेमला आहे. जलसंपदा विभागाचे सेवानिवृत्त सचिव श्रीकांत हुद्दार, डॉ. दि. मा. मोरे, राजन शहा, श्री. बा. भा. लोहार, श्री. कैलास चिरुटकर, श्री. अश्विनीकुमार जी. पाटील, श्री. अशोक सेठी व सदस्य सचिव म्हणून अधिक्षक अभियंता संजीव द. चोपडे या अभियंत्यांची तांत्रिक शासकीय सदस्य म्हणून या अभ्यासगटात नेमणूक केली आहे. आमदार राहुल कुल, आमदार सुजितसिंह ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर आणि श्री. शंकरराव नांगरे हे या अभ्यासगटाचे अशासकीय सदस्य आहेत. एकूण 14 सदस्य असलेल्या या अभ्यासगटाची मुदत 28 नोव्हेंबर, 2018 ला सहा महिन्यांकरिता वाढवून दिली आहे. म्हणजे 28 मे 2019 पर्यंत गटाने अहवाल सादर करणे अपेक्षित आहे. आत्तापर्यंत गटाच्या चार बैठका झाल्या असून पाचवी बैठक 7-8 मे 2019 ला होणार आहे. आजपर्यंत झालेल्या बैठकांच्या तारखा पुढीलप्रमाणे -

**पहिला बैठक - 6 व 7 डिसेंबर** 2018

**दुसरी बैठक - 10 व 11 जानेवारी** 2019



डॉ. सुधीर भोंगळे

# वास्तव काय?

**तिसरी बैठक – 21 व 22 फेब्रुवारी 2019**

**चौथी बैठक – 11 व 12 एप्रिल 2019**

कोयना व टाटाच्या धरणांमधून वीज निर्माण केल्यानंतर जे पाणी खाली सोडले जाते ते कोणकोणत्या गावांना, शहरांना किती प्रमाणात मिळते, या पाण्यापासून जमीन किती भिजविली जाते, यातले काही पाणी उद्योगधंद्यांसाठी वापरले जाते का? एकंदरीत या पाण्याचा कसा विनीयोग होतो याबाबतची माहिती अद्याप गोळा होऊन अभ्यासगटाकडे आलेली नाही. अभ्यासगटाला पाहिजे ती माहिती अजूनही उपलब्ध झालेली नसल्यामुळे ती गोळा करण्यासाठी एक प्रश्नावली तयार करावी लागली आहे. मुदत संपत आली तरी माहिती मिळालेली नसल्यामुळे गटाला अभ्यास करुन निष्कर्षाप्रत येणे शक्य होणार नाही. त्यामुळे आणखीन परत एकदा किमान सहा महिन्यांकरिता तरी मुदतवाढ द्यावी लागेल असे चित्र दिसते आहे. अभ्यासगटाचा काहीही अभ्यास झालेला नसताना व त्यांनी अंतिम तर सोडाच पण अंतरिम शिफारशीही केलेल्या नसताना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. ना. देवेंद्र फडणवीस यांनी बारामती, दौंडच्या दुष्काळी भागाला टाटाच्या धरणांचे पाणी देऊन टाकू असे लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात निरनिराळ्या सभांमधून व अगोदरच जाहीर केले आहे. आता ते कशाच्या आधारे हे सांगताहेत हे त्यांनाच माहिती !

टाटाची धरणे उर्ध्व भीमा उपखोऱ्यात तर कोयना जलविद्युत प्रकल्प उर्ध्व कृष्णा उपखोऱ्यात येतो. टाटांच्या

धरणातून जवळपास गेली 100 वर्षे पाणी पूर्वेकडून पश्चिमेकडे म्हणजे कोकणात वळविले जाते. कोयनेचे पाणी पश्चिमेकडे वळविण्याला आता 70 वर्षे झाली आहेत. कोयना धरणातून वीज निर्मितीसाठी 67.5 अब्ज घनफूट पाणी वळवायला न्या. आर. एस. बच्छावत लवादाने 1976 मध्ये परवानगी दिली होती.

**कोयना जलविद्युत निर्मिती–तपशील – तीन पॉवर हाऊसेस**

टप्पा 1 व टप्पा 2 हे एकाच पॉवर हाऊसमध्ये आहेत

टप्पा 1– 70 मेगॅवॅटचे 4 जनरेटर– वीजनिर्मिती 280 मेगॅवॅट

टप्पा 2– 80 मेगॅवॅटचे 4 जनरेटर– वीजनिर्मिती 320 मेगॅवॅट

टप्पा 3– 80 मेगॅवॅटचे 4 जनरेटर– वीजनिर्मिती 320 मेगॅवॅट

टप्पा 4– 250 मेगॅवॅटचे 4 जनरेटर– वीजनिर्मिती 1000 मेगॅवॅट

**एकूण वीजनिर्मिती 1920 मेगॅवॅट**

कोयना धरणातून पूर्वेकडे सिंचनासाठी पाणी सोडतात तिथे 18 मेगॅवॅटचे 2 जनरेटर आहेत. म्हणजे 36 मेगॅवॅट वीज निर्माण होते. त्याला कोयना डॅम फूट पॉवर हाऊस म्हणतात. आणखीन डाव्या तिरावर 40 मेगॅवॅटचे दोन जनरेटर बसवून 80 मेगॅवॅट वीज निर्माण करायची आहे. हा प्रकल्प बऱ्याच वर्षांपासून प्रस्तावित असून निधीअभावी रखडला आहे. सध्या पूर्वेकडे 37.50 अब्ज घनफूट पाणी सिंचनासाठी सोडून 36 मे. वीज तयार होते आहे. याच पाण्यातून पुढची 80 मे. वीज तयार करायची आहे. आता भविष्यात सिंचनासाठी एवढे पाणी उपलब्ध होऊ शकेल का असा प्रश्न आहे. कारण न्या. ब्रिजेशकुमार लवादाने कोयना धरणातील आणखीन 25 अब्ज घनफूट पाणी पश्चिमेकडे वीज निर्मितीसाठी वळविण्यास महाराष्ट्राला त्याच्या मोठ्या आग्रहास्तव परवानगी दिली आहे. म्हणजे आता 103 टीएमसी क्षमतेच्या कोयना धरणातून पहिले 67.50 व नंतरचे चांगल्या पावसाच्या वर्षात 25 म्हणजे एकूण 92.50 अब्ज घनफूट पाणी वीज निर्मितीसाठी वापरले जाणार आहे.

**टाटाची धरणे – वीज निर्मिती तपशील – तीन पॉवर हाऊसेस**

1) भीरा पॉवर हाऊस – हे मुळशी धरणाच्या पाण्यावर चालते. 25 मेगॅवॅट सहा जनरेटर आहेत. म्हणजे एकूण 150 मेगॅवॅट वीज निर्माण होते. रिव्हर्सिबल टर्बाईनचे तंत्र वापरून याच पाण्यापासून एक जनरेटर बसवून आणखीन 150 मेगॅवॅट वीज निर्माण केली जाते. म्हणजे एकूण 300 मेगॅवॅट वीज या पॉवरहाऊसमध्ये तयार होते.

2) खोपोली पॉवर हाऊस – 24 मेगॅवॅटचे 3 जनरेटर असून एकूण 72 मेगॅवॅट वीज तयार होते. खोपोलीला टाटाची वळवण, लोणावळा, शिरोटा व कुंडली अशी चार धरणे आहेत.

3) भिवपुरी पॉवर हाऊस – 12 मेगॅवॅटचे 6 आणि दीड मेगॅवॅटचे दोन अशी एकूण 75 मेगॅवॅट वीज तयार होते. ठोकरवाडी हे एकच धरण आहे. त्यातून या पॉवर हाऊसला पाणी येते.

या तीनही पॉवर हाऊसेसची मिळून निर्मिती क्षमता 447 मेगॅवॅट आहे. बच्छावत लवादाने टाटाच्या पश्चिमेकडे पाणी वळविण्यावरही बंधन घातले आहे. एका वर्षात जास्तीत जास्त 54.6 टीएमसी पाणी वळवावे पण सलग 5 वर्षांत 213 टीएमसी पेक्षा जास्त पाणी वीज निर्मितीसाठी वळवू नये असे बंधन आहे. टाटा प्रकल्पांचा वीज निर्मितीसाठीचा कृष्णा खोऱ्यातील दरवर्षीचा सरासरी पाणीवापर 42.60 टीएमसी एवढा आहे.

**कोकणातील पाणीवापर**

टाटाच्या धरणांमधून जे 42.6 टीएमसी पाणी खाली कोकणात सोडले जाते त्यातले 34 टीएमसी पाणी पिणे, उद्योगधंदे व शेतीसाठी वापरले जाते. उर्वरीत 8 टीएमसी पाणी वापरण्याच्या परवानग्या शासनाने व्यक्ती व संस्थांना दिलेल्या आहेत असे समजते व त्यांची कामे चालू आहेत. या सगळ्यांचा पाणीपुरवठा सरकार एकदम बंद करु शकेल का ? त्यांची या पाणी वापरासाठी



जी गुंतवणूक झाली आहे त्याची नुकसान भरपाई कोण व कशी करणार? पनवेलसारख्या मोठ्या महानगरपालिकेच्या शहराला आजच पिण्याच्या पाण्याचा मोठा तुटवडा जाणवतो आहे. दोन दिवस टाटाचे पाणी नाही मिळाले तर पनवेलमध्ये हाहाःकार उडतो. टाटाचे पाणी पूर्णपणे देणे बंद केले तर पनवेल आणि त्याला लागून असलेल्या गावांची परिस्थिती काय होईल? पनवेलकर हे पाणी सोडायला तयार होतील का? त्यांना दुसरीकडून कुठून पाणी देऊन ही भरपाई करणार? पर्याय काय? याबाबत महापालिका, नगरपालिका, ग्रामपंचायती, उद्योजक या सर्वांशी चर्चा व संवाद कोण साधणार? अभ्यासगट हे काम करु शकेल असे वाटत नाही. या माहितीअभावी अभ्यासगट निष्कर्षाला कसा येईल याबद्दलही मोठे प्रश्नचिन्ह आहे.

जवळपास 42 अब्ज घनफूट पाणी कोकणातील पश्चिमवाहिनी नद्यांवर धरणे बांधून उपलब्ध करुन द्यावे लागेल. यासाठी कोकणातल्या प्रतिकूल भौगोलिक आणि भूस्तरीय रचना असलेल्या प्रदेशात इतका मोठा पाणीसाठा करण्यासाठी



## कोयनेसाठी अभ्यासगट नेमणे हा भंपकपणा

**राज्य शासनाने कोयनेच्या पाण्यासाठी अभ्यासगट नेमणे हाच मुळात भंपकपणा आहे. कोयनेचे पाणी सिंचनासाठी घाटावर आणा अशी मागणी काही शेतकऱ्यांनी केलेली नव्हती. ब्रिजेशकुमार लवादाने कोयनेतले 25 टीएमसी पाणी जेव्हा वीज निर्मितीसाठी पश्चिमेकडे वळवायला परवानगी दिली, तेव्हा राज्याचे गृहमंत्री असलेल्या आर. आर. पाटील यांनी त्यावेळी विरोध करून हे पाणी सांगली जिल्ह्याच्या दुष्काळी भागाला द्यावे अशी मागणी केली होती. त्यानंतर कोयनेचे पाणी कुणीही सिंचनसाठी मागितले नाही. गेल्या 60-70 वर्षांत कोयनेचे फक्त 13 ते 14 टीएमसी पाणी सिंचनासाठी वापरले जात आहे आणि तेवढेच पाणी धरणात शिल्लकही राहात आहे. लवाद या पाण्याचा सर्व हिशोब बारकाईने पाहते आहे. शिवाय या अभ्यासगटात शेतकरी, उद्योजक, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी, टाटांचे प्रतिनिधी हे सदस्य म्हणून घ्यायला हवे होते. जलसंपदा विभागातले सगळे आजी-माजी अभियंते अभ्यास गटात भरून सरकारने खोटा देखावा लोकांपुढे उभा केला आहे. कोयना आणि टाटा या दोन्हीचे पाणी त्यांना लोकांना द्यायचेच नाहीये. हा फक्त निवडणुकीपुरता जुमला आहे, असा त्यातून अर्थ काढायला मोठी संधी सरकारनेच जनतेला प्राप्त करून दिली आहे.**

जागा उपलब्ध आहेत का याचे उत्तर नियोजनकर्त्यांना प्रथम द्यावे लागेल.

**बोलघेवड्यांचा सुळसुळाट**

वीज निर्माण झाल्यानंतर जे पाणी खाली कोकणात जाते ते पुन्हा उचलून घाटावर म्हणजे पूर्वेकडे टाकावे व यासाठी रिव्हर्सिबल टर्बाईन तंत्राचा वापर करावा असे अनेक बोलघेवडे व स्वयंघोषित जलतज्ज्ञ सांगतात. एक वेळ हे तंत्र वापरणे शक्य आहे असे समजू. पण वीज निर्माण करुन खालच्या भागात सोडलेले पाणी पुन्हा उचलण्यासाठी अगोदर खालच्या भागात छोट्या-मोठ्या धरणांमध्ये ते साठवावे लागेल. वरील



त्यांना एकही जागा रिव्हर्सिबल स्किम करण्यासाठी सापडली नाही असे समजते. रिव्हर्सिबल टर्बाईन म्हणून काम करण्यासाठी यंत्रे ही खालच्या तलावाच्या पातळीच्या आणखीन खाली असली पाहिजेत. तशी सुविधा टाटा व कोयना पॉवर हाऊसच्या ठिकाणी नाही. तसे करण्यासाठी नवीन पॉवर हाऊसेस तयार करावी लागतील. आत्ताच्या वीजगृहाची पातळी खालच्या तलावाच्या वर आहे. ही वीजगृहे खाली डोंगरात घ्यावी लागतील. भौगोलिक रचना रिव्हर्सिबल तंत्र वापरायला सकृतदर्शनी तरी अनुकूल नाही. म्हणून टाटांनी इतर दोन ठिकाणी म्हणजे खोपोली व



सर्व जलविद्युत गृहांसाठी कोकणात अशी धरणे बांधण्यासाठी साईट उपलब्ध होईल का? ती खर्चाच्या दृष्टीने परवडेल का? लॅटराईट मातीत पाणी टिकून राहील का? पाणी पंपाद्वारे उचलून पूर्वेकडे आणायचे झाल्यास हे पंप चालविण्यासाठी किती तरी प्रचंड वीजेची गरज लागते. तेवढी जास्तीची वीज उपलब्ध आहे का? रात्रीच्या वेळी जी सरप्लस वीज असते ती या कामी वापरा असे सांगितले जाते. या वीजेचा दर काय राहील? तो लोकांना परवडेल का? मुळात प्रश्न आहे एवढी सरप्लस वीज आहे कुठे? जास्तीची वीज आहे तर मग 16-18 तासांचे भारनियमन का आहे? खेडेगावात, ग्रामीण भागात शेतकऱ्यांना पूर्णदाबाने सहा-आठ तास देखील अखंडित वीज पुरवठा होत नाही. परिणामी सिंचनाअभावी पिके जळताहेत. खाली पडलेले पाणी पुन्हा उचलून टाकायचे म्हटले तर 25 ते 30 टक्के वीज जास्त लागते. पंपांची तेवढी कार्यक्षमता लागते. ही वीज कोठून आणणार? बाहेरुन इतकी मोठी वीज घ्यावयाची ठरल्यास राज्यातील आणि विशेषतः मुंबईच्या जवळपास असलेल्या वीजप्रणालीची वीजवहन क्षमता पुरेशी आहे का याचा कोणी अभ्यास केला आहे का? त्या वीजेचा खर्च कोण देणार आणि उचलून आणलेल्या या महागड्या पाण्याला ग्राहक कोण आहे? हे सगळे प्रश्न आज तरी अनुत्तरीत आहेतच. पण एका महत्वाच्या गोष्टीकडे आपले दुर्लक्ष्य होते आहे ते म्हणजे सर्व ठिकाणी रिव्हर्सिबल टर्बाईन बसवायला जागा अनुकूल आहेत का? अभ्यासगटाने नुकतीच कोयना परिसराची व पाणी खाली जिथे सोडतात त्या भागाची पाहणी केली असल्याचे वर्तमानपत्रातील बातम्यांवरुन समजले.

भिवपुरीला हे तंत्रज्ञान वापरलेले नाही असे टाटांच्या तज्ज्ञांकडूनच समजते. अन्यथा आत्तापावेतो अशी व्यवस्था टाटांच्या सर्व पॉवरहाऊसेसच्या ठिकाणी उभी राहिली असती.

**पश्चिमेचा तुटलेला कडा**


पाण्याचा दाब आणि विसर्ग यांच्या गुणाकारातून वीज निर्मितीची क्षमता ठरत असते. पश्चिमेच्या बाजूचा कडा तुटलेला असल्यामुळे 550 ते 600 मिटरचा (दोन हजार फूट) सरळ उतार उपलब्ध झाल्यामुळे जास्त उंचीवरुन पाणी पडते व त्यामुळे जास्तीची व स्वस्त दरातील वीज तयार होते. अशी नैसर्गिक अनुकूलता महाराष्ट्राबरोबरच कर्नाटक आणि केरळ या राज्यांनाही मर्यादित स्वरुपात लाभली आहे. त्याचा त्यांनी पुरेपूर वापर करुन मोठ्या प्रमाणावर जलविद्युत निर्मिती चालविली आहे. त्यामुळे कर्नाटक राज्याला तरी कोयना व टाटांच्या जलविद्युत निर्मिती प्रकल्पांच्या विरोधात बोलण्याचा काहीही अधिकार नाही. कोयना व टाटाची विजनिर्मिती बंद करा असे म्हणणाऱ्या तथाकथित स्वयंघोषित तज्ज्ञांनी अशी नैसर्गिक पर्यायी जागा उपलब्ध करुन द्यावी. तशी जागा कुठे उपलब्ध आहे का ? आज तरी ती दिसत नाही. आमच्या पूर्वीच्या जाणकारांनी या नैसर्गिक अनुकूलतेचा फायदा उठविला आहे. ही अतिशय गौरवाची बाब आहे आणि त्याचा विसर आज आम्हांला पडतोय ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

आणखीन एक महत्त्वाचा मुद्दा आहे तो म्हणजे पिकअप लोडसाठी जलविद्युतच लागते. कारण जलविद्युत केंद्रे एका सेकंदात लाईन्सवर घेऊन कार्यरत करता येतात आणि बंदही करता येतात. वीजप्रणालीच्या स्थिरतेसाठी जलविद्युत उर्जेची नितांत गरज असते. आदर्श वीजप्रणालीसाठी इतर स्त्रोतांतील वीज आणि जलविद्युत यांचे प्रमाण 60:40 असे असावे लागते जे की आज 85:15 च्या आसपास आहे. इतकी तफावत आज असताना पुन्हा जलविद्युत केंद्रे बंद करा म्हणणाऱ्यांचा अभ्यास किती कच्चा आहे हेच दिसून येते. जलविद्युतसारखी क्षणार्धात वीज उत्पादन सुरु करण्याची व बंद करण्याची सोय आण्विक, थर्मल, गॅस यापासून बनणाऱ्या कोणत्याही उर्जेत नाही. शिवाय जलविद्युत प्रदूषणापासून मुक्त आहे. ती पर्यावरणाशी मैत्री राखणारी आहे. कोळसा, गॅस, अणू यापासूनची वीज प्रदूषण वाढविणारी आहे. संपूर्ण जग प्रदूषणाच्या विरोधात उभे राहात असताना आपण प्रदूषण वाढविणारी वीज निर्मिती वाढवावी या म्हणण्यात काय शहाणपण आहे! कोयनेची वीज राज्याच्या व प्रामुख्याने मुंबईला सकाळी व संध्याकाळी म्हणजे पीक मागणीच्या वेळेला वापरली जाते. 24 तास ही जनित्रे चालविली जात नाहीत. पिकलोडची गरज रिव्हर्सिबल टर्बाईनने भागू शकते असे म्हणणे प्रतिकूल भौगोलिक परिस्थितीमुळे प्रस्तुत वीजनिर्मितीच्या संदर्भात किती उथळपणाचे आहे हे जाणकार समजू शकतील.

वरील विवेचनावरुन वाचकांच्या हे लक्षात आले असेल की, वीज प्रणालीच्या स्थिरतेसाठी जलविद्युत उर्जेला इतर कोणत्याही उर्जास्त्रोताचा पर्याय होऊ शकत नाही आणि सर्वच ठिकाणी पारंपारिक जलविद्युत केंद्राचे रुपांतरण रिव्हर्सिबल टर्बाईनच्या विद्युत गृहामध्ये करता येत नाही. टाटा आणि कोयनेची वीजनिर्मिती बंद करा म्हणणाऱ्यांनी या विषयातला सखोल अभ्यास आधी करावा आणि नंतर प्रकट व्हावे. संत रामदासांनी असे लिहून ठेवले आहे की –

**अभ्यासोनी प्रकट व्हावे । नाही तर झाकोनी असावे ।**





**प्रकट होऊनी नासावे । हे बरे नव्हे ॥**

**मोठ्या उपसा योजना परवडतील?**

मुळा नदीवर टाटाने मुळशी धरण बांधले. ही मुळा नदी पुण्यात मुठा नदीला येऊन मिळते. मुठा नदी दौंडच्या अलिकडे भीमा नदीला मिळते. या भीमेवर 117 टीएमसीचे उजनी धरण आहे. खडकवासला प्रकल्पाचा कालवा इंदापूरपर्यंत गेला आहे. या पाण्यावर मोठ्या प्रमाणात ऊस पिकतो. मुळा नदीवर पुण्यापर्यंत धरण बांधता येत नाही. कारण तशी जागाच नाही. मुळशी धरणाचे पाणी मुळा नदीत सोडून मुळा-मुठा एकत्र केली तर ते पाणी कुठे अडविणार? पाणी वापरासाठी धरण कुठे बांधणार? जागाच उपलब्ध नसल्यामुळे हे पाणी लिफ्टने उचलून लांब कुठेतरी न्यावे लागेल. कारण कालवा काढण्यासारखी



परिस्थिती नाही व जागाही नाही. मग हे पाणी उचलण्यासाठी उपसा सिंचन योजना कराव्या लागतील. या योजनांसाठी वीज लागेल. कृष्णा खोऱ्यात टेंभू, ताकारी, म्हैसाळ, जिहे काठापूर, वसना, वांगना, पुरंदर, जानाई, शिरसाई यांसारख्या असंख्य मोठमोठ्या उपसा सिंचन योजना आपण काढल्या. आज त्यांची काय अवस्था आहे? त्यांची वीज बीले कोण भरतंय? या उपसा सिंचन योजना आर्थिकदृष्ट्या परवडत नाहीत. त्या नीट चालविता येत नाहीत म्हणून मागील 10-15 वर्षांपासून आपण नव्याने एकही उपसा सिंचन योजना हाती घेतलेली नाही. पुढे घेता येईल असेही दिसत नाही. 50 ते 60 मिटरपेक्षा जास्त उंचीच्या योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम होत नाहीत असे मत चितळे आयोगानेही त्यांच्या अहवालात नमूद केले आहे. या योजनांची वीज बिले व पाणीपट्टी इतकी भरमसाठ असते की शेतकरी ती ऊस पिकातून भरुच शकत नाही. मग प्रश्न येतो एवढे मोलेमहागडे पाणी वापरुन आपण कोणती पिकपद्धती उभी करणार आहोत ज्यातून ही बिले भरता येतील.

टाटांची बाकी धरणे इंद्रायणी खोऱ्यात आहेत. ते पाणी कुकडीत जाते. सिंचनासाठी हे पाणी वापरायचे असेल तर त्यालाही उपशाशिवाय पर्याय नाही. ग्रॅव्हीटीने हे पाणी जात नसल्याने ते उचलूनच टाकावे लागले. या उपसा पाण्यावर ऊस परवडणार आहे का? साखर कारखान्यांची अवस्था आजच किती दयनीय आहे! आणि सर्वात महत्वाचा मुद्दा आहे तो म्हणजे शेतकऱ्यांची मानसिकता. त्यांनी पाणीपट्टी व वीजबिल पूर्णपणे भरण्याची तयारी दाखविली असती तर उपसा योजना बंद पडल्या नसत्या आणि सरकारला दुष्काळाच्या निधीतून ही बीले भरण्याची पाळी आली नसती. सरकार किती काळ ही बिले भरुन लोकांना फुकट पाणी व फुकट वीज देणार आहे?

**पूर्वेकडे पाणी कशासाठी पाहिजे ?**

आता सर्वात महत्त्वाच्या मुद्द्याकडे आपण वळू या. पश्चिमेकडे पाणी वळवायचे बंद करायचे म्हणजे जलविद्युत



निर्मिती बंद करायची. क्षणभर हे गृहीत धरु. तसे करायला हरकत नाही. आता प्रश्न येतो पूर्वेकडे हे पाणी कशासाठी पाहिजे? पवना धरण 10 टीएमसीचे आहे. ते सर्व उद्योग व पिंपरी-चिंचवड व अन्य गावांसाठी दिले आहे. हे सर्व चांगले पाणी उद्योगधंदे व नागरीवस्त्या खराब, प्रदूषित करुन नदीत सोडतात. त्यामुळे नद्या प्रचंड खराब व गटारासारख्या झाल्या आहेत. प्रक्रिया यंत्रणा उभारून योग्य ती प्रक्रिया केली तर यातले किमान 80 टक्के पाणी पुन्हा रिसायकल होऊ शकते. वापरात येऊ शकते. म्हणजे नव्या पाण्याची गरज केवळ 20 टक्क्यांची लागेल. पण आज ही प्रक्रिया करायला कुणी तयार नाही. सगळ्यांना नवे ताजे पाणी हवे आहे. आहे त्या पाण्याचा योग्य वापर केला व ते पुन्हा पुन्हा रिसायकलिंग करुन वापरले तर आज जेवढे उद्योग आहेत त्यापेक्षा तीन ते चार पट उद्योग जास्तीचे उभे राहतील. हे सगळे पाणी खराब करुन पर्यावरणाला आणि माणसांच्या आरोग्याला आपणच धोका निर्माण केला आहे. हे पाणी शुद्ध करुन वापरण्याकडे आमचे लक्ष्य नाही. हे सगळे घाण पाणी, सांडपाणी मैल्यासह वाहून उजनी धरणात जाते आहे आणि घाणपाणी साठविण्यासाठी मोठी टाकी असे विकृत स्वरुप उजनी धरणाला आले आहे. आज उजनीचे पाणी पिण्यासाठी, आंघोळीसाठी सरळपणे वापरु शकत नाही. अनेक आजार या पाण्यामुळे माणसे आणि जनावरांना होताहेत. याबद्दलच्या याचिका उच्च न्यायालयात चालू आहेत. आता कोयना आणि टाटाचे शुद्ध पाणी आणून ते पुन्हा आम्हांला प्रदूषित करायचे आहे का? शुद्ध काही राहूच द्यायचे नाही असा आमचा विचार का आहे? जे लोक पूर्वेकडच्या पाण्यासाठी आग्रह धरता ते उद्योगांनी पाणी रिसायकल करुन वापरले पाहिजे, पाणी प्रदूषित करता कामा नये आणि महापालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांनी सांडपाण्यावर प्रक्रिया करुनच ते नदीत सोडले पाहिजे असा आग्रह का धरीत नाहीत? बाहेरचे चांगले पाणी नाममात्र दरात किंवा फुकटात मिळतंय म्हणून ते कसेही वापरुन त्याचेही वाटोळं करायचे आहे का? हे पाणी स्वच्छ राहील याची जबाबदारी कोण घेईल? प्रक्रिया केलेले सांडपाणी हे अन्नधान्याची, पिके, फळे, भाजीपाला यांचे उत्पादन करण्यासाठी वापरणे धोक्याचे आहे. त्यामुळे अनेक दुर्धर रोग व आजार होऊ शकतात हे सिद्ध झाले आहे. परिणामी हे सांडपाणी ऊस, इरिगेटेड फॉरेस्ट्री, कापूस,



ताग यांसारख्या पिकांसाठी उपयुक्त राहील. पण यातली सगळी पिके आपल्या भागात होतीलच असे नाही. त्यामुळे उद्योगांनाच हे पाणी दिले पाहिजे व पुन्हा पुन्हा शुद्ध करुन वापरण्याची सक्ती केली पाहिजे.

**पुणेरी पाणी व्यवस्थापन**

पुणे शहर मर्यादेपेक्षा जास्त पाणी वापरते म्हणून आमच्या शेतीला पाणी मिळत नाही, अशी ओरड दौंड, इंदापूर, माळशिरस व खालच्या भागातील लोक करतात. त्यामुळे ते टाटांची वीज निर्मितीबंद करून ते पाणी मिळावे अशी मागणी करतात. आता याबाबतची वस्तुस्थिती समजून घेऊ.

खडकवासला प्रकल्पातून पुणे शहर व कॅन्टोन्मेट भागाला पिण्याचा पाणीपुरवठा होतो. खडकवासला प्रकल्पात खडकवासला (1.97 टीएमसी), पानशेत (10.65 टीएमसी), वरसगाव (12.82 टीएमसी) आणि टेमघर (3.71 टीएमसी) या चार धरणांचा समावेश आहे. चारही धरणांची मिळून एकूण


पाणीसाठा क्षमता 29.15 टीएमसी आहे. खडकवासला प्रकल्पाच्या मूळ अहवालात पुणे शहरासाठी 5 टीएमसी पाण्याची तरतूद आहे. नामवंत अभियंता मोक्षगुण्डम विश्वेश्वरय्या यांच्या अध्यक्षतेखाली 1938 साली 'बॉम्बे एनक्वायरी इरिगेशन कमिशन' नेमले होते. त्याच्यापुढे साक्ष देताना त्यावेळच्या पुणे नगरपालिकेने 'आम्ही आमची पिण्याच्या पाण्याची स्वतंत्र व्यवस्था करू' असे आश्वासन दिले होते. अद्याप हे आश्वासन पुणे महानगरपालिकेने पूर्ण केलेले नाही. आश्वासन देऊन आता 80 वर्षे झाली आहेत. दुसऱ्यांच्या कुबड्यांच्या आधारे पुणे महापालिका किती काळ तग धरणार आहे याचा विचार महापालिकेसह पुण्यातील लोकांनी व विचारवंतांनी करावा.

पुणे महानगरपालिकेने 2017 मध्ये पुणे शहराची लोकसंख्या 40 लाख 78 हजार असल्याचे मुख्य अभियंता जलसंपदा विभाग, पुणे यांना सांगितले. जलसंपत्ती नियमन प्राधिकरणापुढे जेव्हा सुनावणी झाली तेव्हा महापालिकेने पुणे शहराची लोकसंख्या 48 लाख असल्याचे सांगितले आणि न्यायालयात 56 लाख 30 हजार लोक पुणे शहरात राहतात अशी माहिती दिली. यातला कोणता आकडा खरा मानायचा हे पुणे महापालिकेलाच माहिती. सोयीसोयीने महापालिका आकडेवारी बदलून वाढीव सांगते आहे. अर्थात पाणी जास्त मिळावे याकरिताच हा आकड्यांचा खेळ खेळला जात आहे. लोकसंख्येची नेमकी व सुधारित आकडेवारी जाहीर करावी, त्याशिवाय पुणे महानगरपालिकेचे वार्षिक पाण्याचे अंदाजपत्रक निश्चित करता येत नाही, अशा आशयाचे पत्र अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ यांनी 25 एप्रिल, 2019 ला पुणे महापालिकेला पाठविले आहे. आता 3 मे रोजी मुंबई उच्च न्यायालयाने पुणे महानगरपालिका आणि जलसंपदा विभागाला लोकसंख्यानिश्चिती व पाणी देण्याचे प्रमाण निश्चित करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत.

**निकषापेक्षा जास्त पाणीवापर**

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने दरडोई दरमाणशी प्रतिदिनी 155.25 लिटरचा निकष ठरवून दिला आहे. मूळ पाणी 135 लिटर + 15 टक्के लॉसेस असे गृहीत धरुन प्रतीमाणशी 155.25 लिटर पाणी महापालिकेला जलसंपदा विभागाने द्यावे असे सांगितले आहे. पुणे महापालिका मात्र दररोज प्रतीमाणशी 300 ते 400 लिटर एवढे उच्चांकी पाणी वापरत आहे. खडकवासला धरण ते पर्वती जलकेंद्र हे अंतर 12 कि.मी. आहे आणि पर्वती जलकेंद्र ते लष्कर जलकेंद्र हे अंतर 7 कि.मी. आहे. दोन्ही मिळून 19 कि.मी अंतर आहे. या अंतरासाठी आता पाईपलाईन टाकली असून जानेवारी 2019 पासूनच त्यातून पाणी





वाहून नेले जात आहे.

28 मार्च 2005 रोजी महाराष्ट्र शासनाचा जलसंपदा विभाग आणि पुणे महानगरपालिका यांच्यात पाणी वापरासंबंधी एक करार झाला. त्यावेळी शासनाने 11.5 टीएमसी पाणी पुणे शहराला वर्षभरात द्यावे अशी मंजुरी दिली. त्यावेळेस पुण्याची लोकसंख्या 25 लाखापेक्षा जास्त नसावी आणि त्यासाठी लागणारे पाणी चार टीएमसीपेक्षा जास्त नसावे. असे असताना त्यावेळच्या अधिकारी व धोरणकर्त्यांनी पुण्यासाठी असे झुकते माप देऊन स्वतःचे हात का बांधून घेतले या प्रश्नाचे उत्तर आज कोणीही देत नाही. त्यावेळी करारात अट घातली होती की पुणे महानगरपालिकेने वर्षभर वापरलेल्या पाण्यातील 6.5 टीएमसी पाण्यावर प्रक्रिया करुन व ते शुद्ध करुन खराडी येथील मुंढवा जॅकवेलमध्ये टाकले पाहिजे. डिसेंबर 2015 पासून ही पाणी टाकण्याची प्रक्रिया अंशतः सुरु झाली असल्याचे समजते. पण पाणी मनपा शुद्ध करुन टाकत नाही. तसेच प्रदूषित सांडपाणी थेट कालव्यात टाकते. त्यामुळे हरित लवादापुढे बऱ्याच केसेस चालू असून सगळे पाणीसाठे प्रदूषित झाले आहेत.

2017 मध्ये पुणे महापालिकेने जे प्रतिज्ञापत्र जलसंपदा विभागाला सादर केले त्यानुसार दररोज 632 एमएलडीप्रमाणे वर्षभरात पुणे मनपाला 8.19 टीएमसी पाणी जलसंपदा विभागाने दिले पाहिजे. महाराष्ट्र विधीमंडळाने आमदार प्रसाद तनपुरे यांच्या अध्यक्षतेखाली पुणे शहराचा पाणीवापर ठरविण्यासाठी जी समिती नेमली होती तिने वर्षभरात 8 टीएमसी पाणी पुणे मनपाला द्यावे असे सांगितले होते. आता वर्षभरात 11.5 टीएमसी म्हणजे रोज 892 एमएलडी पाणी पुणे मनपाने वापरले पाहिजे. प्रत्यक्षात पुणे शहर 2011-12 पासून किती पाणी वापरते याचा हिशेब दाखविणारा तक्ता पुढीलप्रमाणे -

**पुणे शहर पाणीवापर तक्ता**

| सन | मंजुर आरक्षण वार्षिक | पाणीवापर प्रत्यक्ष | पाणी वापर दरडोई |
|---|---|---|---|
| 2011-12 | 11.50 | 15.90 | 303 |
| 2012-13 | 11.50 | 15.39 | 293 |
| 2013-14 | 11.50 | 15.95 | 304 |
| 2014-15 | 11.50 | 15.83 | 301 |
| 2015-16 | 11.50 | 16.50 | 314 |
| 2016-17 | 11.50 | 16.71 | 318 |
| 2017-18 | 11.50 | 18.71 | 356 |
| | **सरासरी** | **17.30** | **313** |

2017-18 मध्ये पुणे मनपाचा पाणी वापर आत्तापर्यंतचा सर्वाधिक वापर असून तो 18.71 टीएमसी आहे. म्हणजे करारापेक्षा तो 7.21 टीएमसीने अधिक आहे. एका टीएमसीत 10 हजार एकर जमीन एकावेळी भिजविण्याची क्षमता असते. म्हणजे 70 हजार एकर जमिनीला जे पाणी सिंचनासाठी देता आले असते ते पुणे मनपाने वापरुन टाकले. नोव्हेंबर 2017 ते मार्च 2018 या पाच महिन्यांत सरासरी रोज 1600 एमएलडी असा वापर आहे. याच कालावधीमध्ये काही वेळा महत्तम पाणीवापर 1750 एमएलडी पर्यंत (429 एलपीसीडी) झालेला आहे. पुणे शहराचा हा पाणी दिवसेंदिवस वाढतच चाललेला आहे. त्यामुळे शेतीचे सिंचनाचे पाणी कमी कमी होत चालले आहे.


बारामती तालुक्यातील उंडवडी येथील शेतकरी श्री. विठ्ठल जराड यांनी 2017 मध्ये प्राथमिक वाद निवारण अधिकारी श्री. टी. एन. मुंडे यांच्याकडे शेतकरी या नात्याने पुणे शहराच्या अती पाणी वापरासंबंधी एक याचिका दाखल केली होती. तेव्हा श्री. मुंडे यांनी पुणे मनपाला वर्षभरात 8.19 टीएमसी पाणी द्यावे असा निर्णय दिला होता. यावर पुणे मनपाने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडे अपील केले. प्राधिकरणाने 17 डिसेंबर 2018 रोजी निर्णय दिला आणि पुणे मनपाला दररोज 892 एमएलडी प्रमाणे वर्षभरात 11.5 टीएमसी पाणी द्यावे असा निर्णय दिला. प्रत्यक्षात रोज 1350 ते 1400 एमएलडी प्रमाणे वर्षभरात 17 ते 18 टीएमसी पाणी पुणे मनपा वापरते आहे. 980 एमएलडी पाणी पुणे मनपाने रोज शुद्ध करुन कालव्यात सोडण्याचे बंधन आहे ते ही पाळले जात नाही. महापालिकेच्या पुणे शहरातील वितरण प्रणालीतून पाण्याची गळती अधिकृतपणे 35 टक्के आहे. प्रत्यक्षातील गळती यापेक्षा अधिक आहे. म्हणजे पावणे पाच टीएमसी (50 हजार एकराचे) पाणी गळतीवर दाखविले जाते. याला विनोद, बेपर्वाई, चोरी, लबाडी की आणखीन काय म्हणायचे? मुख्य पाईपलाईनला ज्या सर्व्हिस लाईन असतात त्या अनेक ठिकाणी मनपाने टाकलेल्याच नाहीत. त्याऐवजी थेट मुख्य पाईपासूनच अनेकांना कनेक्शन्स दिली आहेत. यावरुन असे दिसून येते की देशामध्ये जास्तीत जास्त पाणी वापरणारे आणि सार्वत जास्त गळती करणारे पुणे हे एकमेव शहर असावे. यासाठी मनपा गुन्हेगार आहे. पुण्यातील जनतेवर याचे खापर फोडणे हे अत्यंत चुकीचे आहे.

पुणे शहराच्या पाण्याचे व्यवस्थापन पुणे महापालिका योग्य रितीने करीत नसल्यामुळे लोकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागतो आहे. चेन्नई सारख्या शहराची लोकसंख्या एक कोटी असताना त्यांचे 10-12 टीएमसीत भागते आणि आमचे भागत नाही याला कसले व्यवस्थापन म्हणायचे? हा सगळा अनागोंदी कारभार आहे. आहे त्या पाण्याचा विवेकाने वापर नाही. पाणी काटेकोरपणे व व्यवस्थित वापरले तर सद्यस्थितीत वापरल्या जाणाऱ्या पाण्यातून (18 टीएमसी) तीन पुणे शहरांची गरज भागणार आहे. ही वस्तुस्थिती आहे. या अपव्यय व जास्तीच्या पाणी वापराबद्दल कोणीच बोलत नाही. टाटाच्या धरणातील पाणी मागणाऱ्यांनी अगोदर पुण्याच्या गैरवापराबद्दल बोलून त्यांना सुधारावे. मग टाटाच्या पाण्याबद्दल बोलावे. पाणी वितरण प्रणालीच्या गळतीचा प्रश्न गेल्या 40 वर्षांपासून लोंबकळत आहे. पण त्यात दुरुस्ती करावी आणि येत्या 4-5 वर्षांत पाण्याचा होणारा ऱ्हास कायमचा थांबवावा अशी उमज मनपातील एकाही नगरसेवकाला येऊ नये याची खंत वाटते.



## अधिकचे पाणी-कितपत व्यवहार्य!

**कोयना प्रकल्पातून पूर्वेकडे जवळपास 40 टीएमसी पाणी वाहून जाते. त्यापैकी अद्यापी 25 टक्के पाणी सुद्धा सिंचनासाठी वापरले जात नसावे. त्या पाण्याचा कृष्णा नदीतून टेंभू-ताकारी सारख्या महाकाय योजनेद्वारेच वापर करावा लागणार आहे आणि हा पर्याय फार खर्चिक आहे. पूर्वेकडे उपलब्ध असलेले सर्वच पाणी सिंचनासाठी वापर करण्याकरिता आणखीन किती काळ लागेल हे आज कोणी सांगू शकत नाही. याचाच अर्थ असा होतो की उपलब्ध असलेले पाणी वापरण्याची क्षमता नसताना अधिकच्या पाण्याची मागणी करणे हे व्यवहार्य ठरत नाही.**







**लवाद काय सांगतो ?**

पूर्वीच्या बछावत लवादाने कोयना व टाटाच्या सर्व धरणातील मिळून एकूण 67.5 + 42.6 असे (110) टीएमसी पाणी पश्चिमेकडे वीज निर्मितीसाठी वळवायला परवानगी दिली होती. अशी प्रकारे सिंचनाऐवजी वीज निर्मितीसाठी दुसऱ्या खोऱ्यात पाणी वळविण्यास अनुमती देण्यासाठी आंध्र आणि कर्नाटक राज्यांनी टोकाचा विरोध केलेला आहे. त्यावेळेसच्या

राज्यातील जाणकार समाजधुरिणांनी महाराष्ट्रासाठी पाण्याइतकीच उर्जापण तितकीच महत्त्वाची आहे ही बाब बछावत लवादाला पटवून देवून पश्चिमेकडे वळविलेल्या पाण्याला सुरक्षितता मिळवून घेतली होती. म्हणजे आता एकूण 135.1 टीएमसी पाणी आपण वीज निर्मितीसाठी पश्चिमेकडे वळवू शकणार आहोत. ही वीज निर्मिती बंद करुन सिंचन, पिणे, उद्योग व अन्य कारणांसाठी हे पाणी वापरायचे ठरविले तर खालची कर्नाटक आणि आंध्रप्रदेश ही राज्ये या पाण्यात वाटा मागणार. मग त्याचे तीन हिस्से होणार. 25 टीएमसी जास्तीचे दिलेले पाणी वीजेसाठी नको असे महाराष्ट्राने म्हटल्याक्षणी लवाद लगेच 2013 मध्ये दिलेला आदेश रद्द करेल. कारण अजून या आदेशाचे नोटीफिकेशन निघालेले नाही. वीज निर्मिती ऐवजी हे पाणी परत पूर्वेकडे वळविले तर ते राज्य सरकारचे राहील हा भ्रम आहे. कोणतेही राज्य सरकार पाण्यावरचा आपला हक्क सोडून व इतरांना त्यात वाटेदार करुन घेऊन स्वतःच्या पायावर दगड घालून घेणार आहे.



टाटाचा करार इंग्रज सरकारशी 1910-15-20 या काळातला. ही धरणे बांधताना टाटांनी ब्रिटिश सरकार बरोबर करार केला आहे. ब्रिटिशांनी त्यावेळी जवळपास 45 हजार एकर जमीन संपादित करुन ती टाटांच्या ताब्यात दिली. या बदल्यात टाटाने सर्व पैसे ब्रिटिश सरकारला देवून जमीन आपल्या मालकीची करुन घेतली. आजही 30-35 हजार एकर जमीन टाटाकडे शिल्लक आहे. सगळ्या इंच न इंच जमिनीची किंमत चुकवून टाटाने ब्रिटिशांशी करार केलेला आहे. 42.6 टीएमसी पाणी वाज निर्मितीसाठी पश्चिमेकडे वळविण्यासंबंधी देखील लेखी करत आहे. त्याला वेळेचे बंधन नाही. जगाच्या अंतापर्यंत हा करार चालू राहणार आहे. याला परपेच्युअल ॲग्रीमेंन्ट म्हणतात. भारताला स्वातंत्र्य देत असताना ब्रिटिश सरकार आणि भारत सरकार यांच्यात एक लेखी करार होऊन ब्रिटिशांनी भारतात केलेले करार पाळण्याचे बंधन भारत सरकारवर घालण्यात आलेले आहे असेपण समजते. टाटांनी हा करार भारत सरकारशी केलेला नाही. त्यामुळे हे वीज प्रकल्प बंद करुन पाणी पूर्वेकडे सक्तीने वळविण्याचा कोणी प्रयत्न केला तर टाटा ब्रिटिश सरकारकडे आणि आंतरराष्ट्रीय न्यायालयापर्यंत हा तंटा घेऊन जाणार नाही याची कोणी ग्वाही देणार आहे का? टाटांनी स्वतः होऊन पाणी पूर्वेला देण्याची तयारी दाखविली तर गोष्ट निराळी आहे. पण असा एकतर्फी करार आपण तोडू शकत नाही. टाटांच्या धरणांमध्ये वीज तयार करण्यासाठी दरवर्षी जेवढे पाणी वापरले जाते ते वगळून त्यापेक्षा जास्तीचे काही पाणी शिल्लक राहात असेल आणि





# भीमा खोरे-दुर्धर रोगांचे माहेरघर

टाटाचे दरवर्षी सरासरीने वापरले जाणारे 42.6 टीएमसी पाणी पूर्वेकडे वळवून सिंचनामध्ये वाढ करण्याची स्वप्न पाहणाऱ्यांनी सध्या या प्रदेशासाठी उपलब्ध असलेल्या पाण्याचा परिणामकारक वापर केला जातो का याविषयी डोळे उघडे ठेवून पाहिजे पाहिजे. पीक रचनेमध्ये विषमता निर्माण केली जात आहे. ऊसासारखे पीक सलगपणे व वर्षानुवर्षे वाढविले जात आहे. सिंचनासाठी ठिबक, तुषार सारख्या आधुनिक सिंचन प्रणालीचा वापर फारसा केला जात नाही. शहरामध्ये केवळ पाणी वितरणाच्या प्रणालीत जवळपास अर्धे पाणी गळतीद्वारे वाया जात आहे. नागरी आणि औद्योगिक क्षेत्रांतून निर्माण झालेल्या सांडपाण्यावर गेल्या अनेक शतकांपासून प्रयत्न करुन सुद्धा प्रक्रिया केली जात नाही आणि त्याची शास्त्रीय पद्धतीने पुनर्वापराद्वारे विल्हेवाट लावली जात नाही. या दृष्टीने भीमा खोरे हे अनेक दुर्धर रोगांचे माहेरघर झालेले आहे. यावर उत्तर शोधण्याची सुबुद्धी प्रशासनाला आणि सामाजिक कार्यकर्त्यांना का येत नाही. समाज मेंढरासारखा हाकला जात आहे. या सर्व प्रश्नांच्या उत्तरातून भीमा खोऱ्याचा प्रश्न निश्चितपणे निकाली लागणार आहे. असे न करता जवळचे पाणी प्रदुषित आहे म्हणून शेकडो किलोमीटर लांबीवरील वीज निर्मितीसाठी वापरले जाणारे पाणी पाईपलाईनच्या ग्रीडद्वारे सोलापूर जिल्ह्यात पसरवून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवावा अशी मागणी करणाऱ्यांना अंतर्मुख होण्याचा सल्ला देणे अनाठायी ठरु नये !



त्याचा वापर होत नसेल तर ते पाणी टाटांना मागायला हरकत नाही. त्यांनी त्यासाठी काही किंमत मागितली तर ती देण्याची आपली तयारी असली पाहिजे. शिवाय पाणी उपसा करुन उचलावे लागणार असेल तर त्यासाठी येणारा खर्चही सोसण्याची लाभार्थींची मानसिकता असली पाहिजे. मुळात गेल्या 100 वर्षांच्या पाणी वापरातून असे दिसून आले आहे की करारानुसार अनुज्ञेय असलेले पाणी सुद्धा दरवर्षी टाटाला मिळत नाही असे टाटांच्या दस्तऐवजांवरून दिसून येते. ही सामाजिक व राष्ट्रीय संपत्ती आहे. तिचे वाटप, वापर काटेकोरपणे व बारकाईने व्हायचा असेल आणि पाण्याच्या प्रत्येक थेंबाची उत्पादकता मोजायची असेल तर कॅलिफोर्नियाप्रमाणे पुणे शहराचे पाणी वाटपही निरनिराळ्या खासगी कंपन्यांकडे दिले पाहिजे. कॅलिफोर्निया ॲक्वाडक्टमध्ये तीस कंपन्या पाण्याचा सगळा व्यवहार पाहतात. या संदर्भात डॉ. दि. मा. मोरे यांचा एक लेख नुकताच कृषितीर्थ

# पश्चिमेचे पाणी पूर्वेला



**पश्चिमेचे पाणी पूर्वेला आणणे हा प्रश्न पूर्णतः राजकीय आहे. कोयना, मुळशी धरणाच्या उभारणीपासूनचे हे राजकारण आहे. काळाच्या ओघात तात्त्विक विचार वेगळा आणि समाजाची मनोधारणा वेगळी झालेली आहे. मुळशी धरण करू नये म्हणून सेनापती बापट यांनी फटके खाल्ले. आधुनिक काळात बापटांना कोणी वेडे म्हणेल. काळाच्या ओघात गरजा बदलतात त्याप्रमाणे समाजाची मनोधारणा बदलत राहते. पश्चिमेकडे पाणी वळवितात म्हणून त्यावेळेला विरोध झाला नाही. बापटांनी पुनर्वसनाच्या मुद्द्यावर धरणाला विरोध केला. कोयनेच्या वेळेला पश्चिमेला पाणी वळवायचे म्हणून महाराष्ट्राने आग्रह धरला. कारण विजेचा तुटवडा होता आणि मुंबईला कारखानदारी उभी करायची होती. कृष्णा लवादात आपण पश्चिमेला पाणी वळवू द्या असा आग्रह धरला आणि आंध्र, कर्नाटकाने त्याला विरोध केला. आता आपण पश्चिमेचे पाणी पूर्वेला वळवा असे म्हणतो याचे कारण शेतीला पाणी कमी पडते म्हणून. समाजाची मनोधारणा बदलली. पूर्वेकडे पाणी वळवा असे म्हटले तर त्यातले दोन तृतीयांश पाणी आंध्र व कर्नाटकाला जाणार ही त्यातली अडचण आहे. म्हणून न्या. ब्रिजेशकुमार यांच्या अध्यक्षतेखालील लवादाचा अंतिम निर्णय जाहीर होऊन लेखी नोटीफिकेशन निघेपर्यंत आपण महाराष्ट्राने या प्रश्नाविषयी फारसे प्रकट न बोलणे सूज्ञपणाचे राहील. अन्यथा आपली वीजही जाईल आणि पाणीही जाईल.**

मासिकात प्रसिद्ध झाला आहे. तशीच व्यवस्था आपल्यालाही बसवावी लागेल. राज्यातील सर्वच पाण्यासाठी आज ना उद्या लोकप्रतिनिधींवर सगळा भार टाकून जमणार नाही. तेवढी त्यांची क्षमता नाही व अभ्यासही नाही. पाण्याचे व्यवस्थापन हे शास्त्रशुद्धपणे तज्ज्ञ व तंत्रज्ञांमार्फतच व्हायला पाहिजे. आज कोणीही उठतो आणि कुठेही पाणी न्या असे म्हणतो. स्वतंत्र भारताला घटना बदलण्याचा अधिकार आहे तर टाटाबरोबर केलेला करार का बदलता येत नाही अशी उर्मटपणाची भाषा करणाऱ्यांनी या विषयातील गांभीर्य व गुंतागुंत समजून घ्यावी. केरळ सरकारला 1875 च्या दरम्यान तामिळनाडू राज्याबरोबर पेरियार नदीच्या पाणी वापराचा 999 वर्षे मुदतीचा करार मोडता आलेला नाही. करार पायदळी तुडविणे हे घटना बदलण्याइतके सोपे नाही. हे यावरुन दिसून येते. पाण्याला काही अर्थशास्त्र आहे. त्याच्या वाहतुक व व्यवस्थापनासाठी काही खर्च येतो. काही ठिकाणी भौगोलिक व निसर्गाच्या मर्यादाही असतात. त्या लक्षात न घेता बरेचजण अभ्यास न करता पाणीप्रश्नाचे भाष्यकार झाले आहेत. असल्या फुटाण्यांच्या वाचाळ बडबडीकडे आपण किती गांभीर्याने पाहायचे हेही एकदा ठरवायला हवे. समन्याय्यी पाणी वाटप हा शब्द खोटा आणि फसवा आहे. निसर्गानेच पाण्याच्या उपलब्धतेत विषमता निर्माण करुन ठेवलेली आहे. त्यामुळे सगळ्या जमिनींना व शेतांना आपण बारमाही एकसारखे पाणी कधीही देवू शकणार नाही या वास्तवाचे भान ठेवून मागण्या केल्या पाहिजेत.

राज्याचा वा देशाचा विकास केवळ पाणी या एकाच संसाधनाने होतो अशा स्वप्नवत कल्पनेमध्ये जाणकारांनी वावरु नये. पाणी हे सगळ्याच गुंतागुंतीच्या प्रश्नांचे उत्तर देऊ शकत नाही. विकासासाठी अनेक पर्यायी साधने आहेत त्याचाही साकल्याने विचार करण्याची गरज आहे. पाण्याच्या वारेमाप वापराने नको त्या प्रदेशात ऊसासारखे पीक वाढविणे आणि नागरी वस्तीला पुणे शहरासारखी सूज येऊ देणे ही विकासाची परिभाषा होऊ शकत नाही. टाटासारख्या खासगी कंपनीने वीज निर्माण करुन बाहेरच्या देशात वीज विकलेली नाही. या देशाच्या सर्वांगीण विकासासाठीच ती वीज वापरली जात आहे आणि यापुढेही या स्थितीत बदल होणार नाही. असे असताना खासगी, सरकारी असे शब्द चर्चेमध्ये आणून वितंडवाद संपविण्याची सुबुद्धी जाणकारांना व्हावी यासाठी केलेला हा लेखन प्रपंच आहे.

**(टीप : लेखक पाणीप्रश्नाचे अभ्यासक असून या लेखातील मते ही त्यांची वैयक्तिक आहेत. पक्षाच्या धोरणाशी त्याचा संबंध नाही.)**

इस्लामिक स्टेटचा दहशतवाद आता श्रीलंकेपर्यंत जाऊन पोहोचलेला आहे. याचा अर्थ इस्लामिक स्टेटचे एक पाऊल भारताच्या दिशेने पुढे पडलेले आहे असा होतो. वास्तविक इस्लामिक स्टेटविरूद्धच्या लढ्यात अमेरिकेने जी आघाडी उघडली, तीत श्रीलंकेचा सहभाग नसतानाही तिथे ही दहशतवादी संघटना पोहोचली, त्याअर्थी ती कुठेही नजिकच्या काळात पोहोचू शकते. इराक किंवा सिरीया या देशातला पराभव हा अन्यत्र उगवायचा सूड ठरू शकतो. इस्लामिक स्टेटचा प्रमुख अबू बकर अल बगदादीने गेल्या पाच वर्षांमध्ये पहिल्यांदाच आपण जिवंत असल्याचा पुरावा आपल्या एका व्हिडिओद्वारे दिला आहे. त्याने  श्रीलंकेतल्या या स्फोटांचे समर्थन केले आहे. श्रीलंकेत आतापर्यंत बौद्ध आणि मुस्लिम यांच्यात काही ठिकाणी तुरळक म्हणता येतील अशा चकमकी घडलेल्या आहेत, पण या चकमकी काहीच नव्हेत अशा स्फोटांना त्या देशाला तोंड द्यावे लागलेले आहे. यात बौद्ध कुठेही नाहीत, तर श्रीलंकेत अल्पसंख्य असणाऱ्या ख्रिश्चन समाजावर हल्ला करण्यात आला आहे. दि. २१ एप्रिल रोजी श्रीलंकेत ईस्टर रविवारी तीन चर्च आणि तीन पंचतारांकित हॉटेल यांच्यावर हे आत्मघाती हल्ले घडविण्यात आले. या हल्ल्यांमध्ये साडेतीनशेवर व्यक्ती मृत्यूमुखी पडल्या. चारशेवर स्त्रीपुरुष या हल्ल्यात जखमी झालेले आहेत.





त्या दिवशी प्रार्थनेसाठी चर्चमध्ये जमलेल्या समुदायावर हल्ला करणाऱ्यांनी एकाच जागेवर अनेकांना ठार करता येईल, अशा पद्धतीचा वापर केला. सकाळी ठीक ८ वाजून पंचेचाळीस मिनिटांनी पहिला हल्ला कोलंबोत सेंट अँथनी चर्च आणि त्याचवेळी कोलंबोच्याच किंग्जबरी हॉटेलमध्ये आत्मघाती 'बॉंबर्स'नी हे स्फोट घडवले. वेळ तीच, पण नेगोम्बोमध्ये सेंट सॅबॅस्टियन चर्चमध्ये तिसऱ्या एका व्यक्तीने आत्मघाती हल्ला केला. त्यानंतर आठ वाजून पन्नास मिनिटांनी कोलंबोच्याच सिनॅमन ग्रॅंड हॉटेलमध्ये आत्मघाती हल्ला घडवण्यात आला. ८ वाजून ५७ मिनिटांनी कोलंबोच्या शांग्रिला हॉटेलमध्ये आत्मघाती हल्ला झाला आणि त्यानंतर सकाळी ९ वाजून ५ मिनिटांनी बट्टिकलोआमध्ये झिऑन चर्चमध्ये स्फोट झाला, तर दुपारी पावणेदोन वाजता देहीवालामध्ये ट्रॉपिकाना इन या हॉटेलमध्ये स्फोट झाला. तर शेवटचा स्फोट हा दुपारी सव्वादोन वाजता देमांतगोडामध्ये एका वसाहतीत हा आत्मघाती स्फोट झाला. आजचे जग हे अतिवेगवान आहे असे मानले जाते, असे असताना एका ठिकाणाहून





अरविंद व्यं. गोखले

# आत्मघात श्रीलंकेत, धोका भारताला!




दुसऱ्या ठिकाणापर्यंत या स्फोटांविषयी माहिती कळूनसुद्धा खबरदारी का घेण्यात आली नाही किंवा त्यांच्यापैकी कुणालाच आपल्या इथे अशा काही स्फोटांची मालिका घडून येईल, याची कल्पनाच का आली नाही? यापैकी बट्टिकलोआ हा भाग तामिळ दहशतवाद्यांनी एकेकाळी पोखरलेला भाग म्हणून ओळखण्यात येतो. तो प्रदेश तर श्रीलंकेच्या कोलंबो या राजधानीच्या शहरापासून खूपच दूर अंतरावर आहे. तिथल्या चर्चमध्ये हा स्फोट घडवणाऱ्याने तो तामिळ दहशतवाद्यांकडूनच घडवला गेला असल्याचा समज पसरवायचा प्रयत्न केला असावा अशी शक्यता आहे. ही ठिकाणे मी अशासाठी दिली आहेत की वाचकांपैकी ज्यांनी ज्यांनी श्रीलंकेला कधी भेट दिली असेल, त्यांना ती परिचयाची असू शकतात. मी स्वत: यातल्या काही ठिकाणांना अनेक वर्षांपूर्वी भेट दिलेली आहे. ज्यांनी हे स्फोट घडवले त्यांनी कित्येक वर्षांपासून त्यासंबंधातली तयारी केलेली होती हेही आता उघडकीस आले आहे. श्रीलंकेला भारतीय गुप्तचर खात्याने असा काही हल्ला केला जाऊ शकतो, हे काही दिवसांपूर्वी कळवलेले होते, पण श्रीलंकेच्या सरकारने त्याकडे दुर्लक्ष केल्याचे श्रीलंकेचे पंतप्रधान रानील विक्रमसिंघे यांनी मान्य केले आहे. विक्रमसिंघे आणि त्या देशाचे अध्यक्ष मैत्रीपाल सिरीसेना यांच्यात अनेक बाबतींमध्ये मतभेद आहेत, त्याचा परिणाम देशाच्या सुरक्षा व्यवस्थेवर झाल्याचे श्रीलंकेतल्या राजकारण्यांचे म्हणणे आहे.

आतापर्यंत जगभर झालेल्या इस्लामिक स्टेटच्या किंवा तशाच अन्य दहशतवादी हल्ल्यांमध्ये प्रामुख्याने अतिशय दरिद्री वर्गातल्यांचा किंवा अगदी मिसरूडही न फुटलेल्या अशा तरुणांचा सहभाग असल्याचे आढळून येत असे, पण आता परिस्थितीने बरा असणारा वर्गही त्यात उतरतो आहे. श्रीलंकेतल्या दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार झहरन हाशिम हा असून तो 'नॅशनल तौहिद जमात' या संघटनेचा प्रमुख आहे. तो स्वत:ला मुस्लिम धर्मगुरु म्हणवून घेतो आणि त्याने बऱ्याच जणांना धर्मद्वेषाचे विष पाजलेले आहे. त्याचे वडिल हे रस्त्यांवर खाद्यपदार्थ विकायचे, पण त्यांच्या या मुलाने धार्मिक शिक्षण घेऊन स्वत:चे स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्याला मदत करणारा अहमद इब्राहिम हा उद्योगपती घराण्यातला आहे. तो मसाल्यांच्या व्यवसायात आहे. दोघेही गडगंज श्रीमंत आहेत. या दोघांची 'इस्लामिक स्टेट ऑफ इराक अँड सिरीया' म्हणजेच आयसिस या संघटनेशी बांधिलकी होती.



शांग्रिला हॉटेलमध्ये झालेल्या आत्मघाती हल्ल्यात हाशिमने स्वत:ला उडवले आणि अनेकांचा जीव घेतला. त्यात डेन्मार्कचा अब्जाधिश







उद्योगपती आंद्रेस हॉल्श पॉवल्सेनची तीन मुले आणि शांता मयदुने ही पंचतारांकित हॉटेल व्यवसायातली नामांकित शेफ यांचाही समावेश आहे. या आत्मघाती हल्ल्याच्या वेळी त्याच परिसरात इब्राहिम हाही होता, असे सीसी टीव्हीवर मिळालेल्या छायाचित्रांवरून स्पष्ट झाले आहे. तोही मेला आहे.

हाशिम हा गेल्या काही वर्षांपासून मशिदींमध्ये आणि सामाजिक माध्यमांमध्ये अतिशय स्फोटक अशी विधाने



करत होता, तेव्हा जरी त्याच्याकडे सरकारी यंत्रणांचे लक्ष गेले असते तरी हे पुढले हत्याकांड टळले असते. दि. २१ एप्रिल रोजी हाशिम आणि इब्राहिम हे दोघे हसत हसत हॉटेलमध्ये प्रवेश करताना आणि सरकता जिना चढताना सीसी टीव्हीच्या चित्रणात दिसत आहेत. श्रीलंकेत कट्टणकुडीला हाशिम राहतो आणि त्याच्यापासून तिथला मुस्लिम समाज आजवर लांबच राहिलेला आहे. श्रीलंकेतला सुफी मुस्लिम समाज हा प्रामुख्याने अन्य मुस्लिमांपासून दूरच राहतो. हा समाज सर्वसमावेशकतेला अधिक स्थान देतो, पण त्यांचे कडव्या विचारसरणीच्या समाजाशी फारसे चालत नाही. ते कधीही एकमेकांमध्ये मिसळून राहात नाहीत. या दहशतवाद्यांच्या तौहिद जमातीविषयी आताच एकदम माहिती कळते आहे असे नाही. तौहिद जमात म्हणजे एकेश्वार मानणारी संघटना. थोडक्यात अल्लाखेरीज अन्य कोणी नाही आणि ही संघटना प्रामुख्याने जे निरीश्वरवादी आहेत किंवा काफिर आहेत, त्यांच्याविषयी समाजात घृणा पसरवण्याचेच काम करत असते. ज्यांचा या हल्ल्यात हात आहे, पण जे त्याकडे दुरून लक्ष ठेवत होते अशा कित्येकांना श्रीलंकेच्या पोलीसांनी ताब्यात घेतलेले आहे. या सर्व स्फोटांचे चित्रण परदेशांमध्ये पाठवून तिथे नवे दहशतवादी तयार करणे हे एक उद्दिष्ट्य यासारख्या संघटनांचे असते. तसेच ज्यांनी हे काम सोपवलेले असते त्यांच्याकडे या चित्रणाला सोपवून त्यातून अधिक पैसा निर्माण करण्याकडे आणि त्या पैशातून आणखी दहशतवादी तयार करण्याकडे त्यांचा कल असतो. दहशतवाद्यांना खतपाणी घालायचेच काम ते करत असतात. श्रीलंकेच्या आत्मघाती स्फोटांमध्ये प्रत्यक्ष सहभाग घेणारे एकूण नऊजण होते आणि ते सर्व (८ पुरुष आणि १ महिला) त्यात मारले गेले, पण त्यामागे जी फळी होती, त्यापैकी काहीजण त्यांच्या निवासस्थानावर घातलेल्या छाप्यानंतर करण्यात आलेल्या स्फोटांमध्ये मारले गेले. या



ठिकाणी स्फोटकांची जाकिटे तयार करण्याचे काम चाललेले होते. छापा घालताच तिथल्या महिलांनीच स्फोट घडवून आणले आणि तिथे उपस्थित सर्वांना मारले. त्यात त्यांची सहा मुलेही होती, असे सांगण्यात येत आहे. असे काही कारखाने अन्य काही भागांमध्ये असण्याची शक्यता सध्या पडताळून



पाहिली जात आहे. असा हा भाग दक्षिण श्रीलंकेत असण्याची शक्यता गृहित धरण्यात आली आहे. उत्तर भागात आणि ईशान्य भागात तामिळांची प्रमुख वस्ती आहे तिथे ते जाऊन छाप्यांचे संकट ओढवून घेतील असे नाही. जिथे संशयाला जागाच नाही, अशा ठिकाणी काम करण्याची त्यांची वृत्ती असू शकते. ज्या व्यक्तींनी परदेशांमध्ये दहशतवादी प्रशिक्षण घेतलेले आहे ते देश कोणते तेही तपासले जात आहे. यामध्ये पाकिस्तानचा संशय हा सर्वप्रथम घेतला जातो.


पाकिस्तानातून अगदी अलीकडेच सागरमार्गाने आलेला अमली पदार्थांचा मोठा साठा पकडण्यात आला. याचा अर्थही उघड आहे. या अशा व्यवहारांमध्ये पाकिस्तानची ‘इंटर सर्व्हिसेस इंटेलिजन्स’ म्हणजेच ‘आयएसआय’ ही लष्कराची गुप्तचर संघटना अधिक तरबेज आहे. ती या संघटनांची आश्रयदाता असते. अशीच मदत सौदी अरेबियाकडून होत असते, तथापि अलीकडल्या काळात सौदी अरेबियाला चांगल्या कामातही आपले पैसे गुंतवले जावेत असे वाटू लागल्याने ते त्यातल्या त्यात सावध झाले आहेत, पण पाकिस्तानचे तसे नाही. ते केवळ दहशतवादच देशादेशांमध्ये गुंतवू शकतात. अमेरिकेपासून ते फिलीपाईन्स, नेपाळ, म्यानमारपर्यंत त्यांचे हे चाळे चालू असतात. अगदी सर्वकालीक मैत्रीचे बळकट धागे असल्याचा ज्यांच्याबाबतीत पाकिस्तानकडून सातत्याने प्रचार केला जातो त्या चीनच्या सिंझियांग प्रांतापर्यंतही त्यांचे हात पोहोचलेले आहेत. चीनमध्ये अशी परिस्थिती निर्माण करायची की, त्यांना आपल्या मदतीशिवाय तिचे निवारण करता येणार नाही. असे म्हटले जाते की, या तौहिद जमातीचे प्रमुख कार्यालय हे तामिळनाडूमध्ये आहे. कदाचित त्यामुळेही असेल, महाराष्ट्र, गोवा, केरळ, तामिळनाडू, कर्नाटक या राज्यांना केंद्रीय गुप्तचरांकडून धोक्याचा इशाराही देण्यात आला आहे. त्याकडे वरवर पाहून चालणार नाही.

न्यूझिलंडच्या ख्राईस्ट चर्चमध्ये असलेल्या अल नूर मशिदीवर १५ मार्च २०१९ रोजी एका वर्णद्वेष्ट्याने केलेल्या अंदाधुंद गोळीबारात ५० जण मृत झाले आणि तितकेच जखमी झाले. ते सगळेच मुस्लिम होते आणि त्याचा सूड म्हणून हा

हल्ला करण्यात आला असण्याची शक्यता अनेकांनी वर्तविली होती, पण त्याचा सूड श्रीलंकेत का म्हणून घेण्यात आला ते कोणीच सांगू शकत नाही. या हल्ल्याचे पडसाद कदाचित आपल्या देशातही उमटू शकतात असे अनुमान केरळमध्ये पकडण्यात आलेल्या रियाझ अबू बकर आणि अबू दुजाना या दोघांमुळे बांधता येऊ शकते आणि त्यासाठी पोषक वातावरण आपल्या इथे आधीपासूनच तयार करण्यात आलेले आहे हे विसरता येत नाही. केरळमधून इराक आणि सिरीया या देशांमध्ये इस्लामिक स्टेटमध्ये दाखल होणाऱ्या तरुणांची संख्या दुर्लक्ष करता येण्याजोगी नाही. यापैकी काहीजण तिकडेच मारले गेले. काही परागंदा झाले. त्यातूनच गेल्या काही वर्षांमध्ये इथे होत असलेले धार्मिक आणि जातीय विद्वेषाचे वातावरण या सगळ्या गोष्टींना पूरक ठरत असल्याची त्यांची खूणगाठ असू शकते. आपल्याकडे तसे वातावरण नाही, किंवा आपल्या गुप्तचर संघटना सक्षम आहेत, असा कितीही आपला दावा असला तरी त्यात फारसे तथ्य नाही. आपल्याकडे असे हल्ले झालेले नाहीत, असे सांगण्यासारखी स्थिती नाही. काश्मीरमध्ये यापूर्वी इस्लामिक स्टेटचे झेंडे फडकत होते, पण ते आपल्या सैन्याला डिवचण्यासाठी होते असे मानले तरी श्रीलंकेत आता झालेल्या आत्मघाती बॉंबहल्ल्यानंतर पश्चिम बंगालमध्ये अचानकपणे काही ठिकाणी 'आम्ही येत आहोत' असे इस्लामिक स्टेटचे फलक झळकणे हा काही योगायोग मानता येत नाही. श्रीलंका गेल्या शतकाच्या सत्तरच्या दशकात तामिळ दहशतवादाने होरपळली होती, तो दहशतवाद १९ मे २००९ रोजी लिबरेशन टायगर्स ऑफ तामिळ इलम'चा नेता व्ही. प्रभाकरन याला ठार करण्यात आल्यानंतर संपला. त्यानंतर श्रीलंकेत पुन्हा एकदा पर्यटनाला चांगली चालना मिळाली. पण आता हे क्षणभंगूर ठरले आहे.

श्रीलंकेने तामिळ दहशतवादाचा पूर्ण खात्मा केला ही वस्तुस्थिती आहे. त्यांनी मानवतावादाला तिलांजली दिली असेल, पण त्यांनी ते करून दाखवले. श्रीलंकेची लोकसंख्या २ कोटी १४ लाख आहे. त्यापैकी ७०.४ टक्के बौद्ध आहेत. हिंदू १२.६ टक्के आहेत, तर मुस्लिम ९.७ टक्के आणि ख्रिश्चन ६.२ टक्के आहेत. ख्रिश्चनांमध्ये ८२ टक्के हे रोमन कॅथॉलिक आहेत. एखादा टक्का हा अन्य







समाजांचा असू शकतो. श्रीलंकेचे अध्यक्ष सिरिसेना यांनी देशाचे संरक्षण सचिव आणि पोलीसप्रमुख यांना राजीनामा द्यायचा आदेश दिला, त्याप्रमाणे त्यांनी तो दिला. हे दोघे या सर्व परिस्थितीला जबाबदार आहेत, असे त्यांनी म्हटले होते. ते खरे असेलही पण पंतप्रधान आणि अध्यक्ष यांच्यात मतभेद असल्याचे जे चित्र बाहेर रंगवले जात असते, त्याचाही परिणाम सुरक्षा यंत्रणेवर पडत असतो हे लक्षात घेण्याची आवश्यकता आहे. पोलीसांनी या आत्मघाती हल्ल्यांनंतर मुस्लिमांना दर शुक्रवारचा मशिदीत होणारा नमाज आपआपल्या घरी अदा करण्यास सांगितले आहे. तसेच श्रीलंकेच्या सरकारने कोणत्याही महिलेला यापुढे बुरख्यात राहता येणार नाही, असाही आदेश काढला आहे. बुरख्यात किंवा तोंड झाकून घेण्याच्या पद्धतींमुळे आतला चेहरा नक्की कोणाचा ते कळत नाही, असे कारण देऊन त्यांनी हा आदेश काढला आहे. विशेष हे की हा आदेश काढण्यापूर्वी मुस्लिम संघटनांशी चर्चा करून मग हा निर्णय घेण्यात आला आणि या संघटनांनीही तशा आदेशाला आपली हरकत नसल्याचे स्पष्ट केले आहे.

जाता जाता एका गोष्टीकडे वाचकांचे लक्ष वेधायचे आहे. इस्लामिक स्टेटचे अंतिम 'ध्येय' हे खोरासनाची निर्मिती हे आहे. खोरासन हा इराणच्या ईशान्येला असणारा आणि मध्य आशियाला जोडून असलेला भाग. इस्लामिक स्टेटला जो स्वत:चा खुरासन वा खोरासन निर्माण करायचा आहे तो भाग इराणच्या दक्षिणेपासून अफगाणिस्तानच्या काही प्रदेशासह, पाकिस्तानचा आणि पाकिस्तानव्याप्त काश्मीरचा काही भाग, तसेच पंजाब, हरियाना, राजस्तान आणि काश्मीरच्या काही प्रदेशासह चीनच्या सिंकियांगपर्यंत एक भाग समजून नवा खुरासन निर्माण करायचा आहे. त्यासाठी त्या संघटनेची वाटेल ती किंमत मोजायची तयारी आहे. सईद सलीम शाहजादच्या 'इनसाइड अल् काईदा अँड तालिबान, बीयाँड नाईन इलेव्हन' या पुस्तकात याविषयीचा बराच तपशील आहे. (पुस्तकाचे मराठी भाषांतर 'अल काईदा ते तालिबान' या नावाने उपलब्ध आहे.) श्रीलंकेचा सर्व भाग हा या संकल्पित खुरासनापासून बराच दूर आहे. मोठ्या उद्दिष्टासाठी लहान उद्दिष्टाला पायाखाली घेण्याची ही खेळी असू शकते. भारताकडे सरकण्यापूर्वीची ही धमकी असू शकते. त्यासाठी सावध राहण्याखेरीज आपण दुसरे काय करू शकतो?

# मतांसाठी आगतिक धडपड व सुटलेला तोल!

**आकाश**
नवी दिल्ली



‘हेमंत करकरेंना मी शाप दिला आणि काही दिवसातच अतिरेक्यांच्या गोळ्यांना ते बळी पडले !’ -- साध्वी प्रज्ञा

(भोपाळच्या भाजप उमेदवार)

‘हो, बाबरी मशीद मीच पाडली. मी ही मशीद पाडताना वर त्या घुमटावर होते !’ - साध्वी प्रज्ञा

अशा अनेक बेलगाम, बेताल विधानांचे दाखले देता येतील. सत्तेत राहण्यासाठी बेचैन, व्याकुळ झालेले हे जीव आहेत. काहीही करुन, कसेही करुन हातातली सत्ता जाऊ नये यासाठी भाजपचा जिवापाड प्रयत्न, धडपड सुरु आहे. त्या भरात ते वाटेल ते बोलत सुटले आहेत. त्यांचे भान नव्हे तर विवेक संपलेला आहे.

भाजपने भोपाळहून मालेगाव बाँबस्फोटातील एक आरोपी साध्वी प्रज्ञा यांना उमेदवारी दिली. काँग्रेसने माजी मुख्यमंत्री व वरिष्ठ नेते दिग्विजयसिंग यांना भोपाळहून उभे केल्याने त्यांच्यासमोर असा उमेदवार द्यायचा की दिग्विजयसिंग यांना अडचण झाली पाहिजे अशी खूणगाठ मनाशी बांधून भाजपने साध्वी प्रज्ञा यांना उमेदवारी दिली. स्वतःला ‘पार्टी विथ डिफरन्स’(इतरांपेक्षा वेगळा पक्ष) म्हणून बढाई व फुशारकी मारणाऱ्या या पक्षाने एका गंभीर आरोप असलेल्या व्यक्तीला उमेदवारी देणे ही बाब वादग्रस्तच राहणार आहे. अर्थात ज्ञान-चारित्र्य-एकता व नैतिकता या गुणांवर मक्तेदारीचा दावा सांगणाऱ्या भाजप व परिवाराकडून नैतिकतेची अपेक्षा करणे चुकीचेच आहे.

साध्वी प्रज्ञा यांनी उमेदवारी मिळाल्यानंतर आपली जीभ ज्या रीतीने सैल सोडली ती पाहता त्यांनी त्यांची उमेदवार म्हणून केलेली निवड सार्थ ठरवली. सर्वप्रथम साध्वींनी महाराष्ट्राच्या ‘एटीएस’ म्हणजे दहशतवादविरोधी पथकाचे प्रमुख हेमंत करकरे यांच्यावर हल्ला चढविला. करकरे आज हयात नाहीत. या शूरवीर पोलिस अधिकाऱ्याने मुंबई हल्ल्यात(26-11) प्राणांचे बलिदान दिले. देशासाठी हा कुणाही व्यक्तीने केलेला सर्वोच्च त्याग असतो. करकरे यांना अशोकचक्राने सन्मानित करण्यात आले. त्या शहीद करकरे यांचा मृत्यु आपल्या शापाने झाल्याची दर्पोक्ति या साध्वीने केली. साध्वींच्या विधानाशी जुजबी फारकत घेण्याचा लटका प्रकार भाजपनेतृत्वाने केला. परंतु या देशाच्या पंतप्रधानांना करकरे यांच्या बलिदानापेक्षा साध्वींना दिलेल्या उमेदवारीचे समर्थन करावेसे वाटले. त्यांच्यापुढे एक पाऊल जाऊन या देशातल्या न्याययंत्रणेला फाट्यावर मारुन भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षांनी साध्वी प्रज्ञा यांच्याविरुध्दचे आरोप



खोटे आहेत असे जाहीरही करुन टाकले. म्हणजे भाजपच्या अध्यक्षांनी ते देशातल्या न्यायालयांपेक्षा वर आहेत आणि मोठे आहेत हे दाखविताना साध्वी प्रज्ञा यांना दोषमुक्ततेचे प्रमाणपत्रही देऊन टाकले. गेल्या सत्तर वर्षात इतका राजकीय निगरगट्टपणा व विधिनिषेधशून्यता अनुभवाला आली नव्हती.



मुळात दहशतवादी कृत्याबद्दलचे आरोप असलेल्या आरोपीला उमेदवारी देणे कोणत्या नैतिकतेत बसते हा सवाल आहे. इतर राजकीय पक्षांनी असे काही केले असते तर भाजपच्या नैतिकतेला जाग येऊन त्यांनी किंचाळत, आक्रस्ताळेपणा करीत अकाडतांडव करण्यास सुरुवात केली असती. परंतु आता सत्तेत असल्याने त्यांना सर्व गुन्हे माफ आहेत.





साध्वी प्रज्ञा यांच्या जाज्वल्य शापामुळे हेमंत करकरे यांना मृत्युला तोंड द्यावे लागले या विधानामुळे जो गदारोळ व्हायचा तो झाला. देशभक्ति, पुलवामा शहीद, देशाची सेना, सैनिक यांच्या नावाने सध्या मते मागितली जात आहेत. याबाबत खुद्द अनेक सेनाधिकारी, न्यायालये आणि निवडणूक आयोगाने अनेक वेळेस इशारे देऊनही भाजपचे सूत्रधार मात्र निगरगट्टपणे त्यास न जुमानता आपला लज्जाहीन प्रचार चालू ठेवत आहेत. प्रज्ञा यांचा या विधानाबद्दल सार्वत्रिक निषेध झाला. भारतीय पोलिस सेवे(आयपीएस)तर्फे देखील या विधानाचा निषेध करण्यात आला. ज्युलिओ रिबेरो यांच्यासारख्या पंजाबमधील दहशतवादाविरुध्द लढलेल्या अधिकाऱ्याने देखील याबद्दल खेद प्रकट केला. परंतु पंजाबमधील दहशतवादाचा मुकाबला केलेले तेथील माजी पोलिस महासंचालक आणि महाराष्ट्रात देखील ज्यांनी महासंचालकपद भूषविले त्या एस.एस.विर्क यांनी एका इंग्रजी वृत्तपत्रात लेख लिहून अक्षरशः या प्रकाराच्या चिंधड्या उडवल्या आहेत. हेमंत करकरे यांना साध्वी प्रज्ञा यांनी शाप दिला आणि पाकिस्तानी अतिरेकी अजहर मसूद याचा दूत होऊन आलेल्या पाक अतिरेक्यांनी करकरे यांना गोळ्या घालून साध्वी प्रज्ञा यांच्या शापाची अंमलबजावणी केली. म्हणजेच करकरे यांच्यासारख्या देशभक्त अधिकाऱ्याला




यमसदनी धाडणे हे मौलाना मसूद अजहर आणि साध्वी प्रज्ञा या दोघांचे समान उद्दिष्ट होते असे अनुमान कुणी काढले तर त्यात काही वावगे नसेल ! साध्वी प्रज्ञा आणि मौलाना मसूद अजहर हे एकाच पारड्यातले आहेत असेच मानावे लागेल. कोणत्याही धर्मातले धर्मांध हे एकमेकांना परस्पर-पूरक असतात.









त्यामुळेच त्यांची दहशतवादाची दुकाने अखंड चालू राहतात. त्यामुळेच साध्वी प्रज्ञा यांना दिलेल्या उमेदवारीचा अर्थ कसा लावायचा ? उद्या पाकिस्तानात सत्तारूढ पक्षाने मुंबई हल्ल्यांना जबाबदार हाफीज सईद किंवा जैश ए मुहम्मदचा म्होरक्या मौलाना मसूद अजहर यांना निवडणुकीत उमेदवारी दिली तर काय होईल? तेव्हा भारताला त्याविरुध्द आवाज उठविता येईल ? सारासार विवेक गमावलेल्या भाजपच्या सूत्रधारांनी पाकिस्तानच्या तुलनेत भारताचा आंतरराष्ट्रीय राजकारणात असलेला नैतिक दबदबा खतम करण्याचा उचललेला हा विडा आहे. अत्यंत हलक्या प्रतीचे व सवंग राजकारण सुरु करुन या सूत्रधारांनी भारताच्या चेहऱ्याला काळिमा फासला आहे.

विर्क यांनी करकरे यांच्या मृत्युपूर्वी महिनाभर आधी त्यांच्या व करकरे यांच्या झालेल्या चर्चेचा संदर्भही लेखात दिला आहे. मराठवाड्यातील काही गावांमध्ये काही स्फोट झाल्याच्या घटना घडल्या होत्या. स्फोटके हाताळताना हे अपघात झाल्याचे सकृतदर्शनी मानले गेले होते. परंतु या दोन-तीन घटनांमध्ये एक समान सूत्र होते की यात गुंतलेल्या व्यक्ती या काही विशिष्ट अशा हिंदू कट्टरपंथी संघटनांशी संबंधित असल्याचे निष्पन्न झाले होते. करकरे तेव्हाही 'एटीएस'चे प्रमुख

होते आणि ज्यावेळी त्यांनी अधिक खोलात जाऊन तपास केला त्यावेळी त्यांना 'अभिनव भारत' नावाने काही कट्टरपंथी हिंदू गट एकत्र आल्याचे आढळून आले. त्यांनी आणखी खोलात जाऊन तपास केल्यानंतर त्यांना या संघटनेतर्फे जाणूनबुजून काही हिंदू धार्मिक स्थळांजवळ बाँबस्फोट करुन मुस्लिमांच्या विरोधात वातावरणनिर्मितीच्या प्रयत्नांचे काही दाखले व पुरावेही मिळाले. यानंतर मालेगाव बाँबस्फोटाची घटना घडली. मालेगावच्या घटनेच्या तपासाची जबाबदारी करकरे यांच्या नेतृत्वाखालील 'एटीएस'कडे आली. तपास करताकरता या प्रकरणात वापरण्यात आलेल्या मोटरसायकलीच्या मालकाचा शोध घेताघेता साध्वी प्रज्ञा यांचे नाव पुढे आले. ही मोटरसायकल त्यांच्या नावाने नोंदलेली असल्याचे निष्पन्न झाले. यामुळे कट्टरपंथी हिंदू संघटनांतर्फे केल्या गेलेल्या आधीच्या कारवाया, स्फोटकांचा वापर, चुकून झालेले स्फोट व त्यात गुंतलेल्या व्यक्ती व त्यांचा कट्टरपंथी संघटनांशी असलेला संबंध या कड्या परस्परांशी जुळू लागल्या. करकरे यांनी हिंदू कट्टरपंथीयांच्या घेतलेल्या मागोव्याला आता ठोस आधार मिळालेला होता आणि त्यानंतर साध्वी प्रज्ञा आणि त्यांच्या सहकाऱ्यांना पकडण्यात आले.

यापूर्वीच्या एका घटनेचा संदर्भ येथे देणे आवश्यक आहे. मध्य प्रदेशातील देवास येथे सुनील जोशी नावाच्या रा.स्व.संघाच्या स्वयंसेवकाच्या खुनाच्या आरोपावरुन सप्टेंबर-2008 मध्ये या साध्वींना अटक करण्यात आली होती. मध्य प्रदेशात त्यावेळी भाजपचेच म्हणजे शिवराजसिंग चौहान यांचे सरकार होते. त्यांनीच साध्वींना पकडले होते. त्या व त्यांच्या काही साथीदारांसह खुनाचे आरोपही ठेवले होते. सुनील जोशी यांचे नाव अजमेर स्फोट, समझोता एक्सप्रेस स्फोट, मक्का मसजिद स्फोटांच्या प्रकरणात होते.

गुजरातमधील



राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!



गुजरात दंगलीची छायाचित्रे



दंग्यांमध्येही या स्वयंसेवकाचे नाव होते. आता एकाच टोळीतल्या या स्वयंसेवकाचा खून होण्याचे कारण काय ? पुढे आलेल्या माहितीनुसार सुनील जोशी यांनी साध्वींशी काही अनुचित वर्तन केल्यामुळे संतप्त होऊन साध्वी व त्यांच्या साथीदारांनी सुनील जोशीची हत्या केली अशी माहिती तपासात समजली होती. साध्वींच्या बरोबरीने इतर सहाजणांवर आरोपपत्र सादर करण्यात आले होते. परंतु केंद्रात सत्ताबदल झाल्यानंतर म्हणजेच फेब्रुवारी-2017 मध्ये देवासचे अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश राजीवकुमार आपटी यांनी या सर्व आरोपींची मुक्तता केली. या सर्व माहितीचा अर्थ एवढाच की या मंडळींचे खरे स्वरुप काय आहे याची माहिती मिळावी.

मालेगाव खटल्यातून या साध्वींची अद्याप मुक्तता

गोध्रा हत्याकांडातील दोषी भाजपच्या श्रीमती कोदनानी





हेमंत करकरे यांचा तिरंगी झेंड्यात गुंडाळलेला मृतदेह

झालेली नाही. त्या प्रकृतीच्या कारणास्तव जामीनावर आहेत. आणि आता तर त्या भाजपच्या उमेदवार झाल्या आहेत. सध्याच्या राजवटीत सर्व संस्था, कायदे, नियम मोडण्याचे आणि ते मोडूनही कारवाई न होण्याची विशेष सुविधा भाजप व त्यांच्या परिवारास विशेष उपलब्ध आहे. त्यानुसारच साध्वी भाजपच्या उमेदवार झाल्याने त्यांना आता या देशातले कोणतेच कायदे-कानून लागू होणार नाहीत. त्यानुसार त्यांनी उजळमाथ्याने प्रचार वगैरे सुरु केलेला आहे. तर अशा या साध्वी आहेत. सध्याची राजवट किती पक्षपाती आहे आणि त्यांनी सर्व संस्थांना कसे आपल्या कब्जात केले आहे याचा एक नमुना यानिमित्ताने पुढे आला आहे. साध्वी प्रज्ञा यांनी प्रकृतीच्या कारणास्तव जामीन घेतलेला आहे. परंतु ज्याअर्थी त्या निवडणूक लढवीत आहेत याचा अर्थ त्यांची प्रकृति ठीक आहे असे मानण्यास पूर्ण जागा आहे. त्यामुळेच त्यांच्या या जामीनाला आव्हान देणारा अर्ज मालेगाव स्फोटात मृतांच्या नातेवाईकांनी विशेष एनआयए न्यायालयात केला. त्यावर न्यायालयाने एनआयए(नॅशनल इन्व्हेस्टिगेशन एजन्सी)ची बाजू काय अशी विचारणा केली असता त्यांनी हा चेंडू निवडणूक आयोगाच्या हद्दीत टोलविला. सध्या निवडणूक चालू असल्याने कुणाला निवडणुकीला उभे राहू द्यायचे अथवा नाही किंवा उमेदवाराबाबत निर्णय करण्याचे अधिकार सर्वस्वी निवडणूक आयोगाला आहेत. एनआयएला याबाबत अधिकार नाहीत असे म्हणून बिनदिक्कतपणे हात वर केले आहेत. थोडक्यात टोलवाटोलवी करुन त्यांची निवडणूक पार पडू द्यायची. मागाहून काय होईल ते बघता येईल असा अत्यंत निगरगट्ट व लज्जाहीन पवित्रा घेण्यात आला आहे. साध्वी प्रज्ञा यांना प्रकृतीच्या कारणास्तव चालता येत नाही असे सांगण्यात येते. परंतु आतापर्यंत टीव्हीवर त्यांची विविध दृष्ये दाखविण्यात आली आहेत व त्यात त्या व्यवस्थित चालताना दिसलेल्या आहेत. त्यामुळेच त्यांच्या जामीनासाठी देण्यात आलेले प्रकृतीचे कारणही कितपत सबळ आहे याबद्दल शंका निर्माण होतात.

साध्वी प्रज्ञा या व्यक्तीला बाजुला ठेवले तरी भाजपच्या आणि भाजपपेक्षाही भाजपच्या शिखरस्थानी जी मंडळी आहेत त्यांच्या मनोवृत्तीवर प्रकाश टाकणारा हा निर्णय आहे. एकीकडे


साध्वी ऋतुंबरा


अटलबिहारी वाजपेयी


सुनिल जोशी


उमा भारती

विकास व प्रगतीच्या फुशारक्या मारायच्या परंतु प्रत्यक्षात निवडणुकीत मात्र धर्माच्या नावाने, अतिशय चलाखीने अल्पसंख्यक समाजाच्या विरोधात वातावरणनिर्मिती करुन, मते मागण्याचा प्रकार सुरु आहे. साध्वी प्रज्ञा यांना तिकिट देणे म्हणजे कट्टर हिंदुत्वाच्या दिशेने टाकलेले पाऊल आहे.

साध्वींनी हिंदू राष्ट्राच्या कल्पनेवरही आपले तारे तोडलेले आहेत. अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळातही उमा भारती किंवा साध्वी ऋतंभरा यांच्यासारख्या आक्रमक महिला सत्तापक्षाशीच निगडित होत्या. परंतु साध्वी ऋतंभरा यांना अंतरावरच ठेवण्यात आले होते. त्यावेळचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी त्यांच्या लखनौ मतदारसंघात देखील कधीही या कट्टरपंथी नेत्यांना त्यांचा प्रचार करु दिला नव्हता. परंतु वर्तमान पंतप्रधान साध्वी प्रज्ञा यांना केवळ उमेदवारीच देत नाहीत तर त्यांचे जाहीर समर्थन करतात. सत्ता टिकविण्यासाठी एखादा नेता किती खालच्या पातळीचे राजकारण करु शकतो याचे हे जिवंत उदाहरण आहे. अशी माहिती कानावर येते की समझोता एक्सप्रेस बाँबस्फोट खटल्यातून पुराव्याअभावी सुटका झालेल्या स्वामी असीमानंद याना पश्चिम बंगालमधून उभे करण्याच्या हालचाली चालू होत्या. ते मूळ बंगाली असल्याने भाजपच्या सूत्रधारांनी त्यांना उमेदवारी देण्याबाबतची शक्यता पडताळून पाहिलेली होती परंतु बहुधा फेरविचारानंतर हा विचार मागे पडला असावा.



निवडणुकीत प्रगती व विकासाचे कार्ड चालत नसल्याने मोदी-शहा या जोडीने हुकमाचा एकमेव पत्ता असलेला धार्मिक ध्रुवीकरणाचा मुद्दा पुढे केला. कट्टर हिंदुत्वाचा उन्माद फैलावणे आणि हिंदूंची मते आपल्या पदरात कशी पडतील याची तजवीज करणे हा खेळ त्यांनी अखेरीस खेळला. परंतु ज्याप्रमाणे अपराधी हा कुठेतरी एखादी चूक करुन जातच असतो व त्याआधारेच तपास होऊन तो गजाआड होतो तसेच या राजकारणाबाबतही म्हणता येईल. या जोडगोळीने कट्टर हिंदुत्वाचे कार्ड खेळले खरे. परंतु या साध्वींनी पहिला हल्लाच हेमंत करकरे यांच्यावर केल्याने त्याची तीव्र प्रतिक्रिया उमटली. भाजपच्या आणि विशेषतः जोडगोळीच्या या सवंग राजकारणाबद्दलची पहिली तीव्र नापसंती यानिमित्ताने लोकांनी जाहीरपणे व्यक्त केली. सत्ता टिकविण्यासाठी आगतिक झालेल्या या जोडगोळीने विधिनिषेधशून्यतेचा कळस गाठलेला आहे परंतु त्याची प्रतिक्रियाही अनपेक्षितपणे तेवढ्याच तीव्रतेने उमटलेली असल्याने जोडगोळी हादरली आहे. या निर्णयाची परिणिती काय झाली आहे याचा पडताळा 23 मे रोजीच येईल!!



# चला अणुबाँब टाकू या?

**तथागत**

**‘आमच्याकडचे अणुबाँब काय दिवाळीसाठी ठेवलेत काय ?’** – पंतप्रधान नरेंद्र मोदी.

भारतासारख्या एका जबाबदार देशाच्या पंतप्रधानांचे हे उद्‌गार आहेत. या एका विधानावरुन अन्य एखाद्या देशात प्रचंड गदारोळ झाला असता. परंतु भारतीय मतदार आणि जनता टोकाची सहनशील असल्याने म्हणा किंवा त्यांना अणुबाँबच्या विनाश आणि संहाराबाबत असलेल्या अज्ञानामुळे म्हणा, पंतप्रधान हे अत्यंत बेजबाबदार विधान करुन नेहमीप्रमाणे निसटून गेले आहेत.

अणुबाँबचा एकदाच वापर करण्यात आला. 1945 मध्ये अमेरिकेने जपानमधील हिरोशिमा–नागासाकीवर अणुबाँबचा पहिला वापर केला. 6 ऑगस्ट 1945 रोजी हिरोशिमावर व 9 ऑगस्ट रोजी नागासाकी शहरावर अणुबाँब टाकण्यात आले. या दोन्ही ठिकाणी मिळून सुमारे सव्वादोन लाख लोकांचा मृत्यु झाला. हे सर्व निरपराध नागरिक होते. पण अणुबाँबचे दुष्परिणाम त्या दिवसापुरते मर्यादित नसतात.



**निवडणुकीतील मतांचे राजकारण करण्यासाठी व सवंग लोकप्रियतेकरिता पंतप्रधान नरेंद्र मोदी जाहीर भाषणांमधून काय वाट्टेल ते बोलताहेत. पाकिस्तानवर अणुबाँब टाकण्याची भाषाही करून पंतप्रधानांनी स्वतःचे आणि देशाचे हसू करून घेतले आहे. उत्तर कोरियाचा किम जाँग ऊन आणि अमेरिकेचे ट्रम्प ज्या पद्धतीची भाषा करतात त्याच धर्तीवर मोदीही बोलू लागल्यामुळे त्यांचे भान आणि संयम आता सुटू लागला आहे असे दिसून येते. हे कशामुळे घडते आहे याचे उत्तर २३ मे नंतर कळेलच!**

जपानच्या पुढच्या तीन पिढ्यांना या अणुबाँबचे दुष्परिणाम झेलावे लागले. कारण अणुबाँबमुळे प्रथम स्फोटात मानवी हानी ही होतेच. परंतु त्यानंतर या गॅमा किरणांचा उत्सर्ग सुरु होतो. ही किरणे हवेत पसरतात. अन्य हानिकारक किरणांचाही उत्सर्ग होतो. हा किरणोत्सर्ग केवळ बाँब फुटलेल्या स्थानापुरता मर्यादित नसतो. तो आजुबाजुच्या परिसरात पसरतो. कित्येक मैलांपर्यंत त्याची व्याप्ती होते. या किरणांमुळे होते काय? या किरणांमुळे त्वचा जळते, त्वचेचे विकार होतात, मोठ्या प्रमाणात विविध प्रकारच्या कॅन्सरचा प्रादुर्भाव होतो. यामध्ये रक्ताच्या, हाडांच्या कर्करोगाचे प्रमाण अधिक राहते कारण तुम्ही नाकावाटे घेत असलेली हवाही पूर्णपणे प्रदूषित झालेली असते व त्यातून हे कर्करोग होतात. ज्या महिला गर्भवती असतात त्यांच्या गर्भांवर अत्यंत वाईट परिणाम होतो. त्यांची संतती एकतर मृत्यु पावते किंवा जन्माला आलीच तर विद्रूप, विकृत, अपंग अशा अवस्थेत असण्याची शक्यता असते. हे परिणाम जवळपास दोन

पिढ्यांपर्यंत टिकू शकतात हे संशोधनाने सिध्द झालेले आहे. म्हणजेच हे दुष्परिणाम केवळ एकाच पिढीपुरते मर्यादित रहात नाहीत. त्याचप्रमाणे किरणोत्सर्ग हा तुमच्या घरांच्या नेहमीच्या भिंती रोखू शकत नाही. त्यामुळे किरणोत्सर्गाची बाधा होऊ नये यासाठी फार खबरदारी घ्यावी लागते.

अणुबाँबची संहारकता व तिची व्याप्ती कशी व किती असते याची अत्यंत सामान्य भाषेतली ही माहिती आहे. त्याचप्रमाणे जगातला कोणताही राष्ट्रप्रमुख अशा धमक्या देत नसतो. याला अपवाद दोनच आहेत. त्यांना जगात कुणीही चांगल्या नजरेने पहात नाहीत. उत्तर कोरियाचे हुकुमशहा किम जाँग ऊन आणि अमेरिकेचे तऱ्हेवाईक अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप ! हे दोन्ही नेते 'नॉर्मल' मानले जात नाहीत. किम यांनी काही काळापूर्वी अमेरिकेवर डागता येतील अशी अण्वस्त्रे असून त्याचे बटण आपल्या हातात असल्याचे म्हटले होते. त्यावर ट्रंप यांनी प्रत्युत्तर देताना त्यांच्या हातात कोरियापेक्षा मोठे बटण असल्याचे म्हटले होते. त्याच मालिकेत आता भारतीय पंतप्रधानांनी भारताकडील अण्वस्त्रे ही काय दिवाळीतल्या फटाक्यासारखी नसल्याचे विधान केले आहे. भारतासारख्या जबाबदार आणि खंडप्राय देशाच्या पंतप्रधानाला अत्यंत अशोभनीय असे हे वक्तव्य आहे.

भारत आणि पाकिस्तानची सीमा परस्परांना लागून आहे. दोन्ही देशांमधील सीमापरिसर हा लोकवस्तीचा आहे. अजुनही रस्तेमार्गाने दोन्ही देशात वाहतूक होत असते. लाहोर हे पाकिस्तानातले प्रमुख शहर भारताच्या सीमेपासून सुमारे




Nagasaki










पन्नास किलोमीटर अंतरावर आहे. अमृतसरहून जवळपास पाऊण तासात किंवा फारतर एका तासात लाहोरमध्ये पोहोचता येते. लाहोरमध्ये अणुबाँब टाकला तर त्याची झळ अमृतसर या शीखांच्या सर्वात पवित्र मानल्या जाणाऱ्या तीर्थक्षेत्राला बसणार नाही ? लाहोर ते दिल्ली अंतर फक्त 407 किलोमीटर आहे. दिल्ली-लाहोर बससेवा चालते. दिल्लीपर्यंत किरणोत्सर्ग येणार नाही ? दिल्ली ते इस्लामाबाद अंतर फक्त 675 किलोमीटर आहे. दिल्ली ते मुंबई अंतर 1300 तर दिल्ली-पुणे अंतर 1500 किलोमीटर आहे. म्हणजेच दिल्ली ही पाकिस्तानला अधिक जवळ आहे. पाकिस्तानवर अणुबाँब टाकला तर दिल्ली वाचणार आहे ? दिल्ली सोडा पण पाकिस्तान-भारत सीमेवर असलेली गावे व त्यात राहणारी निरपराध माणसे यांचे काय होणार आहे ? त्यांचा कोणताही अपराध नसताना त्यांना मृत्युमुखी पडावे लागणार आहे. राजस्थान, पंजाब आणि काश्मीर या तीन राज्यांच्या सीमा पाकिस्तानला लागून आहेत. अण्वस्त्रांमुळे होणारी हानि अटळ असेलच. परंतु किरणोत्सर्गामुळे होणारी हानि ही दोन ते तीन पिढ्यांपर्यंत टिकते. हिरोशिमा आणि नागासाकी या शहरावर अमेरिकेने अणुबाँब टाकल्यानंतरच्या दुष्परिणामांचा उल्लेख वर केलेलाच आहे. त्यामुळे जगातल्या कोणत्याही देशाचा प्रमुख अण्वस्त्रांबाबत विनोदाने देखील अशा प्रकारे हलक्या किंवा सवंग टिप्पण्या करताना आढळत नाहीत. अणुबाँब किंवा अण्वस्त्रे ही विनोदाचा किंवा सहज किरकोळीने उल्लेख करण्याचे विषय नाहीत.













पंतप्रधान असताना अटलबिहारी वाजपेयी यांनी पोखरण येथे अणुबाँबची चाचणी घेतली ते दृश्य.

परंतु देशाचे नेतृत्व सुमारबुध्दीच्या व्यक्तींकडे असेल तर असे प्रकार घडतात.

यासंदर्भात पूर्वीचे काही दाखले देण्यासारखे आहेत. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असतानाचे हे प्रसंग आहेत. त्यावेळी वाजपेयींच्या मंत्रिमंडळात मदनलाल खुराना हे संसदीय कामकाजमंत्री होते. प्रसिध्दीची बेसुमार हौस असलेले खुराना दिवसातून तीनतीनवेळेस पत्रकार परिषदा घ्यायचे आणि संसदेतील ताज्या घडामोडींची माहिती ते पत्रकारांना देत असत.

पाकिस्तानकडून भारताच्या कुरापती काढण्याचे प्रकार सतत चालूच असतात. त्यावेळेसही काहीतरी असाच प्रकार घडला आणि संसदीय कामकाजमंत्री या नात्याने खुराना यांनी पाकिस्तानला इशारा देताना म्हटले, 'पाकिस्तानला काय वाटते ? पाकिस्तानने भारताबरोबरच्या युध्दाची तारीख, वेळ आणि जागा निश्चित करावी. भारत युध्दाला घाबरत नाही !'


एकप्रकारे हे चिथावणी देणारे वक्तव्य होते. दुसऱ्या दिवशी संसदेत या विधानावरुन हंगामा होणे अटळच होते आणि तसे घडलेही. लोकसभेत विरोधी पक्षांनी सरकारला चांगलेच धारेवर धरले. वाजपेयी यांच्यासारखा परराष्ट्र संबंध आणि कूटनीती जाणणारा नेता असूनही विरोधी पक्षांनी

चांगलेच आक्रमक रूप धारण केले. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते व सर्वात ज्येष्ठ आणि अनुभवी असलेले सदस्य इंद्रजित गुप्त हे त्यांच्या उपरोधपूर्ण व बोचऱ्या शैलीबद्दल प्रसिध्द होते. त्यांनी त्यांच्या त्या खास चिमटे काढण्याच्या शैलीत म्हटले, 'सरकारचे एक मंत्री एखाद्या धंदेवाईक पैलवान किंवा दादाप्रमाणे पाकिस्तानला आव्हान देत आहेत की पाकिस्तानने फक्त जागा, वेळ व दिवस सांगावा, पाकिस्तानशी युध्द केले जाईल !' इंद्रजित गुप्त यांच्या त्या चिमट्यावर आख्खे सभागृह खळखळून हसले. वाजपेयी हजर होते तेही हसले.

पण खुराना हे पण अगदी सरळ स्वभावाचे होते. त्यांना त्यांची चूक समजून आली होती. त्यांनी तत्काळ उठून माफी मागितली व हसतखेळत हा पेच संपला. परंतु खुराना यांची चूक मानण्याची तयारी, वाजपेयी यांच्यासारखे संयमी नेतृत्व असल्याने हा पेच सहजपणे मिटला. परंतु जेव्हा एखादा मंत्री एखादे असे गंभीर विधान करतो तेव्हा ते विधान म्हणजे त्या सरकारची अधिकृत भूमिका म्हणून आंतरराष्ट्रीय जगात मानले जात असते. त्यामुळेच कोणत्याही मंत्र्यावर आंतरराष्ट्रीय स्वरुपाची वक्तव्ये करण्यावर मोठी बंधने असतात. परंतु सध्या या देशाचे नेते व सूत्रधारच वाटेल तशी बेताल विधाने करीत सुटले आहेत. त्यांना आवर कोण घालणार?

आणखी एका प्रसंगाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. वाजपेयी सरकारने अणुस्फोट किंवा अणुचाचण्या केलेल्या होत्या. त्या काहीशा वादग्रस्तही ठरल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर संसदेत चर्चा झाली होती. भाजपच्या मंडळींना अणुबाँब, अण्वस्त्रे म्हटले की आवसान येते. त्यामुळे त्यावेळीही आक्रमक अशा मंडळींनी अण्वस्त्रे ही काय शोभेला आहेत काय अशा आशयाचे काहीतरी विधान संसदेत केले होते. या चर्चेच्या वेळी पंतप्रधान वाजपेयी, माजी पंतप्रधान चंद्रशेखर हे उपस्थित होते. वरील आशयाचे विधान ऐकताच चंद्रशेखर तिरिमिरीतच उठले आणि वाजपेयींनी उद्देशून त्यांनी म्हटले, 'गुरुवर्य, सुन रहे है ?'(ते वाजपेयींना गुरुवर्य म्हणत) त्याच आवेशात त्यांनी म्हटले की 'अरे लाहोरवर बाँब टाकला तर तुमची दिल्ली तरी


**अटलबिहारी वाजपेयी**




**इंद्रजित गुप्त**



**मदनलाल खुराना**





**चंद्रशेखर**



**ब्रिजेश मिश्र**

वाचणार आहे काय ?' चंद्रशेखर यांच्या म्हणण्याचा अर्थ हा होता की अणुबाँबबाबत इतक्या हलकेपणाने बोलू नये आणि अणुबाँब किंवा अण्वस्त्रांचा वापर ही चेष्टा किंवा हलकेपणाने घेण्याची बाब नाही. त्याचे परिणाम गंभीर असतात. म्हणूनच कुणीही अशा सहजपणे या विषयावर बोलू नये. त्याचे आंतरराष्ट्रीय परिणाम वेगवेगळे होतात.

वाजपेयी यांच्या काळात अणुचाचण्या झाल्याचा उल्लेख वर आलाच आहे. या चाचण्यांना विरोध झाला होता कारण जी क्षमता भारताकडे आधीपासून आहे त्यावर आणखी ठामपणे शिक्कामोर्तब करणे आवश्यक नव्हते. परंतु सर्व पक्षांनी त्यास पाठिंबा दिला. यानंतर पाकिस्तानने देखील स्वतःची अशी अण्विक नीती किंवा 'अण्विक नीती तत्व' किंवा 'न्युक्लिअर डॉक्ट्रिन' आखण्याची आवश्यकता निर्माण झाली. त्यावेळचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार ब्रजेश मिश्र यांच्यावर वाजपेयींनी हे नीतीतत्व तयार करण्याची जबाबदारी सोपवली. त्यानुसार भारताने 'नो फर्स्ट यूज' म्हणजेच भारत कधीही अण्वस्त्रांचा प्रथम वापर करणार नाही अशी हमी जगाला दिली. त्याचप्रमाणे केवळ स्वसंरक्षणासाठी अण्वस्त्रांचा वापर करण्याचे तत्वही अधोरेखित करण्यात आले. त्यामुळे वर्तमान पंतप्रधानांनी निवडणूक प्रचारसभेत जेव्हा, 'अण्वस्त्रे ही काय दिवाळीसाठी आहेत काय ?' असे विधान केले त्यावेळी आंतरराष्ट्रीय जगतात हाच प्रश्न







अण्विक चाचण्या करुन भारताला प्रत्युत्तर दिले. म्हणजेच भारत व पाकिस्तान हे दोन्ही शेजारी देश अण्वस्त्रधारी झाले असा त्याचा अर्थ झाला. भारताने त्यावेळी अण्विक चाचण्या केल्या नसत्या तर पाकिस्तानला परस्पर आण्विक चाचण्या करण्याचे धाडस झाले असते काय आणि भारताचा जो एक नैतिक दबदबा व वरचष्मा व धाक अण्विक क्षेत्रात होता तो कायम टिकविणे शक्य झाले असते काय या प्रश्नांवर आजही चर्चा केली जात असते. परंतु यानंतरच भारताला चर्चेत आला की भारताने आपल्या अण्विक नीतीत बदल केला आहे काय ? सुदैवाने निवडणूक प्रचारसभेतील विधान असल्याने त्याची दखल त्याच पध्दतीने घेतली गेली. परंतु चीनतर्फे त्याबाबत काही उपरोधीक असे प्रश्न विचारण्यात आल्याच्या बातम्या प्रसिध्द झाल्या.

गंभीर विधाने हलकेपणाने करण्याची सवय ही घातक असते. यातून पेचप्रसंग निर्माण होऊ शकतात. परंतु प्रत्येक गोष्ट ही मतांसाठी करायची सवय असलेल्यांना विधाने

करण्याचे भान रहात नाही. अणूबाँब, अण्वस्त्रे, सुरक्षा, सेनादले या मुद्यांचा वापर मते मिळविण्यासाठी केला जात नसतो. कारण एकतर त्या विषयावर देशात सर्वसाधारणपणे सर्वसंमती असते. ते विषय पक्षीय राजकारणाचे मानले जात नाहीत. किंबहुना गेल्या सत्तर वर्षात कधीही या मुद्यांवर मते मागण्याचे प्रकार करण्यात आले नव्हते. परंतु भान नसलेले आणि सुमारबुध्दी नेतृत्व असल्यास या मुद्यांवरही सवंग राजकारण खेळण्याचे प्रकार केले जातात. प्रचाराची पातळी व शिष्टसंमत सभ्यता पाळण्याबाबत अन्य राजकीय पक्षांनी हरकती घेतल्यास त्यांच्यावर सरळसरळपणे देशद्रोही म्हणून शिक्का मारण्याचा असभ्यपणा करणे हे सर्व प्रकार किंवा घडीघडीला आपण स्वतः म्हणजे 125 कोटि जनता असल्याचा उच्चार करणे ही सर्व लक्षणे स्वकेंद्रित अशा एकाधिकारशहाच्या नेतृत्वाची असतात. त्यामुळेच भारताची वाटचाल या एकाधिकारशाहीच्या दिशेने सुरु असल्याची चिन्हे दिसू लागली आहेत. त्यामुळेच या निवडणुकीचा प्रचार हा अशा पूर्वी कधीही उपयोगात न आणलेल्या मुद्यांच्या आधारे सुरु करण्यात आलेला आहे. पूर्णपणे विधिनिषेधशून्यपणे हा प्रचार अनियंत्रितपणे सुरु आहे. त्याचप्रमाणे प्रगती व विकासाचे मुद्दे असफल ठरत असल्याचे आणि ते मुद्दे जनतेच्या गळी उतरविणे अशक्य झाल्याने भाजप महानायकांनी सुरक्षा, अण्वस्त्रे, सर्जिकल स्ट्राईक,





सध्या सुरु आहेत. ही एक स्वनामधन्यतेची आणि अन्य राजकीय पक्ष व नेतृत्वाला बदनाम करण्याची मोहिम आहे. जेणेकरुन विरोधी पक्षांना मतदारांच्या नजरेतून उतरविणे आणि आपणच देशभक्ति, साहस, हिंमत, धैर्य यांचे कसे मूर्तिमंत प्रतीक आहोत हे दाखविण्याचा हा प्रकार आहे. केवळ आपणच देशाचे हितकर्ते आणि रक्षणकर्ते असल्याचे सांगणे. आपल्याला मत म्हणजेच भाजपला मत असे सांगून आपण स्वतःच म्हणजे भाजप असल्याचे सांगणे सेनादलांची मर्दुमकी यावर मतांचा जोगवा मागण्याचे सत्र आरंभले आहे. येथे हे नमूद करावे लागेल जवळपास शंभर माजी सेनाधिकाऱ्यांनी सरकारने सेनादलांचा वापर मते मागण्यासाठी करु नये असे पत्रक काढूनही भाजपचे नेते जुमानत नाहीत अशी स्थिती आहे. त्यामुळेच केवळ सत्तेत टिकून राहण्यासाठी सुरु असलेल्या वर्तमान नेतृत्वाचा आटापिटा जसा उबग आणणारा आहे तसाच तो संभाव्य किंवा भावी स्थितीबाबत चिंता उत्पन्न करणारा आहे!



## घंटाकर्ण, नवी दिल्ली
# चव्हाटा



## शापवाणी ते महिषासुर मर्दिनी!

मालेगाव बाँबस्फोटाशी निगडित प्रकरणात आरोपी असलेल्या साध्वी प्रज्ञा यांना भाजपने भोपाळहून उमेदवारी दिल्यानंतर वाद होणार हे अपेक्षितच होते.

झालेही तसेच !

हे प्रकार इतके वाढले की अखेर भाजपनेतृत्व आणि रा.स्व.संघ परिवार यांनी अक्षरशः साध्वींना भोपाळच्या कार्यालयात बोलावून घेतले आणि हात जोडून तोंडाला आवर घालायची विनंती केली. साध्वींनी त्यातही वाद निर्माण केलाच ! माझ्या वक्तव्यांमुळे शत्रुंचा लाभ होत असल्याने मी आता तोंडाला आवर घालणार आहे असे त्यांनी सांगितले. पहिल्याच पत्रकार परिषदेत साध्वींनी त्यांच्या पोलिसकोठडीतील कथित छळाची कहाणी सांगितली. या खटल्यात आपल्याला कसे खोटेपणाने गोवण्यात आल्याचा दावाही केला. या कहाण्या सांगितल्यानंतर त्यांनी या प्रकाराबद्दल त्यावेळचे दहशतवादविरोधी पथकाचे प्रमुख हेमंत करकरे यांना आपण शाप दिल्याचा गौप्यस्फोट केला. आणि त्यांच्या शापाचा प्रताप हा की काही दिवसांनंतरच









हेमंत करकरे यांचा 26 नोव्हेंबर रोजी मुंबईवर दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात मृत्यु झाला. करकरे शहीद झाले. मुंबईवर हल्ला करणाऱ्यांशी लढताना त्यांनी प्राणांचे बलिदान देऊन देशासाठी सर्वोच्च त्याग केला. त्याबद्दल त्यांना अशोकचक्रही मिळाले.

पण छे ! कसले ते शहीद ? साध्वींचा जाज्वल्य शाप त्यांना नडला! यावरुन झालेल्या गदारोळाने भाजप व त्यांच्या सूत्रधारांच्या तोंडचे पाणी पळाले. एकीकडे सेनादले, पुलवामाचे शहीद यांच्या नावे मतांचा जोगवा मागताना साध्वींनी एका शहीदालाच शाप दिल्याचा गौप्यस्फोट करुन टाकला आणि पक्षाची पंचाईत करुन टाकली.

अखेर अब्रू वाचवण्यासाठी माफी मागून व विधान मागे घेऊन साध्वींची सुटका करण्यात आली. पण साध्वी त्या साध्वीच! त्यांनी त्यांचे प्रतिस्पर्धी काँग्रेसचे वरिष्ठ नेते दिग्विजयसिंग यांना महिषासुराची उपमा दिली. दिग्विजयसिंग हे पुराणातील महिषासुर आहेत आणि आपण ‘महिषासुर मर्दिनी’ म्हणून या निवडणुकीत उतरलो असून दिग्विजयसिंग रुपी महिषासुराचा नायनाट करु असे त्यांनी जाहीर करुन टाकले.

व्वा ! काय ती भाषा ? काय तो आवेश??

भाजपचा खरा चेहरा उघड झालाच पण निवडणुकीत मतांसाठी भाजपचे सध्याचे सूत्रधार किती खालच्या पातळीपर्यंत जाऊ शकतील याची झलक साध्वींच्या रुपाने मिळाली आहे.

मेरा भारत महान !

# मतांसाठीची मजबुरी, अशी ही बनवाबनवी!



निवडणुकीत मते मिळवण्यासाठी राजकीय नेत्यांचे रुपांतर 'अभिनेत्यात' होताना अनेकांनी पाहिले असेल. मतदारांना आकर्षित करण्यासाठी वाटेल त्या थरापर्यंत जाण्याची नेत्यांची तयारी असते.

कर्नाटकात एका उमेदवाराने मतदारसंघाच्या दौऱ्यात कुठेतरी चालू असलेल्या लग्नसमारंभात म्हणे 'नाग-नृत्य' म्हणजे 'नाग-डान्स' केला. हल्ली म्हणे हा नाग-नागिण नाच लग्न व अन्य समारंभांमध्ये फार लोकप्रिय आहे. तर या उमेदवार महाशयांनी हा 'नाग-नाच' केला. बहुधा ते मतदारांपुढे सरपटले सुध्दा असतील! आता आपल्या देशाच्या युगपुरुषांचेच उदाहरण घ्या ! निवडणूक प्रचारामुळे त्यांच्या वाणीला उधाण आले आहे. एकीकडे त्यांना त्यांच्या भक्तांनी 'विष्णु-अवतार' म्हटल्यावर संतोष होतच असणार ना? पण निवडणुकीत सामान्यांची, गोरगरीबांची मते हवी असतात. मग सूटबुटातले हे 'साहेब' लगेच खूप गरीब होतात.

मी गरीब घरातला आहे, चहावाला आहे वगैरे वगैरे ! अलीकडे ते चौकीदाराच्या भूमिकेत आहेत !

गुजरातमध्ये प्रचाराला गेल्यावर ते लगेच स्वतःला 'गुज्जू' म्हणू लागतात. 'इस गुज्जू ने, चायवालेने उनको (सोनिया-राहूल) जमानत के लिए मजबूर किया इसलिए वो गुस्से में है' असे हलके वक्तव्य ते करतात. पण कधीकधी हा डाव अंगाशीही येतो. छत्तीसगढमध्ये या महोदयांनी ते ज्या तेली समाजाचे आहेत व त्यांचे 'मोदी' हे आडनाव छत्तीसगढमधल्या 'साहू' या व्यापारी समाजाशी समकक्ष असल्याचे सांगून 'राहूल गांधी मला चोर म्हणतात म्हणजेच तुम्हा साहू समाजालाही चोर म्हणतात' असा दुष्प्रचार सुरु केला.पण बनावटपणा तो बनावटपणाच ना ? साहू





समाजाच्या नेत्यांनी एक पत्रक काढून ‘असल्या चलाख्या बंद करा, आमचा समाज एक स्वाभिमानी समाज आहे आणि अशा हलक्या गोष्टी सहन केल्या जाणार नाहीत’ असा इशाराच देऊन टाकला. आणखी काही ठिकाणी हे महाशय स्वतःला मागासवर्गीय असल्याने आपली हेटाळणी केली जात असल्याचे बेमालूम खोटे सांगताना आढळतात. हल्ली तर ते सर्वत्र ‘मोदी ने ये किया’ ‘मोदी ने वो किया’ असेच सर्वत्र सांगत हिंडत असतात. राजस्थानात जाऊन त्यांनी फारच भन्नाट विधान केले. ‘अणुबाँब किंवा अण्वस्त्रे ही काय दिवाळीसाठी आहेत काय ?’ याचा अर्थ हे महाशय पाकिस्तानवर अणुबाँब टाकू इच्छितात का ? तसे असेल तर पाकिस्तानात बाँब टाकल्यानंतर पाकिस्तानला लागून असलेला भारतीय भूभाग त्यातून वाचणार आहे का ? अण्वस्त्रांची संहारकता किती व्यापक असते याची कल्पना या युगपुरुषाला नाही का? अण्वस्त्रांमुळे होणारा किरणोत्सर्ग व त्याचे दुष्परिणाम दोन-तीन पिढ्यांपर्यंत टिकतात. नागासाकी व हिरोशिमा ही जितीजागती उदाहरणे असताना अणुबाँबची धमकी देणे ही शुध्द सुमारबुध्दी आहे. थोडक्यात काय ? मते मिळविण्यासाठी जीभ सैल सोडण्याचा हा धंदा.....

## बदलती हवा ??

मुंबईचे काँग्रेसचे उमेदवार मिलिंद देवरा यांचे समर्थन व पाठिंब्यासाठी उद्योगपति मुकेश अंबानी आणि इतरही काहींच्या चित्रफिती जारी करण्यात आल्या. अजूनपर्यंत यातील कुणीही त्याचा इन्कार केलेला नसल्याने त्यांच्या खरेपणाची खात्री बाळगायला हरकत नाही. परंतु निवडणुकीच्या ज्ञात इतिहासात प्रथमच एखाद्या शीर्ष उद्योगपतींने एखाद्या उमेदवाराला जाहीरपणे पाठिंबा देण्याचा हा बहुधा पहिलाच प्रकार असावा. आता त्याचे विविध अर्थ लावण्यास सुरुवात झाली आहे.

मिलिंद देवरा हे काँग्रेसचे. त्यातही काँग्रेस अध्यक्ष राहूल गांधी यांचे अगदी ‘खास’! राहूल गांधी यांनी मुकेश अंबानी यांचे धाकटे बंधू अनिल अंबानी यांच्या विरोधात घेतलेली जाहीर भूमिका आणि अनिल अंबानी यांनी त्यांच्याविरुध्द कोर्टात जाण्यापर्यंत गाठलेली मजल !

मुकेश आणि अनिल अंबानी हे भाऊ असले तरी आता ते विभक्त झाले आहेत. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत देशात प्रथम क्रमांकावर आणि जगातही अव्वल क्रमांकात समाविष्ट अशा मुकेश अंबानी यांनी मिलिंद देवरा यांना जाहीर पाठिंबा देण्याची बाब चर्चित झाली आहे. मुकेश अंबानी यांनी पश्चिम



बंगालमध्ये जाऊन ममता बॅनर्जी यांनी आयोजित केलेल्या उद्योगपतींच्या परिषदेत नुसती हजेरीच लावली नाही तर एक तास भाषण करुन ममतादीदींची स्तुति केली व पश्चिम बंगालला सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासनही दिले होते.

मुकेश अंबानी यांच्या या 'ॲक्शन' डोळेझाक करण्यासारख्या नाहीत. त्यामागे काही हेतु निश्चितच आहेत! विशेषतः त्यांच्यापासून विभक्त झालेल्या धाकटे बंधु अनिल अंबानी यांना वर्तमान राजवटीकडून ज्या पध्दतीने साह्य केले जात आहे त्या पार्श्वभूमीवर मुकेशभाईंकडून विरोधी पक्षाच्या नेत्यांना अनुकूलता दाखविणे हे काहीसे सूचक मानावे लागेल! ही झाली उद्योगजगताची गोष्ट!

राजधानीतल्या गप्पिष्ट वर्तुळाचा कानोसा घेता आणखीही काही चविष्ट गोष्टी कानावर येत आहेत. नोकरशाहीतही वर्तमान राजवटीविरुध्दचा रोष व



असंतोष वाढताना दिसतोय! अलीकडेच ओडीशामध्ये एका प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्याने पंतप्रधानांच्या हेलिकॉप्टरची तपासणी केली म्हणून त्याला तडकाफडकी निलंबित करण्यात आले. याची कडवट प्रतिक्रिया नोकरशाहीत व प्रशासनात उमटलेली आहे. मग काय नोकरशाही देखील या सरकारवर नाराज झाली आहे काय?

होय, असे अनुमान कुणी काढल्यास ते वावगे ठरणार नाही. सर्वोच्च






न्यायालयाने निवडणूक आयोगाला अधिकारांबाबत समज देणे व त्यानंतर आयोगाने 'नमो बायोपिक', 'नमो टीव्ही'वर बंदी घालणे, आदित्यनाथ आणि अन्य बेताल वक्त्यांना लगाम लावण्याची कृति यामुळे सरकार व सरकारचे सूत्रधार अस्वस्थ झालेले आहेत. ही सर्व बदलत्या हवेची तर लक्षणे नाहीत ??



## कुणी नाही ? मग मी आहेच !




'गुडघ्याला बाशिंग बांधणं' ही म्हण किंवा वाक्प्रचारातून मनुष्यस्वभावातला उतावळेपणा, लोभ व हव्यास प्रतिबिंबित होतो. काही मंडळी कल्पनेत काही गोष्टी घडताना पाहतात आणि त्या वास्तव असल्याचे समजून तसं वागू लागतात. सध्या निवडणुका सुरु आहेत. सर्वसाधारणपणे दिल्लीच्या राजकीय वर्तुळात असे मानले जाते की यावेळी भाजपला पूर्ण बहुमत मिळणे शक्य नाही. किंवा गेल्यावेळेप्रमाणे केवळ भाजपला 284 जागा मिळणे शक्य नाही. बहुधा त्यामुळेच या पक्षाने राज्याराज्यात जाऊन मिळेल त्या लहानसहान पक्षांबरोबर आघाड्या केलेल्या आढळतात. म्हणजेच निवडणुकीनंतर भाजपचे नव्हे तर भाजप-आघाडीचे सरकार सत्तेत येऊ शकते. यातून गप्पिष्ट वर्तुळात आणखी एका प्रश्नाकडे लक्ष वेधण्यात आले. जर भाजपला इतर लहानसहान व प्रादेशिक पक्षांच्या आधाराने सरकार स्थापन करावे लागल्यास सध्याचे पंतप्रधान कायम राहतील काय ?



बरीच मंडळी या प्रश्नाला 'कायम राहणार नाहीत' असे उत्तर देतात. मग त्या परिस्थितीत पंतप्रधान कोण होणार या प्रश्नाच्या उत्तरात सर्वसाधारणपणे राजनाथसिंग, नितिन गडकरी वगैरेंची नावे पुढी केली जातात. परंतु ताज्या चर्चेनुसार या पदासाठी देशाचे उपराष्ट्रपति देखील

अनुकूल असल्याचे समजले आहे. मोदींच्या ऐवजी सर्वसंमत नेता कोण ? या प्रश्नावर वेंकय्या नायडू यांच्या नावाची चर्चा काही वर्तुळात सुरु आहे. त्रि श ं कू राजकीय परिस्थितीत सर्वसंमत नेत्याची शक्यता पडताळून पाहण्याचा हा राजकीय खेळ नवा नाही. एकेकाळी उपराष्ट्रपति असलेल्या (सध्या हे नेते हयात नाहीत) आर.वेंकटरमण, शंकर दयाळ शर्मा किंवा के.आर.नारायणन यांच्याबद्दलही



अशा चर्चा झालेल्या होत्या. यापैकी वेंकटरमण हे विशेष इच्छुक होते व त्यांनी तसे प्रयत्नही केले होते.



शर्मा व नारायणन यांची नावे काही पक्षांनी पुरस्कृत केली होती. तेव्हा आताही 23 मे नंतर जर त्रिशंकू राजकीय परिस्थिती निर्माण झाल्यास उपराष्ट्रपतींचा नंबर लागेल काय ? याची गप्पिष्ट वर्तुळात आणखी एका शक्यतेची भर पडली.



काहींच्या म्हणण्यानुसार अशी परिस्थिती उत्पन्न झाल्यास माजी राष्ट्रपति प्रणव मुखर्जी यांचे नाव पुढे येऊ शकते. आता एकदा राष्ट्रपतिपद भूषविल्यानंतर कुणी पंतप्रधान होऊ शकतो काय? असे पूर्वी कधी घडलेले नाही. राज्यघटनेने तशी बंदी केलेली नाही पण संकेत व शिष्टाचारानुसार असे घडणे अशक्य! पण चविष्ट चर्चा करायला कुणाला आवडत नाही ? ज्यांची नावे चर्चेत येतात तेही सुखावतात!

# भारतरत्न पुरस्कार वितरण कधी ?

जाता जाता !

यावर्षी तीन ज्येष्ठ भारतीयांना भारतरत्न पुरस्कार जाहीर झाले. भुपेंद्र हजारिका, नानाजी देशमुख आणि प्रणव मुखर्जी ! प्रणव मुखर्जी यांना भरतरत्न पुरस्कार देण्याचे जाहीर झाल्यानंतर अनेकांच्या भृकुटी ताणल्या गेल्या होत्या. परंतु ज्या पद्म पुरस्कारांबरोबर भारतरत्न पुरस्काराची घोषणा होते ते पद्म पुरस्कार प्रदान करण्याचा समारंभ केव्हाच पार पडला.

भारतरत्न पुरस्कार कधी प्रदान होणार हे अद्याप गुलदस्तातच आहे. या तीन ज्येष्ठांपैकी हजारिका व देशमुख हे हयात नाहीत त्यामुळे त्यांच्या कुटुंबियांनाच त्यांचा पुरस्कार स्वीकारावा लागणार आहे. कानोकानी आलेल्या माहितीनुसार मुखर्जी यांनी पुरस्कार स्वीकृतीसाठी उपलब्धता दर्शविलेली नाही. असे समजते की प्रणवदा लोकसभा निवडणुकीच्या निकालाच्या प्रतीक्षेत आहेत. निवडणुकीनंतर येणाऱ्या सरकारच्या काळातच पुरस्कार स्वीकारण्यासाठी त्यांनी पसंती दर्शविल्याचे समजते.. प्रणवदांना कुणाचे सरकार अपेक्षित आहे ? हा नुसता प्रश्न नव्हे तर लाखमोलाचा आणि यक्षप्रश्न आहे ! या प्रश्नात अनेक उत्तरे दडली आहेत. तर मंडळी चला नव्या सरकारची वाट पहा!!



# निसर्गाचा श्रीमंत प्रवास

डॉ. सुधीर भोंगळे





**कमल मोरारका यांनी काढलेली विविध प्राणी व पक्षी यांची छायाचित्रे बघणे हा एक वेगळ्या आनंदाचा अनुभव आहे. तो त्यांनी त्यांच्या जहांगिर आर्ट गॅलरीत भरविलेल्या छायाचित्र प्रदर्शनातून लोकांना दिला आहे. ही छायाचित्रे पाहिल्यानंतर मनात जो भावकल्लोळ उमटला तो येथे शब्दबद्ध केला आहे. त्याच बरोबर मोरारका यांनी भेट दिलेल्या अभयारण्यांचीही माहिती येथे थोडक्यात नमूद केली आहे.**









निसर्गामध्ये प्राण्यांचा आणि पक्षांचा मुक्त संचार असतो. त्यातून ते व्यक्त होतात. निसर्गाशी संवाद करतात. निसर्ग हेच त्यांचे घर असते आणि सृष्टी हीच त्यांची शाळा असते. ते आहेत म्हणून सृष्टी आहे. त्यांचा अधिवास सृष्टीला आवडतो. त्याहीपेक्षा त्यांच्या सहवासाने सृष्टी बहरते. खरेतर ते सृष्टीचे रक्षणकर्ते आहेत. सृष्टीवर आक्रमण केलेले त्यांना चालत नाही. तसे झाले तर ते सरळ माणसांच्या घरात घुसून चाल करतात. त्यांच्या क्षेत्रात घरे बांधलेली त्यांना चालत नाहीत. अशा प्राण्यांना कॅमेऱ्यात टिपणे ही खरोखर कसरत असते. माणसांसारखे काही त्यांना सांगता येत नाही. ते त्यांच्या पद्धतीप्रमाणे बसतात, उठतात, विहरतात. त्यांना जसे वागावे असे वाटते तसे ते वागतात. या सगळ्यातून त्यांच्या नैसर्गिक संवेदना टिपणे हे अतिशय कठीण काम आहे. त्यासाठी खूप वेगळी सहनशीलता लागते. जंगलात फिरावे लागते. किती वेळ थांबावे लागेल आणि कशी वाट पाहावी लागेल ते ही सांगता येत नाही. माणसे जंगलात जातात पण सगळ्यांना काही वाघ दिसत नाही. ज्यांना दिसतो त्यांचे नशिब म्हणायचे.

कमल मोरारकांच्या बाबतीत जरा वेगळेच सांगता






येईल. त्यांनी अतिशय चिकाटीने त्या त्या प्राण्यांच्या वाटा शोधून त्या वाटेने प्रवास केला आणि त्या वाटांवर त्यांना प्राणी भेटले त्यांची त्यांनी छायाचित्रे काढली. त्यांनी भारतातल्या जंगलांचा, आफ्रिका, केनिया येथल्या जंगलांचा प्रवास केला. राजस्थानातील भरतपूरच्या जंगलात जाऊन त्यांनी पक्षांचेही फोटो काढले. पक्ष्यांची घरटी पाहून त्यांचे पक्षांशी एक नाते जुळले आणि त्यातून त्यांची फोटोग्राफी सुरु झाली. पक्ष्यांची घरे अत्यंत कलात्मक असतात. पक्षी कोणते माप घेतात ते कळत नाही. पण त्यांच्या घरट्यांची बांधणी इतकी सुबक व एकसारखी





# राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये

राष्ट्रीय उद्याने (नॅशनल पार्क्स) तसेच अभयारण्ये (सँच्युअरीज) ही देशाची राष्ट्रीय संपत्ती, नैसर्गिक वारसा तसेच पशुपक्षी, वनस्पतींच्या वैविध्याचा राष्ट्रीय अभिमान म्हणून जतन केली, मिरवली जातात. एखाद्या देशाचे पुढारलेपण हे त्यामध्ये असलेल्या विविध जंगलांच्या वा त्यामध्ये वास्तव्य करत असलेल्या वन्यजीवांच्या वैविध्य व विपुलतेवरुन ठरवले जाते. आंतरराष्ट्रीय व्याख्येनुसार 'राष्ट्रीय उद्यान' हा त्या त्या सार्वभौम राष्ट्राने जाहीर केलेल्या व त्याच्या ताब्यातील जमीन (वा पाण्याच्या संचयाचा) भाग की त्याचे जतन व संवर्धन राष्ट्रीय संपत्ती म्हणून केले जाते. देशाच्या व जगाच्या आगामी पिढ्यांसाठी चिरंतन वारसा म्हणून त्याची निर्मिती केली जाते. या वारशांमध्ये जमिनीचा विविक्षित भौगोलिक वा भूगर्भीय वैशिष्ट्यपूर्ण भूभाग, वनस्पती, पशुपक्षीप्राणी व मासे इ. जीव व इतर तत्सम व दुर्मिळ नैसर्गिक वैशिष्ट्यांचा समावेश होतो.


असते की कवयित्री बहिणाबाई चौधरींनी म्हटल्याप्रमाणे –

**खोप्यामंधी खोपा सुगरणीचा चांगला**
**पिलांसाठी तिने जीव झाडाले टांगला**

सुगरणीचा खोपा काय, चिमणीचे घरटे काय किंवा वेगवेगळ्या पक्ष्यांचे निवास काय ज्याची त्याला गोडी लागते, त्यालाच कळते. हे सगळे मोरारकांनी व्यवस्थित पाहिले. व्याघ्र क्षेत्राच्या बाबतीत सारिस्का, बांधवगड, कान्हा, पेंच, ताडोबा किंवा केनियामधला मसाईमारा रिजन किंवा द. आफ्रिकेतला क्रुगर नॅशनल पार्क या सगळ्या भागातून त्यांनी केलेला संचार त्यांच्या छायाचित्रात उमटतो.

आपल्या निसर्गभ्रमण छायाचित्रांची जी पुस्तिका कमल मोरारका यांनी प्रदर्शनाच्या निमित्ताने प्रसिद्ध केली आहे. त्याच्या प्रस्तावनतेच त्यांनी लिहिले आहे की, ''एखादा फोटो तुम्ही घेत नाही, तर तो फोटो तुम्हाला तिथं घेऊन जातो.

तुम्ही एखाद्या घनदाट जंगलाच्या मध्यावर असता, तुमच्या आजूबाजूला निरव शांतता पसरलेली असते, आणि जेव्हा तुम्हीकॅमेऱ्यातून सरळ तुमच्यासमोर 15 फूटांवर चिखलात



## सर्वात पुरातन राष्ट्रीय उद्यान

**अमेरिकेतील (युनायटेड स्टेटस्) सलोस्टोन नॅशनल पार्क हे अभयारण्य जरी कोणत्याही कायद्याखाली स्थापन झाले नसले तरी ते जगातील सर्वात पहिले व जुने राष्ट्रीय उद्यान मानले जाते. ते अमेरिकेच्या वासोमिंग राज्यात असून 1878 साली त्याची स्थापना झाली. सलोस्टोनमधील ग्रिझली बेअर्स ही अवाढव्य अस्वले प्रसिद्ध असून त्याबरोबरच गवे, हरणे, कोल्हे व इतर अनेक प्राणी व पक्षी तिथे वास्तव्यास आहेत. दरवर्षी जगातून लक्षावधी पर्यटक ठराविक मिनिटानंतर नियमितपणे शेकडो वर्षे उडत असलेले गरम पाण्याचे कारंजे जगभरच्या पर्यटकांचे आकर्षण ठरले आहे.**

उभ्या असलेल्या वाघाच्या तेजस्वी ज्वालांसारख्या डोळ्यांत पाहता, तेव्हा तुम्हाला हेन्री कार्टियर ब्रेसनच्या



या शब्दांचा खरा अर्थबोध होतो.

मी भारतभर उत्तरेपासून दक्षिणपर्यंत आणि पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत फिरलोय आणि अनेकदा असे जादुई क्षण मला अक्षरश: खेचून अशा असंख्य प्रसंगांपर्यंत घेऊन गेलेत. हे क्षण कसे जपून ठेऊ आणि अशा या मौल्यवान क्षणी माझ्यासोबत नसलेल्यांपर्यंत ते कसे पोहोचवू याचं मला कायमच कोडं पडलेलं आहे. शेवटी, तुम्ही तुमचे संस्मरणीय क्षण तुम्ही इतरांसोबत वाटून घेऊ शकत नाही.

पण एकदा राजस्थानातील भरतपूरमध्ये असलेल्या केवलादेव पक्षी अभयारण्यात भ्रमंती करताना दूर सायबेरियातून आलेल्या पाहुण्या सायबेरियन क्रेन पक्षांच्या नियती नियोजित आणि निसर्ग क्रीडेचासाक्षीदार होण्याची एक अविश्वसनीय संधी मला मिळाली.ते क्रेन आणि त्यांची घरटी पाहण्याच्या आनंदाने माझं मन भारावलं. माझी फोटोग्राफीची पॅशन तिथंच जन्माला आली.

भरतपूर मग लवकरच नागरहोल, काबिनी, रंगथिट्टु आणि सारिस्का, बांधवगड, कान्हा आणि पेंच यासारख्या व्याघ्र प्रकल्पांतून फोटोग्राफीसाठी भटकंती केली. त्यानंतर माझ्या कॅमेरासह माझी फोटोयात्रा दाखल झाली ती वाइल्डलाइफ फोटोग्राफरचं स्वप्न असलेल्या केनियातील मसाई मारा परिसरात आणि दक्षिण आफ्रिकेतल्या क्रुगेर नॅशनल पार्कमध्ये.

माझ्या या भ्रमंतीतील काही मौल्यवान क्षणांची कहाणी तुमच्यासमोर उलगडणारे काही फोटो या फोटोबुकमध्ये आहेत...''

वाघाला बघणे हा रोमांचकारी अनुभव आहे. जंगलचा राजा जरी सिंह असला तरी जंगलाची श्रीमंती वाघ हा आहे. त्याच्यावर जंगलाचा डौल आहे. वाघाचे चालणे, त्यांचे बसणे आणि विशेषतः त्यांची नजर हे बघणे थरारक असते. त्याच्या दृष्टीतील भेदकता आणि त्याची अचूकता याचा एक वेगळा



# संरक्षित प्रदेश अडीच शतकांची परंपरा

**आजची अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने किंवा संरक्षित/राखीव प्रदेश नैसर्गिकरित्या तयार होण्यासाठी हजारो, लाखो वर्षे लागली असली तरी त्यांना कायद्याचे संरक्षण व जनता तसेच सरकारचे पाठबळ मिळून ती तशी जाहीर होणे ही मात्र गेल्या जेमतेम अडीच शतकांची घडामोड आहे. 'टोबॅगो मेन रिज रिझर्व्ह' हा 1776 साली निर्माण करण्यात आलेला जगातील सर्वात पहिला संरक्षित प्रदेश आहे. मध्य–उत्तर आशिया खंडातील मंगोलिया या देशात असलेल्या बोग्दखान ऊलंडोंगरी प्रदेश 1778 मध्ये 'संरक्षित क्षेत्र' म्हणून जाहीर करण्यात आला.**

बाजच आहे. कुठे बसावे व कसे बसावे हे जसे त्याला कळते तसे कुठून सुरु करावे आणि कुठे थांबावे हे ही त्याला चांगले कळते. त्याच्या चालीतला रुबाब आणि त्याच्या प्रत्येक पावलातला आत्मविश्वास नव्या वर्तमानाचा उजेड असतो. त्याची निर्भयता लाघवी असते. तो कधीही उर्मटपणा करीत नाही आणि पोटाच्या वर खात नाही. पोटासाठी साठवूनही ठेवत नाही. स्वतः भक्ष शोधायचे आणि खायचे हा त्याचा 'टायगर बाणा' आहे. मेलेल्या शिकारीलाही हात लावत नाही. त्याचे पाणवठेही ठरलेले. सृष्टीत वाघाचे अस्तित्व पुरातन आहे म्हणून तो देवीचा वाहक आहे. भगवती रेणुकेचे वाहन वाघ आहे. देवीच्या सप्तराती पोथीतही त्याचे वर्णन आहे. देवीने जेव्हा शुंभ निशुंभ या असुरांशी जेव्हा युद्ध खेळायला सुरुवात केली तेव्हा वाघांनी तिला मदत केली. वाघांनीही त्यांच्या सैन्यावर झडपा घातल्या. उंच डोंगरावर असलेल्या मंदिरात नेहमी वाघाचा संचार असतो. वाघ बसतो, थांबतो आणि जातो. कान्हा जंगलातले वाघ तर जगप्रसिद्धच आहेत. कान्हा राष्ट्रीय अभयारण्य हे मध्य प्रदेशातील मंडला आणि बालाघाट या दोन जिल्ह्यांतील 940KM स्केअर क्षेत्रात पसरलेले आहे. कान्हा व्याघ्र प्रकल्पात रॉयल बेंगॉल टायगर, भारतीय बिबट्या, अस्वलं, बारासिंगा आणि भारतीय जंगली कुत्री प्रामुख्याने पहायला मिळतात. बांधवगडच्या नॅशनल पार्कमधला वाघ जाडाच्या मोठ्या ओंडक्यावर तब्येतीत बसलेला आहे.

**बांधवगड राष्ट्रीय अभयारण्य**





मध्य प्रदेशातल्या उमरिया जिल्ह्यातील विंध्य पर्वतरांगांमध्ये 105 $KM^2$ क्षेत्रात  बांधवगड हे राष्ट्रीय अभयारण्य आहे. भारतातील सर्वाधिक वाघ या अभयारण्यात आहेत त्यामुळे भारतीय पिवळ्या पट्टेरी वाघांसाठी हे अभयारण्य प्रसिद्ध आहे. पांढरा वाघही या अभयारण्यात आहे. वार्षिक पर्जन्यमान 1200 मिलिमीटरअसल्याने घनदाट जंगलांतीलबिबटे आणि हरणांच्या विविध प्रजाती, अस्वलं, नीलगाय, चितळ, चिंकारा, कोल्हे, लांडगा हे प्राणीही अभयारण्यात पहायला मिळतात. विविध पक्षांचाही मोठा अधिवास इथे आहे.

गवतात खेळणारा चित्ता साऊथ आफ्रिकेतला आहे. नॅशनल पार्क कान्हामध्ये 4 वाघ एकाच ठिकाणी मुरारकांना भेटले. ते एकमेकांकडे बघताहेत. उत्सुकतेने भेटताहेत. त्यातला एक वाघ हळूच खाली वाकून पाणी पितोय. दोन वाघ एकमेकांशी गप्पा मारताहेत तर एक वाघ त्यांच्या संरक्षणाचे काम करतो आहे. संरक्षकाची नजर भिरभिरते आहे.

भरतपूरच्या नॅशनल पार्कमधले पक्ष्यांचा मेळा मजेशीर आहे. ते मधेच उडताहेत. मधेच थांबताहेत. त्यातला ब्लॅक नेकेड स्टॉर्क किंवा लार्ज कोरमोरंट डौलदारपणे उभे आहेत. ब्लॅक नेकेड स्टॉर्क गवतातल्या किड्यांवर नजर ठेवून आहे. कोरमोरंट झेप घेण्याच्या तयारीत आहे. ग्रेलाग गीझ तब्येतीत विहार करताहेत. गवतातल्या कीड्यांना टिपताहेत. त्यांच्या मानेचा डौल विलक्षण आहे. नजर चौकस आहे. पाईड किंगफिशर भक्ष्य सुटले म्हणून फांदीवर जाऊन बसलाच. पुन्हा ते भक्ष्य आपल्याला मिळेल की काय असे त्याला वाटते आहे. ग्रे हेरॉन याची मान उंच झाली आहे. त्याला काही तरी वेगळेच सापडते आहे. जंगलातल्या उगवलेल्या वनस्पतीतून तो काही शोधतो आहे. पक्ष्यांचा राजा म्हणजे गरूड. गरूडाची झेप आकाशाला गवसणी घालणारी. हा फिशिंग ईगल लाकडाच्या ओंडक्यावर उभा आहे. आपल्या तीक्ष्ण नजरेने तो सावज बघतो आहे की चांगली शिकार मिळेल याचा शोध घेतोय. त्याच्या डोळ्यात सारी सृष्टी सामावली आहे. कुणावर तो झेप घेईल ते सांगता येत नाही. त्यांचे पंख लांबलचक, नखे अतिशय तीक्ष्ण, चोचही टोकदार. एकूण त्याचा डौलच विलक्षण.

**केवलादेव राष्ट्रीय उद्यान**







## आफ्रिका : समृद्ध वन्यजीवन

विस्ताराने आशियानंतर जगात दुसरा क्रमांक असलेल्या आफ्रिका खंडातील वन्यजीवन हे कदाचित जगातील सर्वात संपन्न, दाट व वैविध्यपूर्ण वन्यजीवन असेल. जवळजवळ साऱ्या आफ्रिका खंडामध्ये प्राणी, पक्षी, वनस्पती, जलचर यांच्या शेकडो प्रजाती आजही वावरत असून त्यामध्ये हत्ती, गेंडा, सिंह, अत्यंत दुर्मिळ असा चित्ता तसेच झेब्रा, जिराफ, अस्वले, हरणे, मगरी, शहामृग इत्यादींची रेलचेल आहे. सहा टनांवर वजन, 19 ते 24 फुटांची उंची एखाद्या भरीव बाकदार तलवारीप्रमाणे असलेले भव्य बाकदार सुळे अशी वैशिष्ट्ये असणारा आफ्रिकन हत्ती हे जमिनीवरचे सर्वात वजनदार जनावर आणि सस्तन प्राणी आहे तर उंचीत त्याच्याशी स्पर्धा करणारा तसाच शाकाहारी जिराफही वजनाने टनभर सहज भरतो. दोन शिंगांचा गेंडा आता त्याच्या शिकारीमुळे नष्ट होण्याच्या धोक्यात आहे तर दोन-अडीच टन वजनाचा पाणघोडाही कमी होत चालला आहे. वनराज सिंहांची संख्या वीस हजारांपर्यंत आहे तर भारतात शिकारीमुळे नष्ट झालेला सर्वाधिक वेगाचा जमिनीवरील प्राणी चित्ता हा सुद्धा साडेसहा हजारांच्या आतबाहेरच उरला आहे. केनिया, द.आफ्रिका, युगांडा, प. आफ्रिका हे वन्यजीवसंपन्न भाग असून तिथे लाखो पर्यटक अभ्यासक, विद्यार्थी, संशोधकांची वर्दळ असते. आफ्रिकेतील वन्यजीवांच्या संवर्धनासाठी नैरोबी येथे 1961 मध्ये 'आफ्रिकन वाइल्ड लाईफ फाऊंडेशन' या संस्थेची स्थापना करण्यात आली. तिला जगभरातून निधी मिळत असून वार्षिक अंदाजपत्रक सुमारे दोनशे कोटी रुपयांचे आहे.



केवलादेव घना राष्ट्रीय उद्यान किंवा भरतपूर पक्षी अभयारण्य हे राजस्थानातील जयपूरजवळ आहे. युनेस्कोने जागतिक वारसास्थळात समावेश केलेले हे पक्षी अभयारण्य 28.7 $KM^2$ क्षेत्रात पसरलेलं असून, इथे पक्ष्यांच्या 230 प्रजातींचा अधिवास आहे. त्याचबरोबर शेकडो प्रवासी पक्षी हिवाळ्यात या अभयारण्यात प्रजननासाठी येतात. दुर्मिळ सायबेरियन क्रेन, ग्रे पेलिकन, ब्लॅक नेक्ड स्टॉर्क, लार्ज कॉर्मोरंट, ग्रेलॅग गीझ, पीड किंगफिशर, ग्रे हेरॉन, फिशिंग ईगल अशा अनेक पक्षांचे दर्शन या पक्षी अभयारण्यात घडते.

एका चित्रात हत्तींचा तांडा आहे. हत्तींचा तांडा तसा शांत चालतो. तसा हत्ती समंजस प्राणी. पण जर का बिथरला मग तो कुणालाही पाहात नाही आणि आवरतही नाही. त्याच्या सोंडेने तो काय करेल हे सांगता येत नाही. एका चित्रात सांबर आहे. अतिशय डौलात उभा आहे. त्याचे कान तीक्ष्ण आहेत. काही तरी त्याला ऐकू येतंय आणि तो कुणाच्या तरी शोधात आहे.

आपल्या जंगलातील भटकंतीचा अनुभव कथन करताना श्री. मोरारका यांनी स्वतःच असे लिहिले आहे की, माझ्या सगळ्या जंगली भटकंतीतून मी अनेक गोष्टी त्यापैकी काही महत्त्वाचे धडे म्हणजे अनपेक्षित, अनियोजित आणि कधीकधी तर अविश्वसनीय घटनांचा अनुभव.जेव्हा तुम्ही निबिड अरण्यात असता आणि मानवी वस्ती तुमच्यापासून कोसो दूर असते तेव्हा

















## महत्त्वाची अभयारण्ये

जिम कॉर्बेट नॅशनल पार्क : 1936 साली निर्माण झालेले हे देशातील सर्वात जुने अभयारण्य उत्तरखंडामध्ये असून सुमारे दीड हजार चौरस किमी आहे. वाघ, हत्ती, हरणांसकट सुमारे 50 प्रकारचे सस्तन प्राणी, सहाशे प्रकारचे पक्षी असलेल्या या अभ्यारण्यात दर हंगामात सुमारे पाऊण लाख पर्यटक भेट देतात.

कान्या : आसाम–प्रसिद्ध भारतीय एकशिंगी गेंड्याचे निवासस्थान. पण शिंग व कातडीकरताच त्याची तस्करी केली जाते. त्याच्या शिकारीवर बंदी आहे.

बांधवगड : मध्य प्रदेश – वाघ, दुर्मिळ पांढरा वाघ, हरणे, बिबटे, कोल्हे, रानकुत्री आदींबरोबरच साडेतेराशे प्रकारचे स्थानिक, दुर्मिळ वनस्पती.

रणथंबोर : राजस्थान– वाघ, बिबट्या, अस्वल, माकडांबरोबर मगरी–सुसरीही सापडतात.

गीर : गुजरातमधील हे राष्ट्रीय उद्यान आशियाही सिंहाचे एकमेव निवासस्थान आहे.

बंदीपूर : कर्नाटक–मोठी खार, गिधाडे, लंगूर, विविध पक्षी यांबरोबर हत्ती, गवे, वाघ इ.

हेमिल : जम्मू आणि काश्मिर राज्याच्या लडाख भागामध्ये वसलेले 4400 चौ. कि.मी. हे देशातील सर्वात मोठे अभयारण्य असून इथे हिमबिबट्या, तपकिरी अस्वले यांबरोबरच अत्यंत दुर्मिळ असे हिमालयातील 73 प्रकारचे पक्षी मिळतात.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान : महानगरी मुंबईत 87 चौ. कि.मी. मध्ये वसलेले हे राष्ट्रीय उद्यान पोटात 2400 वर्षांपूर्वीची कान्हेरी लेणी घेऊन उभे आहे. वाघ, बिबटे, माकडे, ससे आदी उपस्थित असणाऱ्या या उद्यानात वर्षाला 25 लाखजण भेट देतात.

ताडोबा : जवळजवळ 195 प्रकारच्या पक्ष्यांसह वाघ, गौर, रानकुत्री, सुसरी असलेले हे महाराष्ट्रातील व्याघ्र अभयारण्य.

पेंच : महाराष्ट्र व मध्य प्रदेशमध्ये विभागलेले. वाघ, नीलगाय, रानडुकरे, साळू, अस्वल, भेकरे इ.

## वन्यजीवन आणि भारत


**भारतामध्ये एकूण 104 राष्ट्रीय उद्याने (जुलै 2018) असून त्यांचे एकूण क्षेत्र 40501 चौरस कि.मी. इतके आहे. देशाच्या एकूण पृष्ठभागाच्या जेमतेम सव्वा टक्का एवढाच भाग त्याने व्यापला असून हे प्रमाण जगातील इतर देशांच्या मानाने फारच कमी आहे. तरीही भारतातील पशुपक्षी व वनस्पतींचे वैविध्य हे अक्षरशः आश्चर्यजनक आहे. गीरच्या विश्वविख्यात सिंहापासून ते रॉयल बेंगाल पट्टेरी (ढाण्या) वाघ, बिबट्या, हत्ती, गेंडे, गवे, हरणे, मगरी, सुसरी, रानकुत्री व असंख्य पक्षीजातींसह हिमबिबट्या, हिमअस्वल अशांची दुर्मिळ उपस्थिती भारतात दिसून येते. भारतीय संदर्भामध्ये 'राष्ट्रीय उद्याने' म्हणजेच नॅशनल पार्क्स हे केंद्र सरकारने केलेल्या कायद्याने निर्माण केले जातात व कायमस्वरुपी असतात. मात्र अभयारण्ये ही राज्य सरकारे आपापल्या राजपत्रामधून घोषित करुन निर्माण किंवा रद्द करु शकतात.**

तुमच्या जाणीवा अतिसंवेदनशील आणि अंत:प्रेरणा तीक्ष्ण होते. तुम्ही जेवढ्या जवळून जंगली प्राणी पाहता तेवढ्या जवळून तुमच्या अंतरंगाचं तुम्हाला दर्शन घडतं. हरणं, मगरींपासून ते हत्तींपर्यंत मला जंगलात दिसलेल्या प्रत्येक दृश्याचा मी आनंद लुटला.





श्री. मोरारका पुढे लिहितात, ''मी जंगली मांजरीच्या अर्थात, वाघाच्या शोधार्थ निघालोय अशी एक विजयी भावना सतत मनात होती. दरवेळी घडलेलं वाघाचं दर्शन माझ्या हृदयात कोरलं गेलंय. वाघाच्या मागावर निघायच्या आधीची तयारी, लपून-छपून दबक्या चालीनं चालणं, त्याची वाट बघणं, त्याच्या येण्या-जाण्याचे अंदाज बांधणं सगळंच विलक्षण. आणि तुमच्या कॅमेऱ्याच्या फ्रेममध्ये जेव्हा वाघाची एंट्री होते तेव्हा मोठ्ठा विजय गवसल्याची मनात उचंबळून आलेली भावना! दवंडी न पिटता, अनपेक्षित पण नेहमीच एक भव्य एंट्री. त्यामुळेच वाघाचा प्रत्येक फोटो हा जणू एक सोहळाच.



**मागोवा पक्षी अधिवासाचा**

पक्षी निरीक्षणातूनच पक्ष्यांची फोटोग्राफी जन्मते. निसर्गाने दिलेल्या या पंखरूपी ठेव्याचं मला कायमच आकर्षण वाटायचं. त्यांचं वागणं, त्यांचे आकार त्यांची ठेवण; त्यांच्या वैविध्यपूर्ण आणि उठावदार रंगांनी तर मी नेहमीच मंत्रमुग्ध झालोय. राजस्थानातल्या भरतपूर पक्षी अभयारण्यात पक्षी निरीक्षण करतानाच मला वाईल्डलाइफ फोटोग्राफी हा छंद मनापासून जोपासण्याची प्रेरणा मिळाली.''

दक्षिण अफ्रिकेतील सर्वांत मोठ्या अभयारण्यांमध्ये क्रुगेर राष्ट्रीय उद्यानाचा समावेश होतो. दक्षिण आफ्रिकेतील लिम्पोपो व एम्पुमालांगा या प्रांतातील 19485 स्क्वेअर किलोमीटर परिसरात हे अभयारण्य विस्तारलेले आहे. जंगलाचा राजा सिंह, चित्ते, बिबटे, हत्ती, दोन शिंगांचे गेंडे यासारखे वन्यप्राणी या घनदाट जंगलांत दिसून येतात. एका चित्रात तो एकशिंगी आफ्रिकन-हायनो गेंडा दिसतो आहे.

**दक्षिण आफ्रिकेतील क्रुगेर राष्ट्रीय उद्यान**

दक्षिण अफ्रिकेतील सर्वांत मोठ्या अभयारण्यांमध्ये क्रुगेर राष्ट्रीय उद्यानाचा समावेश होतो. दक्षिण आफ्रिकेतील लिम्पोपो व एम्पुमालांगा या प्रांतातील 19485 स्क्वेअर किलोमीटर



परिसरात हे अभयारण्य विस्तारलेले आहे. जंगलाचा राजा सिंह, चित्ते, बिबटे, हत्ती, दोन शिंगांचे गेंडे यासारखे वन्यप्राणी या घनदाट जंगलांत दिसून येतात.

ही प्राण्यांची छायाचित्रे मुरारका यांनी कलात्मक रितीने टिपली आहेत. त्यातील जीवंतपणा लक्षणीय आहे. काही प्राण्यांचे डोळे हीच त्यांची ताकद असते, तर काहींचे सामर्थ्य त्यांच्या पायात असते. पायातल्या नखांनी ते त्यांचे संरक्षण करु शकतात. त्यांच्या चालीतून त्यांच्या व्यक्तित्वाचा रुबाब लक्षांत येतो. त्यांची सृष्टीची पार्श्वभूमी मुरारकांनी योग्य व अचूक टिपली आहे. वेगवेगळ्या हवामानात प्राणी कसे दिसतात हे जसे त्यातून कळते तसे ते कसे राहतात याचेही चित्रण त्यातून कळते. मुरारकांचे छायाचित्रण प्रभावी व नेमके आहे. प्राण्यांच्या भावना आणि त्यांच्या शरीरांचा अंदाज मुरारकांना आहे. तो त्यांनी टिपला आहे म्हणून त्यांना ती प्राण्यांची सफर वाटण्याऐवजी ती निसर्गाची सफर वाटते. कारण निसर्ग अनेक अंगांनी आपल्याला शिकवितो. त्याचे सांगणे अर्थपूर्ण असते. त्याचे निष्कर्ष अचूक असतात. त्याला जसे जाणवते तसे मुरारकांनी लक्षांत घेतले आहे आणि त्यांची तशी छायाचित्रे काढली आहेत. म्हणून त्यांनी आपल्या प्रदर्शनाला 'नेचर ट्रेल' असे म्हटले आहे. त्यांचा हा छायाचित्रणांचा प्रवास जो बघेल तो त्यांच्या बरोबर प्रवास करेल. त्यात त्याला आनंद वाटेल. हा प्रवास न संपणारा आहे. ज्या ज्या ठिकाणी विश्रांतीचे टप्पे आहेत तशा त्यांनी सूचना दिल्या आहेत. मुरारकांचा हा छायाचित्रणाचा छंद रसिकांच्या मनाला आनंद देतो. ते फोटो पुन्हा पुन्हा पाहावेसे वाटतात. त्यातून आपण आणखीन नवे होत जातो आणि वाचकांचाही आणि प्रेक्षकांचाही प्रवास पुढे सुरु राहतो. वसुंधरा किती देखणी आहे हेही कळतं आणि ती किती श्रीमंत आहे याचाही प्रत्यय येतो. जे जंगलात गेले, राहिले, ज्यांना प्राणी-पक्षी दिसले ते भाग्यवान. समजा तिकडे जाता आले नाही तर त्यांनी मुरारकांचे हे छायाचित्र प्रदर्शन पाहिले तर त्यांना जंगलात गेल्याचे समाधान मिळेल. अशा सुंदर छायाचित्रणाबद्दल मुरारकांचे हार्दिक अभिनंदन !









Nanded City, Pune
Sinhagad Road, Pune
प्रत्येक घराला एक मन असतं.
प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्त्व असतं.
आनंदी संकुल
CBSE व ICSE शाळा
जिमखाना
Call: 020-67275800 / 1 / 2
www.nandedcitypune.com
info@nandedcitypune.com
MAGARPATTA CITY

फेब्रुवारी, मार्च आणि एप्रिल 2019 मध्ये काही कामानिमित्त राज्यातील अवर्षणग्रस्त भागातून प्रवास करण्याचा योग आला. नगर, कोपरगाव, मनमाड, चाळीसगाव, जळगाव, भादली, बोदवड, मलकापूर, खामगाव, बाळापूर, अकोला, दौंड, इंदापूर, कुर्डुवाडी, कळंब, बीड, आष्टी, पाटोदा, जामखेड, मांजरसुंभा, नेकनूर, लातूर, निलंगा, उस्मानाबाद आणि शेजारच्या कर्नाटक राज्यातील बिदर जिल्ह्यातील काही खेड्यांना  न्याहाळता आले. पश्चिम बंगाल आणि उत्तराखंड या राज्यांनापण भेटी देता आल्या. महाराष्ट्राचा  हा परिसर पावसाच्या पाण्यावर आधारुन शेती करणारा आहे. खरीप हंगामात प्रामुख्याने कापूस, उडीद, मूग, सोयाबीन, तूर आणि रबीमध्ये हरभरा व ज्वारी ही पिके घेतली जातात. काही ठिकाणी कांदापण घेतला जातो.  याला अपवाद सोलापूर जिल्ह्यातील भिमा नदीवरील उजनी जलाशया भोवतीचा प्रदेश आहे, ज्याठिकाणी उसाशिवाय दुसरे पीक अभावानेच दिसते. जळगाव जिल्ह्यातील भादली हे बालकवी ठोंबरे यांचे गाव आहे. याच गावातून नागपूर, जळगाव, मुंबई या शहरांना जोडणारी रेल्वे लाईन ब्रिटीश काळापासून आस्तित्वात आहे. लहान वयात गावातील रेल्वे लाईन ओलांडताना अपघातात बालकवींचा मृत्यू झाला अशी माहिती माझ्या बरोबर प्रवास करणाऱ्या सहकाऱ्याने दिली. या लहानशा गावात या कवीचे स्मारक असल्याचे समजले.

2018 चा पावसाळा परतीच्या पावसाच्या अभावी राज्यासाठी आगळा वेगळा ठरलेला आहे.पावसाच्या तुटीमुळे रब्बीचे पीक हाती आले नाही आणि खरीपातील पिकाचे उत्पादन घटले आहे. सोयाबीनचे उत्पादन 3 ते 4 क्विंटल प्रति एकर तर आंतरपीक म्हणून घेतलेल्या तुरीचे उत्पादन 2 ते 3 क्विंटल प्रति एकराच्या पुढे गेले नाही. तीच गत कापसाची झालेली आहे. ज्याठिकाणी तुषार सिंचन पध्दतीने एखादे पाणी देता आले त्याठिकाणी मात्र उत्पादनात दुपटीचा फरक पडलेला दिसून आला आणि असे क्षेत्र पुरेशा पावसाअभावी नगण्यच होते असेच म्हणावे लागेल. बाजारामध्ये या पिकांना मिळणारा भाव हा शासनाने निश्चित केलेल्या हमी भावापेक्षा कमी आहे.

खरीपाच्या पिकाची रास झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या



# महाराष्ट्रातील अवर्षणग्रस्त भागात घडलेला प्रवास

**डॉ. दि.मा. मोरे**

हातात कसलेही काम राहात नाही. ग्रामीण भागात कृषी आधारित वा इतर कसलाही उद्योग या परिसरात दिसला नाही. चांगल्या पावसाच्या वर्षात शेतकरी रबी हंगाम संपेपर्यंत कसाबसा शेतामध्ये गुंतून असतो. विपुल पाऊस पडणाऱ्या कोकणसारख्या प्रदेशातील चित्र यापेक्षा वेगळे नाही. बहुतांशी ठिकाणी खरीपातील भात पिकानंतर जमिनी ओसाड पडल्यासारख्या वाटतात. पावसाचे पाणी साठवून ठेऊन शेती वर्षभर हिरवी ठेवता आलेली नाही. तुटीच्या वर्षात ग्रामीण भागातील परिसरात पर्यायी रोजगार उपलब्ध नसल्याने शेतकरी आणि शेतमजूर हवालदिल होतात. अशीच काहिशी परिस्थिती प्रवास करत असताना जाणवत होती. तुरळक ठिकाणी, लहानशा तुकड्यावरील ज्वारीची रास करण्यामध्ये काही शेतकरी कुटुंबे गुंतलेली दिसली.

विदर्भामध्ये काही भागातील संत्र्याची बारमाही शेती वगळता उन्हाळ्यामध्ये आजुबाजूच्या तलाव व नदीमध्ये पाणी उपलब्ध असले तरी भाजीपाला, कांदा, भुईमूग यासारखी हंगामी पिके घेण्याची शेती पध्दत अद्यापी रुजली गेली नसल्याचे दिसते. अकोला जिल्ह्याच्या परिसरात बाळापूर जवळ मोरणा नदीचे पात्र पाण्याने भरलेले दिसले. नदीकाठावरच विकसित झालेल्या पारस औष्णिक केंद्रासाठी नदीवर बंधारा बांधून पाणी अडवलेले आहे. या पाण्यावर नदीकाठी हिरवी शेती दिसणे अपेक्षित होते पण तसे कांहीही दिसले नाही. मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी मात्र जवळ दिसणाऱ्या पाण्यावर तुटून पडत असतो.

रबीचा हंगाम हातातून गेला आहे आणि पावसा अभावी खरीपातील उत्पादन कमालीचे घटलेले आहे अशीच अवस्था मराठवाड्यातील बीड, उस्मानाबाद, लातूर या परिसरातील शेतीची दिसून आली. काही खेड्यात मार्च महिन्यातच पिण्याच्या पाण्याचा तुटवडा जाणवत होता. दूर अंतरावरुन महिलांना प्लॅस्टीकच्या कळशामध्ये दिवसभर पाणी आणण्याचे काम करावे लागत असल्याचे दिसले. घरासमोर 200 ते 250 लि चे ड्रम सर्वत्र दिसले. घरासमोर  टँकरमधील पाणी साठवण्यासाठी मोठाले ड्रम असणे ही एक बदललेल्या काळातील जीवनपध्दती झालेली आहे असेच म्हणावे लागेल.





यावरुन पाण्याच्या टँकरच्या येरझाऱ्या चालू झाल्याचे अनुमान बांधता येते. मार्च महिन्याच्या अखेरीसच राज्यामध्ये खेड्या पाड्यांना पाणी पुरवठा करण्यासाठी 3 हजारापेक्षा जास्त टँकर्स फिरत असल्याची बातमी वर्तमानपत्रातून वाचण्यात आली. एप्रिल, मे महिन्यामध्ये पिण्याच्या पाण्याचा तुटवडा भयावह राहाणार आहे हेच यातून दिसून येते. एप्रिल अखेर टँकरने 5 हजाराचा आकडा ओलांडलेला असणार. यावर्षी पाण्याचा दुष्काळ असल्यामुळे ग्रामीण परिसर जास्तच भेसूर जाणवत होता. एरवी, बऱ्या पावसाच्या वर्षातपण पावसाळ्यानंतर पिकाचा हंगाम संपल्यानंतर रिकाम्या लोकांचे थवे कामाविना फिरत असलेले दिसतात.लहान आकाराची, पावसावर अवलंबून असलेली आणि पारंपारिक पध्दतीची शेती ग्रामीण भागातील लोकांना पुरेसे उत्पन्न मिळवून देत नाही म्हणून शेतीवर आधारित असलेले शेतकरी वा शेतमजुराचे कुटुंब आस्थिर होते आणि पोटाची खळगी भरण्यासाठी रिकाम्या हातांना काम शोधत हीच मंडळी पुण्यासारख्या उद्योगाने वेढलेल्या शहराकडे स्थलांतरित होत असल्याचे चित्र दिसले. दिवसेंदिवस स्थलांतरितांचा प्रश्न गहन होत चालला आहे. शहरांना स्थलांतरितांमुळे लोकसंख्येचे ओझे पेलवत नाही आणि यामुळे शहरांचा आकार अनियोजितपणे वाढत आहे आणि खेडी भकास झालेली दिसत आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून विकासाच्या, शहरीकरणाच्या नावाखाली हे घडत आहे. यात बदल करण्याच्या दृष्टीने मूलभूत प्रश्नांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न कोणत्याही राजकीय पक्षाच्या अजेंड्यावर दिसत नाही ही चिंतेची बाब आहे.

शेतीवर आधारित असलेल्या ग्रामीण भागाचे चित्र दरवर्षी कमीजास्त प्रमाणात वर वर्णन केल्या प्रमाणेच आहे. यामध्ये बदल व्हावा असे अनेकांना वाटते. हाताच्या बोटावर मोजण्याइतके मोठे जमीनधारक आणि पाण्याची उपलब्धता वाढवून, बाजारपेठांचे गणित समजावून घेऊन आधुनिक पध्दतीने कुशलतापूर्वक शेती करणाऱ्या 15-20 टक्के लोकांना वगळता सर्वसाधारणत: हेच चित्र दिसते. शेती परवडत नाही आणि शेतीतून उदरनिर्वाह होत नाही पण शेतीशिवाय दुसरा पर्याय नाही अशा त्रस्त लोकांचे भविष्य काय, हा प्रश्न संवेदनशील लोकांना सातत्याने बोचत आहे. प्रवासामध्ये माझ्याबरोबर कृषी क्षेत्रातील एक जाणकार शास्त्रज्ञ होते. त्यांचे आंतरिक विचार जाणून घेण्यासाठी मी त्यांना छेडले. या शास्त्रज्ञांनी दिलेली उत्तरे जशीच्या तशी याठिकाणी देत आहे. त्यांचे नशीबच तसे आहे, या लोकांना भेडसावत असलेल्या प्रश्नांची उत्तरे आपल्याकडे नाहीत, विनाकारण इतरांनी चिंता करुन त्यांचे प्रश्न सुटणारे नाहीत, समाजातील आर्थिक विषमता दूर होऊ शकत नाही. अशा प्रकारचे बोल मला ऐकवून हातातील स्मार्टफोनमध्ये ते पुनश्च गुंतून पडले. समाजातील पोट भरलेल्या माणसांच्या विचाराचे हे प्रतिक होते असे म्हणले तर वावगे वाटू नये. जाणकार शास्त्रज्ञसुध्दा चाकोरीच्या बाहेर जाऊन विचार करण्यास तयार नाहीत असेच म्हणावे लागेल.



देशातील आजची शेती, 80-85 टक्के शेतकऱ्यांना स्वत:च्या पायावर स्वाभीमानाने जगण्याइतपत आर्थिक आधार देऊ शकत नाही, हे वास्तव स्वीकारण्याची गरज आहे. शेतीला म्हणचेच शेतीवर अवलंबून असलेल्या लोकसंख्येला ग्रामीण भागाच्या औद्योगिकरणातून पर्यायी आणि पूरक रोजगार मिळवून देणे ही काळाची गरज आहे. 4/5 एकराची शेती ही शेतकऱ्यांचा मुख्य आर्थिक आधार ठरू शकत नाही. सिंचनाच्या, ठिबक, तुषार सारख्या आधुनिक सिंचन पध्दतीच्या वापरामुळे उत्पादनात दुपटीपेक्षा जास्त वाढ होते पण वाढीव उत्पन्नसुध्दा कुटुंबाच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी अपुरेच पडते. अशा आधुनिक साधनांची उपलब्धतापण तुरळक आहे. निसर्गातून पडणारा

पाऊस हा बेभरवशाचा आहे. तुटीच्या वर्षात शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती फारच जिकीरीची होते. अलिकडच्या 10 एक वर्षात अवर्षणाचा फटका दर एक दोन वर्षांनी जाणवत आहे.गेल्या चार पाच वर्षातील शासनाने राबविलेले जलयुक्त शिवार हे ग्रामीण भागाला दुष्काळमुक्त करणारे अभियान कुचकामी ठरले की काय अशी शंका घेण्यास वाव दिसून आला.

शेतीवरील लोकसंख्येचे ओझे कमी करण्याची गरज आहे आणि त्यासाठी उद्योग आणि सेवा क्षेत्राचे जाळे ग्रामीण भागात रुजविण्याची आवश्यकता आहे. शेती हा मूलभूत व्यवसाय मानण्याऐवजी त्याला पूरक, दुय्यम व्यवसायाचा दर्जा देण्याची गरज आहे. सामुदायिक, एकत्रित यासारख्या शेती पध्दतीचा वापर करुन कृषी क्षेत्रात क्रांतीकारक बदल घडवून आणण्याची गरज आहे. अन्यथा केवळ पाण्याची उपलब्धता वाढविण्यावर भर देऊन शेती क्षेत्रातील दारिद्र्य हटविण्याचे धोरण अंगलट येण्याची शक्यता नाकारता येत नाही आणि आज त्याचा प्रत्यय येत आहे.

बीड जिल्ह्यातील मांजरसुंभा ते नगर हा प्रवास दुष्काळाचे भयावह दर्शन घडविणारा ठरला असे म्हणावयास हरकत नाही. दर दोन, तीन गावामध्ये जनावरांच्या छावण्या उभारलेले दृष्य दिसले. लहान सहान डोंगरदऱ्याचा हा भाग उघडा बोडका झालेला होता. जी झाडे शिल्लक होती ती केवळ कडू लिंबाची होती. हा त्यातील चांगला भाग म्हणावयास हरकत नाही. गेल्या 30-40 वर्षात राबविलेल्या वृक्षलागवडीच्या कार्यक्रमाचा मागमूसही तेथे दिसत नव्हता. वृक्षारोपणाचे कार्यक्रम



टिकत नाहीत हे सत्य स्वीकारावे लागेल. निदान यापुढे तरी सार्वजनिक निधीचा अपव्यय टाळणे हिताचे राहील. हा विचार अंमलात येणे ही काळाची गरज ठरावी. हा प्रदेश हरिणाच्या कळपासाठी आणि मोराच्या मुक्त संचारासाठी प्रसिध्द आहे. या वन्य प्राण्यांचे आस्तित्व पाण्याअभावी नाहीसे झाल्याचे जाणवले. डोंगर कपारीतील सीताफळाची झुडुपे नामशेष झालेली दिसली. कधीकाळी सीताफळाच्या झाडीसाठी हा भाग प्रसिध्द असल्याची आठवण मनामध्ये डोकावते. या दुष्काळी प्रदेशात घनदाट झाडी दिसतच नाही, त्यामुळे जनावरांच्या छावण्या भर उन्हात उघड्या रानात उघडलेल्या दिसल्या. सावलीसाठी लोकांनी हिरव्या शेडनेटचा आणि तुराट्या पराट्याचा आडोसा निर्माण केल्याचे दिसले. शासनातर्फे वैरण आणि टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जातो आणि हाच आधार सभोवतालच्या परिसरातून आलेल्या जनावरांच्या मालकाला एकत्रित बांधून ठेवण्यास कारणीभूत ठरतो. राज्यामध्ये वेगवेगळ्या भागात हजारो छावण्या उघडण्यात आलेल्या आहेत आणि त्यातील जनावरांची संख्या काही लाखामध्ये गेलेली आहे. आधिकच्या छावण्या उघडण्याचा आणि पाणी पुरवठ्यासाठी टँकरच्या मागणीचा शेवट होत नाही, ही यातील विदारक स्थिती आहे.

1972 पासून राज्याला दुष्काळाची चांगली ओळख झालेली आहे आणि जवळपास 50 वर्षाच्या कालखंडानंतरसुध्दा ही सोबत तुटत नाही. दुष्काळापासून मुक्ती मिळविण्यासाठी अनेक अभियान राबविण्यात आले आहेत. नेहमीची तलाव आणि कालव्याची पारंपारिक सिंचनाची व्यवस्था व्यापक स्वरुपात दुष्काळाला थोपवू शकत नसल्यामुळे पाणलोट क्षेत्र विकासाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. पाणी अडवा पाणी जिरवा, वृक्षराजी वाढवा, मातीचे संधारण करा, माथा ते पायथा हे सूत्र धरुन पाझर तलाव, भूमीगत बंधारे, कोप बंधारे, शेतीची बांध बंदिस्ती, समतल चर इ. चे जाळे निर्माण करुन एक हंगामी पर्जन्य आधारित शेतीचे रुपांतरण किमान अंशी दुहंगामी पीक रचनेत करुन शेतकऱ्यांना आर्थिक आधार देण्याचा प्रयत्न करण्यात आला. वेगवेगळ्या योजनेतून आणि विविध स्रोतातून उपलब्ध झालेला निधी खर्ची टाकाण्यात

आला. काही ठिकाणी लोक सहभाग मिळाला आणि दुष्काळावर मात करणाऱ्या बोटावर मोजण्याइतक्या यशोगाथा पुढे आल्या. त्यातच आपण समाधानी राहिलो. प्रदेशाच्या भूगोलाचे आणि मानवी प्रवृत्तीचे सार्वत्रिकरण करता येत नाही हे नैसर्गिक सत्य समजून घेण्यात आपण खुजे पडलो का असा प्रश्न सतत भेडसावत असतो. मृद व जलसंधारणाच्या उपचारातून भूजलात वाढ झाली. दुर्दैवाने धरण, कालवे, जोडीला उपसा आणि पाणलोट क्षेत्र विकासाच्या कार्यक्रमातून उपलब्ध झालेल्या पृष्ठभागावरील आणि पृष्ठभागाखालील पाण्याचा विवेकाने वापर केला गेला असे म्हणण्याचे धाडस मात्र करता आले नाही. पाण्याची उपलब्धता आणि पीक रचना यामध्ये विसंगतीचे नाते निर्माण झाले आणि ही बाब दूर करण्याचा प्रयत्न केला गेला नाही. अलिकडच्या 4-5 वर्षाच्या काळात शासनाने जलयुक्त गाव, जलयुक्त शिवार हे अभियान, दुष्काळ



मुक्तीसाठीचा रामबाण उपाय म्हणून राबविण्याचा प्रयत्न केला. याची सुरुवात 2014 व15 च्या तीव्र अवर्षणाने केलेली होती. सुदैवाने 2016 आणि 2017 चे पावसाळे चांगले लागले आणि त्यामुळे अवर्षणाची झळ जाणवली नाही. पिण्याच्या पाण्यासाठी मात्र ग्रामीण भागात अनेक ठिकाणी टँकरपासून सुटका मिळाली नाही. टँकरची संख्या मात्र घटली आणि याचे श्रेय शासनाकरवी राबविलेल्या जलयुक्त शिवाराच्या अभियानाला देण्यात आले. निसर्गाच्या अनुकुलतेमुळे पाणी टंचाईची तीव्रता कमी झालेली होती याची नोंद घेण्याचे हेतूपुर:सरपणे टाळण्यात आले. नाल्यावर बंधारे बांधून आणि नाल्याचे खोलीकरण आणि रुंदीकरण करणे या बाबीवरच जलयुक्त शिवार अभियानाचा भर होता.यंत्राच्या मदतीने अशा प्रकारची कामे सहजगत्या करण्यात आली. सीएसआरचा निधी आणि आधुनिक यंत्राचा वापर याद्वारे या योजनेला अमाप प्रसिध्दी देण्यात आली. लांबी, रुंदी, उंची याच्या गुणाकारातून पाण्याची उपलब्धी आणि त्यावर आधारित सिंचन निर्मितीच्या आकड्याचा हिशेब मांडण्यात आला. या उपक्रमामध्ये कामाचे शास्त्र कितपत जपले गेले याची शहानिशा केली गेली नाही. हजारो गावे दुष्काळमुक्त झाल्याचा डांगोरा पिटण्यात आला. नियतीच्या दुर्दैवाने 2018 च्या पावसाळ्याने पुन्हा दुष्काळाला आमंत्रण दिले. जनावरांच्या छावण्या आणि पाण्याचे टँकर यांच्या संख्येवरुन पाणी टंचाईचा अंदाज बांधणे शक्य होणार आहे. गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार अशा घोषणांचापण डंका पिटण्यात आला. हाती यश किती लागले याचा हिशेब मांडण्यासाठी कोणीही पुढे सरसावणार नाही. जलसंधारणाच्या मोठ्या कामात शिरलेला अप्रामाणिकपणा आणि लहान कामातील अशास्त्रीय उधळपट्टी, या बाबी या क्षेत्रात येऊ घातलेल्या विदारक परिस्थितीची झलक दाखवत आहेत. विकासाच्या पाऊलखुणा अद्यापी दूर अंतरावर आहेत असेच वाटून जाते.

नैसर्गिक प्रतिकूलता लाभलेल्या आणि काळाच्या ओघात वारसा हक्काने मिळालेल्या जमीन धारणेत झालेल्या कमालीच्या घटीमुळे शेती हे जगण्याचे मुख्य साधन होऊ शकत नाही आणि दारिद्र्य कासोटा सोडत नाही ही वस्तुस्थिती स्वीकारुन परिस्थितीवर मात करण्याची गरज आहे. शेती हे जगण्यासाठीचे दुय्यम साधन झालेले आहे. यास्तव विकासाच्या इतर क्षेत्राचा, पर्यायाचा आधार हा प्रमुख घटक मानून नियोजनाला वेगळी दिशा देण्याची गरज आहे. कोसळणाऱ्या इमारतीला टेकू देत त्यातच मुक्काम करत समृध्दीचे स्वप्न पाहाणे ही कवी कल्पना ठरणार आहे.

योगायोगाने गेल्या अनेक वर्षाच्या अनुभवाने राज्याला दुष्काळाला सामोरे जाण्यात अडचण जाणवत नाही आणि नाविन्य वाटत नाही. दुष्काळ अंगवळणी पडलेला आहे आणि संवेदना बोथट झालेल्या आहेत असेच म्हणावेसे वाटते. वैरणीसाठी छावण्या, पिण्याच्या पाण्यासाठी टँकर, हाताला काम देण्यासाठी रोजगार हमी योजना, विद्यार्थ्यांची फी माफी, शेतकऱ्यांच्या कर्ज वसुलीला स्थगिती इ उपाय काळाच्या ओघात शासनासाठी नेहमीचेच झालेले आहेत असेच काहीसे चित्र दिसते. निसर्गाने अवकृपा केलेल्या वर्षातपण, कुशल नियोजनाच्या माध्यमातून दुष्काळाच्या झळा म्हणजे वरील प्रमुख बाबी निर्माण होणार नाहीत असा मूलभूत विचार केला जात नाही. प्रसंगी रोजगार हमीच्या हजेरीपटावरील मजुरांची संख्या वाढविण्यात आणि छावण्या व टँकरच्या संख्येत भर

घालण्यात प्रशासन आनंद मानते ही एकच बाब दुष्काळावर मात करण्याच्या प्रयत्नातील ऱ्हस्व दृष्टी दाखवत आहे. चाकोरीच्या बाहेर पडून विचार करण्याची गरज आहे.

या प्रवासामध्ये काही घटना सहज डोळ्याखालून गेल्या. बाळापूर परिसरातील पारस औष्णिक वीज केंद्राजवळ एक मजली हजारापेक्षा जास्त घरकुले भग्न अवस्थेत विनावापर पडून असलेली दिसली. संध्याकाळची वेळ होती आणि पिवळा रंग दिलेली घरे शासनाच्या मालकीची असतील याची जाणीव देत होती. कोणत्यातरी एका योजनेखाली शासनाने कमी उत्पन्न गटातील लोकांसाठी घरे बांधण्याचा निर्णय राबविलेला असावा. अनेक वर्षापासून त्याचा वापर झालेला नाही. खिडक्या, दारे निखळून वसाहतीचे खंडहारामध्ये रुपांतरण झाल्यासारखे दिसले. या देशामध्ये हजारो, लाखो कुटुंबांना डोक्यावर छत नाही. प्लॅस्टीकच्या कोपीमध्ये रस्त्याच्या, रेल्वे लाईनच्या कडेला, नदीकाठी आणि कालव्याच्या कडेला मुलाबाळांसह जीवन कंठत असणाऱ्यांची संख्या अगणित आहे. ही घरे अशा बेघरांना मालकी हक्काने दिली असती तर गरीबांना डोक्यावर हक्काचे छत मिळाले असते, असे सहज वाटून गेले. असे काही करावे आणि या वसाहतीचा वापर व्हावा असा विचार जिल्ह्याच्या प्रशासनाला का आला नाही याबद्दल मनामध्ये हूरहूर लागून राहिली. अशाच प्रकारे अनेक ठिकाणी प्रकल्प बांधकामासाठी निर्माण केलेल्या वसाहती बांधकाम पूर्ण झाल्यानंतर विनावापर पडून राहातात त्याचाही वापर सामाजिक भल्यासाठी केला जावा असा विचार संबंधित शासकीय व्यवस्थेच्या डोक्यात येत नाही ही फार मोठी शोकांतिका आहे. एकिकडे टोकाचे दारिद्र्य आहे आणि गरज आ वासून उभी आहे तर दुसरीकडे सार्वजनिक निधीतून निर्माण केलेल्या वास्तुचा अपव्यय होत आहे आणि त्या वास्तू भग्न अवस्थेत विरुन जात आहेत ही विसंगती दूर होण्याची गरज आहे.

अकोल्याला जळगावमार्गे येण्यासाठी पुणे रेल्वे स्टेशनवर गेलो. रेल्वे स्थानक स्वच्छ ठेवण्यासाठी आणि त्याला आकर्षक स्वरुप देण्यासाठी रेल्वे विभागाकडून बरीच कामे हाती घेण्यात आलेली आहेत. महाराष्ट्र एक्सप्रेस या गाडीने मला जावयाचे होते. दर दहा पंधरा मिनिटाला गाडी येण्याची वेळ पुढे जात असल्याचे डिस्प्ले बोर्डावर दाखविण्यात येत होते. मध्यरात्र झाली. काळा कोट घातलेले बरेच टीसी स्थानकावर फिरत होते. कंटाळा आला आणि म्हणून एका टीसीकडे गाडी येण्यासाठी नेमका किती उशीर होणार आहे, याची चौकशी करण्यासाठी गेलो. डीस्प्ले बोर्डाकडे अंगुली निर्देश करुन तिकडे पाहाण्याची त्याने मला सूचना केली. एकाही शब्दाचा संवाद करण्याची त्याची तयारी दिसली नाही. आधुनिक उपकरणामुळे दोन माणसे जवळ राहून सुध्दा एकमेकाशी कामापुरते पण बोलण्याची तयारी दाखवत नाहीत हेच यातून दिसून येते. माणसे माणसाच्या भावना जाणण्यास अपरी पडत आहेत आणि प्रशासनाला इतरांना होणाऱ्या त्रासाची कदर नाही असेच वाटून जाते.

जळगाव जवळील बेळेगाव या गावाच्या परिसरात सिंचनाच्या पाईपलाईन वितरण व्यवस्थेचे काम पाहण्यासाठी जाण्याचा योग आला. एका दुर्गम भागातील लहानशा पंप हाऊस जवळ सामानाची देखरेख करण्यासाठी एका चौकीदाराची नेमणूक केलेली होती. चौकीदार बाहेरच्या राज्यातील आणि भटक्या जमातीतील असावा. सहजपणे नजर गेली. त्याचा दोन बायकाचा विस्तार, तीन लेकरे व त्यातील एक पंधरा दिवसापूर्वी जन्मलेले दिसले. कोणाच्याही अंगावर कपडा नव्हता. देशातील दारिद्र्याची कल्पना करवत नाही. लोकसंख्येत मात्र



भर पडत आहे आणि कोणालाही याची चिंता नाही.

अकोला शहरामध्ये श्रीनिवास नावाच्या हॉटेलमध्ये भोजनासाठी गेलो होतो. पुरूष व महिलांचे प्रसाधन गृह एकमेकाला लागून होते. दाराला आतून कडी लागत नाही म्हणून हॉटेलमधील सेवकाला सांगितले. दोन महिन्यापासून मालकाला सांगत आहे पण हे लहानसे आवश्यक काम करण्याकडे मालक दुर्लक्ष करत आहे असे उत्तर सेवकाने दिले. मालकाला विनंती करण्यात आली. ही लहानशी दुरुस्ती होईल किंवा नाही याची खात्री देता येत नाही. एका किरकोळ पण आवश्यक बाबीकडे दाखविलेली अनास्था असह्य होत होती. दररोज ग्राहकाच्या जीवावर हजारो, लाखो रुपये कमाई करणाऱ्या हॉटेल मालकाला ग्राहकाला भेडसावणाऱ्या किरकोळ बाबीची कदर वाटत नाही

याबद्दल दु:ख वाटते. ही मनोवृत्ती कधी बदलणार याचे उत्तर आपल्याकडे नाही.

अकोला शहरात एका उच्चभ्रू वसाहतीत मित्राला भेटण्याला जाण्याचा योग आला. महिला रस्त्यावर सडा टाकून रांगोळी घालत होत्या. जवळ जवळ सर्व घरांच्या पुढे हेच घडत होते. सहज विचारणा केली. एका महाराजांचा तो प्रगट दिन होता आणि त्यादिवशी त्या रस्त्याने महाराजांच्या पादुका पालखीतून मिरवणुकीने जाणार होत्या. स्वागत करण्यासाठी म्हणून रस्त्याच्या दोन्ही बाजुकडील महिला आतुरतेने वाट पाहात होत्या. थोड्याच वेळात पादुकांची मिरवणूक त्याठिकाणी पोचली. दर्शन घेण्यासाठी रस्त्यावर गर्दी झाली. मित्राला भेटून गाडी वळवून परत निघालो. तासा दिड तासात रेल्वे गाठावयाची होती. रस्ता पूर्णपणे अडवला गेला. बाहेर कसे पडावे हे सुचेनासे झाले. मिरवणुकीमुळे सार्वजनिक व्यवस्था मोडून काढून जनतेपुढे अडचण निर्माण करणे कितपत बरोबर आहे याचा विचार तथाकथित भक्त जनांना पडत नसावा का? आपल्याच विचारात आणि भावनेत मग्न असलेला हा समाज दुसऱ्याची कदर कशाला करेल? गर्दीचा आणि अंधश्रध्देचा कळस होत आहे.



अकोला रेल्वे स्थानकात गेलो. रेल्वे येण्यासाठी थोडासा अवधी होता. बरोबर असलेल्या स्थानिक अधिकाऱ्याने स्टेशन मास्तरच्या कार्यालयात घेऊन गेले. ओळख करुन दिली. अनेक टीसी येत जात होते. कार्यालयात सहज नजर गेली. मोठ्या फ्रेममध्ये शिर्डीचे साईबाबा आणि शेगावचे गजानन महाराज यांचे फोटो कार्यालयाच्या दर्शनी भागात लावून, हाराने सुशोभित करुन दररोजच्या पूजा अर्चेसाठी तयार ठेवलेलेले दिसले. रेल्वेचे कार्यालय हे केंद्र शासनाच्या अखत्यारित असते. शासनाच्या कार्यालयात विशिष्ट धर्माचा, पंथाचा, विचारांचा प्रसार करणाऱ्या व्यक्तीचे फोटो लावण्यास निर्बंध आहेत, याची पर्वा कोणालाही नाही. शासकीय नियमाचे पालन करणे शासकीय अधिकाऱ्याचे व कर्मचाऱ्याचे कर्तव्य आहे याचा विसर पडलेला दिसतो. असाच काहीसा प्रकार कोयना प्रकल्पाच्या विद्युत गृहात फिरत असताना एका ठिकाणी सहजपणे नजरेस आला. उच्च पदस्थ अधिकाऱ्याने या संबंधाने शासकीय नियमाची जाणीव करुन देण्याची गरज भासते. आपला देवधर्म हा आपल्या बरोबर असतो. सार्वजनिक जीवनात त्याची लुडबूड होता कामा नये. दुर्दैवाने याचे सर्रासपणे उच्चपदस्थाकडूनही उल्लंघन होत आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचा परिसर रेल्वे लाईनला लागून विस्तृत क्षेत्रावर पसरलेला आहे. हजारो हेक्टर सुपीक जमीन विद्यापीठाच्या अखत्यारित आहे. विदर्भातील अकरा जिल्ह्यासाठी काम करणारे हे विद्यापीठ आहे. इमारतीची आणि फर्निचरची रेलचेल आहे. काळाच्या ओघात अनेक कारणामुळे इमारतीची, परिसराची देखभाल, स्वच्छता इ कडे सातत्याने लक्ष ठेवणे विद्यापीठ प्रशासनाला अडचणीचे ठरत असल्याचे जाणवले. प्रशासनाची इच्छा असूनसुध्दा आवाक्याबाहेरील बाबीवर नियंत्रण ठेवणे शक्य होत नाही. राज्यातील आणि देशातील अनेक शिक्षण संस्थेच्या बाबतीत असेच घडत आहे. पुणेस्थित शासन अनुदानित आणि प्रसिध्दी मिळविलेल्या महाविद्यालयाचा परिसर याच अनुभवाची प्रचिती देतो. महाविद्यालयाच्या प्रशासनाची अनास्था यातून दिसून येते. प्रशासकीय व्यवस्थेमध्ये काळानुरूप आवश्यक ते बदल घडून आणण्याची गरज आहे, जेणेकरुन अखत्यारितील परिसर स्वच्छ व निर्मळ ठेवणे सहज शक्य होईल. अलिकडच्या काळात जवळ जवळ सर्वच ठिकाणच्या प्रासादतुल्य विश्रामगृहाची दयनिय अवस्था झालेली दिसून येते. या बाबतीतला चाकोरी बाहेरचा विचार अशा वास्तुंचे उत्पन्नाच्या साधनात रुपांतर करु शकते. काही ठिकाणी हा प्रयोग यशस्वी ठरत आहे. काळाप्रमाणे बदलणे हा यावरील उपाय आहे.

Best

Compliments



# ‘युगार्त’मध्ये ज्योतिबा-सावित्रीबाईंच्या साहित्यिक योगदानाचे प्रतिबिंब

**शरद पवार**

मी अनेक पुस्तकांच्या प्रकाशनाच्या कार्यक्रमास जात असतो. पण, आजचा हा कार्यक्रम आगळावेगळा अशा प्रकारचा आहे. आजचा दिवस महात्मा जोतिबा फुलेंचा स्मरण करण्याचा दिवस! त्यांचे पुण्यातले गंजपेठेतले जे ठिकाण आहे, त्या ठिकाणी महाराष्ट्रातल्या अनेक जिल्ह्यांतून महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्याबद्दल आस्था असणारे लोक उपस्थित होते. एक चांगला कार्यक्रम समता परिषदेतर्फे त्या ठिकाणी झाला. आज महाराष्ट्रातच नव्हे तर, देशातील अनेक राज्यांमध्ये महात्मा जोतिबा फुलेंचे स्मरण ठिकठिकाणी केले जात आहे आणि याच दिवशी ही कादंबरी बाळ लक्ष्मण भारस्कर यांनी लिहिली, त्याचे विमोचन होतेय. कादंबरी ज्यांनी लिहिली ते श्री.भारस्कर, सर्वार्थाने लेखणीचा अधिकार ज्यांचा आहे असे सांगितले जाते, जे वास्तव नाही, पण, सातत्याने सांगितले जाते, अशा चौकटीत न बसणारे हे भारस्कर! आणि अशा चौकटीत न बसणाऱ्या भारस्कर यांनी अतिशय उत्तम प्रकारची कादंबरी लिहून जोतिबा फुले आणि सावित्रीबाई यांचे जीवन एका वेगळ्या पद्धतीने आपल्यापुढे रेखाटले आहे. ही कादंबरी वाचताना असे वाटते, की बहुतेक यांचा काही तरी वेगळा विचार असावा. कादंबरीचा तो विषय नसावा. एखाद्या चित्रपटाची कथा लिहावी, अशा पद्धतीचे लिखाण त्यात केले आहे की काय, या प्रकारची शंका माझ्यासारख्याला येते आणि आत्ताच मला सबनीसांनी सांगितले, मी त्यांना विचारले की, साधारणत: महाराष्ट्रातल्या साहित्यिकांना मी ओळखतो. नगर जिल्ह्याच्या श्रीगोंदा तालुक्यातले भारस्कर या नावाचे एक मंत्री आमच्या काळी




**महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई यांच्या जीवनावर श्री. बाळ लक्ष्मण भारस्कर यांनी लिहिलेल्या 'युगार्त' कादंबरीचे प्रकाशन माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांच्या हस्ते व मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या उपस्थितीत झाले. या समारंभात श्री. पवार यांनी केलेले हे भाषण. बंधुभाव भाईचारा फौंडेशनतर्फे सौ. स्वालेहा एजाज हक यांनी 'युगार्त' ही कादंबरी प्रसिद्ध केली आहे.**

होते. त्याच्याशिवाय दुसरे भारस्कर हे नाव मी कधी ऐकले नव्हते. भारस्कर हे लेखक म्हणून नावही कधी ऐकले नाही. पण, या ठिकाणी भारस्करांचे सगळे लिखाण बघितल्यानंतर मला मनापासूनचे समाधान असे की, त्यांनी ही गोष्ट निर्विवादपणे स्पष्ट केली की, लेखणी हातात धरण्याचा अधिकार माझासुद्धा तितकाच आहे आणि मी दर्जेदार लिखाण करू शकतो.



या कादंबरीची सुरुवात अतिशय गंमतीशीर आहे. पुणे विद्यापीठात शिकणाऱ्या दोन मुली आहेत. एकीचे नाव चैत्राली रानडे आणि दुसरीचे नाव मुक्ता साळवी. या दोघीही उच्च शिक्षण घेण्याचे काम पुणे विद्यापीठात करत असतात. दोघी मैत्रिणी असल्याने गप्पागोष्टी करीत होत्या. एके दिवशी चैत्राली सहजपणे मुक्ताला सांगून जाते, ज्ञान संपादन करण्याची कृपा ही सरस्वतीदेवीने आपल्याला दिली आहे. मुक्ताने ते ऐकले व तिने सांगितले, प्रत्यक्षपणे मुलींच्यासाठी व उपेक्षितांसाठी शिक्षणाचे दरवाजे कोणी खुले केले असतील तर, ते जोतिबा व सावित्रीबाई फुले यांनी! या ठिकाणी मी सरस्वतीचा अनादर करीत नाही. पण, माझ्यादृष्टीने आम्हा सगळ्यांना

हे ज्ञान संपादन करण्याचे दरवाजे खुले करण्याचे काम हे या जोडप्याने केले आहे आणि याच्यातून मला वाटते, या कथेची सुरुवात झालेली आहे. याच्यातून ही कथा बाहेर आलेली आहे. ही कथा, पुस्तक वाचल्यानंतर ही कथा 1960-70 मध्ये असल्यासारखी लिहिली आहे. साधारणत: पुण्याच्या परिसरात जे वाढले, त्यांना ही कथा वाचत असताना, आपल्या दैनंदिन जीवनातल्या आजूबाजूच्या गावांची स्थिती सहजपणाने आठवते. त्याच्यात पुणे आठवते. त्याच्याबरोबर धायरी, हडपसर, मांजरी या भागातले चित्र आपल्या सगळ्यांच्या समोर उभे राहते आणि या कथेची सुरुवातच गंमतीची आहे.

एक रास्तापेठेत राहणारे नरहरपंत नावाच्या गृहस्थांच्या पायाला दगड लागला किंवा कोणीतरी मारला. कदाचित तो उद्देश नसेल. पण, त्यांच्या पायाला तो दगड लागला. त्याचा परिणाम असा झाला की, आजूबाजूच्या लोकांनी शूद्रांच्या वस्तीवर हल्ला केला. त्या घटनेशी शूद्रांचा काही संबंध होता की नव्हता हे काहीही माहिती नव्हते. पण, त्या ठिकाणी त्यांना बळी पडावे लागले.

या कादंबरीत सावित्रीबाईंचे चित्र एका वेगळ्या पद्धतीने मांडले आहे. सातारकडे जाताना पुणे जिल्ह्याची हद्द संपली की, खंडाळा तालुका येतो. त्या खंडाळा तालुक्यात नायगाव नावाचे गाव आहे. त्या नायगावमध्ये खंडू पाटलाची मुलगी सावित्री ही लहानपणापासून अतिशय जिद्दी! त्या 9, 10 वर्षाच्या असतानाची घटना! शेतकऱ्याच्या घरात दावणीला बैलं असतात. एक खोंड उधळले. खोंड उधळल्यानंतर 9 वर्षांच्या सावित्रीने दोरखंड हातात धरले आणि त्या उधळणाऱ्या खोंडाला आवरण्याचे काम केले. या घटनेतून तिच्यातील धाडसाची चुणूक आपणा सगळ्यांना पाहायला मिळाली. लहानपणापासून बहुतेक ती बंडखोर असावी. कारण, त्या वेळच्या ज्या परंपरा होत्या, त्या परंपरांच्या संदर्भात एक प्रकारचा राग तिच्या मनामध्ये तयार झालेला असावा. याची प्रचिती या वाचनातून येते. त्याचे कारण हे आहे, तिला सत्यनारायणाच्या पोथीला हात लावला म्हणून त्रास देण्यात आला. तिला असे वाटले की, बायबलला कोणी हात लावला तर, कोणी त्रास देत नाही. पण, हिंदू धर्म, त्या धर्माचे ग्रंथ हे स्त्रियांना व उपेक्षितांना वर्ज्य आहेत, अशा प्रकारचे वातावरण त्या सगळ्या कालखंडात होते आणि याची किंमत फक्त तिलाच द्यावी लागली असे नाही, जोतिबा फुलेंनासुद्धा ते करावे लागले. लहानपणी त्यांच्या एक सवर्णाच्या लग्नाची वरात आली होती. तेव्हा पंतांच्या मुलाच्या बरोबर ते गेले म्हणून पंतांच्या मुलांनी त्यांना तुम्ही यांच्याबरोबर कसेकाय येता म्हणून अपमानित केले व मिरवणुकीतून बाहेर काढले. म्हणजे, अस्पृश्यता, विषमता, अन्याय याचे चटके जोतिबा फुलेंना व सावित्रीबाईंना आपल्या आयुष्याच्या सुरुवातीला सहन करावे लागले आणि आपले संपूर्ण जीवन त्या विचारांशी संघर्ष करण्यास अर्पित केले. त्याची सर्व पार्श्वभूमी या कादंबरीच्या माध्यमातून दिसते.

जोतिबांना शिक्षणाच्यासंबंधी आस्था होती. शिक्षणासाठी त्यांना धडपड करावी लागली व त्यासाठी त्यांना स्कॉटिश शाळेत घातले. खरे म्हणजे, स्कॉटिश मिशनच्या शाळेत हिंदूंच्या मुलांनी शिकायला जाणे, हे त्या काळी समाजाला पटणारे नव्हते. पण, जोतिबा स्कॉटिश मिशनच्या शाळेत गेले आणि त्यांना साथ कोणी दिली तर, गफूरचाचांनी दिली! एका दृष्टीने ते समाज व्यवस्थेविरुद्ध बंडच होते. पुढे सावित्रीबाईंच्या बरोबर लग्न झाल्यानंतर, सावित्रीबाईंना साक्षर करण्यासाठी त्यांना शाळेत घातले. त्या काळात मुलींना शाळेत घालण्याची कल्पना समाजाला रुचत नव्हती. त्यांनी स्वत:च्या घरापासून साक्षरतेची चळवळ सुरू केली. पुण्यातल्या भिडे वाड्यापासून त्यांनी एका खोलीतून साक्षरतेस सुरुवात केली आणि 'नेटिव्ह वुमेन्स स्कूल' नावाची शाळा त्यांनी 1 जानेवारी 1848 साली सुरू केली. तेथे सावित्रीबाई मुलींना शिकवायला जाऊ लागल्या. सावित्रीबाई शिक्षिका म्हणून मुलींना शिकवायला जात आहेत, हे त्या वेळच्या समाजाला काही पटत नव्हते. त्या शाळेत जात असताना कोणी दगड मारले असतील, कोणी शेणाचा मारा केला असेल. पण, त्या मुळीच डगमगल्या नाहीत आणि आपल्या पतीने जे संस्कार केले, ते संस्कार पुढे नेण्यासाठी त्या खंबीरपणे वाटचाल करत होत्या.

सावित्रीबाई हे जे काही काम करत आहेत, ते त्यांच्या भावकीतही पटत नव्हते. त्यामुळे सावित्रीसह त्यांना घर सोडावे लागले



आणि जेव्हा त्यांना घर सोडावे लागले तेव्हा त्यांना आधार देण्याचे काम हे गफूरचाचा व त्यांच्या पत्नी जोलांनी या मुस्लीम दाम्पत्यांनी केले. जोतिबा फुले एका दृष्टीने हिंदू समाजातील वाईट प्रवृत्ती दूर करण्यासाठी उभे राहतात, स्त्रियांना समतेची वागणूक देतात, त्यांच्या आजूबाजूचे लोक त्यांना वाळीत टाकण्याचा प्रयत्न करतात. अशा वेळेला एक मुस्लीम कुटुंब त्यांच्या पाठिशी उभे राहते, तुम्ही आमच्याबरोबर या. तुम्ही समतेचे काम करीत आहात. तुम्ही करीत असलेले काम योग्य आहे. मला वाटते, आजच्या काळातसुद्धा त्या प्रकारची भूमिका घेणे आवश्यक आहे. ही सबंध कादंबरी बघितल्यानंतर मागचा इतिहास आठवतो.

लहुजी वस्ताद! आत्ताच त्यांच्या संबंधीचा कार्यक्रम झाला. लहुजी वस्ताद यांच्या बाबतीत त्यांचे घराणे, एके काळी शिवाजी महाराजांच्या काळात, त्यांची चाकरी करणारा वस्ताद म्हणून ओळखला जात होता. त्याच घराण्यातील लहुजी 19 व्या शतकात जोतिबांना मदत करण्यासाठी सावित्रीबाईंना सनातन्यांपासून

वाचवण्यासाठी त्यांच्या घराण्यातील नंतरची पिढी पुढे आली. हे चित्र बघण्यासारखे होते.

कधीकधी यातल्या गोष्टी वाचून गंमत वाटते. त्यातील टिळक-आगरकर यांच्याबद्दलचा उल्लेख. ब्रिटिशांच्याविरुद्ध लिखाण केले. ते लिखाण प्रक्षोभक होते. ब्रिटिश कोर्टाने त्यांना राजद्रोहाची शिक्षा केली आणि डोंगरी किल्ल्यात त्यांची रवानगी करण्यात आली. जोतिराव फुलेंना त्यांचे काम बरोबर होते की नाही, यापेक्षा त्यांच्या पाठिशी उभे राहिले पाहिजे असे वाटले. कायदेशीर लढाई लढायची ती आपण लढू. पण, त्यासाठी ते तुरुंगाच्या बाहेर आले पाहिजेत. त्यांना जामिनाची आवश्यकता होती. त्यांना जामीन देण्यास कोणी तयार नव्हते. जोतिरावांनी रामशेट नावाच्या गृहस्थांकडून 10 हजार रुपयांचे कर्ज घेतले व जामीन भरुन टिळक-आगरकरांची सुटका केली. नंतर, टिळकांच्या पेपरमध्ये जामीन देणाऱ्याचे आभार मानण्यात आले. पण, ज्यांनी दहा हजार रुपयांचे कर्ज मिळवून दिले, त्या जोतिरावांच्या नावाचा उल्लेखही करण्यात आला नाही. ही समाजाची मन:स्थिती



का असते हे आपल्याला बघायला मिळते. या कादंबरीत आणखी एक गंमतीचा भाग आलेला आहे. मुंबई ही उद्यमनगरी होती. गिरणी कामगारांची नगरी होती. त्या ठिकाणी कष्ट करणाऱ्या कामगारांची व त्यांना होणाऱ्या यातनांच्या संबंधी संघर्ष करणारी, वेळप्रसंगी झगडणारे असे एक व्यक्तिमत्व होते, त्याचे नाव 'नारायण मेघाजी लोखंडे!' त्या नारायण मेघाजी लोखंडे यांना सर्वतोपरी पाठिंबा देण्याचे काम जोतिबांनी केले. एवढेच नव्हे तर, मला आठवतेय, त्या कालखंडात पंडिता रमाबाई यांच्यासारखी भगिनी आली. समाजाला योग्य दिशेने नेणाऱ्या व त्याच्यातील अपप्रवृत्तींविरुद्ध संघर्ष करणाऱ्या अशा भगिनीच्याही पाठिशी उभे राहण्याचे काम जोतिबांनी केले आहे.

जोतिबांना शेतकऱ्यांबद्दल अतिशय प्रेम होते. त्यांची स्वत:ची पार्श्वभूमी ही शेतकरी कुटुंबातली होती. सावित्रीबाईंची पार्श्वभूमी ही शेतकरी कुटुंबातली होती. त्याच्यामुळे त्यांनी शेतकऱ्यांच्या दुखण्यासंबंधी लिखाणही केले. गुलामगिरी काय, शेतकऱ्यांचा आसूड काय, अशी अनेक पुस्तके त्यांनी लिहिली. जिथे संधी मिळेल, तिथे त्यांनी काम करण्याचा प्रयत्न केला. 1888 साली पुण्याला ब्रिटिश राजकुमार ड्युक ऑफ कॅमर हे हरी रावजी चिपळूणकर यांच्या घरी आले होते. त्यांच्या घरी झालेल्या मेजवानीला जोतिबा फुले यांनाही निमंत्रण होते. त्या ठिकाणी ते शेतकऱ्याचा पोशाख घालून गेले होते. तिथे जाऊन त्यांनी केले काय? त्यांचे जेवणाकडे लक्ष नव्हते. त्यांनी त्या ठिकाणी भारतीय शेतकऱ्यांनी दैनावस्था काय आहे, हे त्या ठिकाणी प्रकर्षाने मांडली. त्याच काळात 'हंटर कमिशन' नावाचे कमिशन नेमले होते. त्याच्यात शूद्रांच्या व स्त्रियांच्या शिक्षणासंबंधीची आवश्यकता व ब्रिटिश सरकारने काय करावे या संबंधीची सविस्तर माहिती देण्यात आली होती. ही कादंबरी बघितल्यानंतर जोतिबा व सावित्रीबाईंचे साहित्यिक योगदान दिसून येते. 1887 चा काळ हा जोतिबांचा अखेरचा काळ होता. त्यांनी त्यांचे मृत्युपत्र तयार करून ठेवले होते. त्यात त्यांनी म्हटले की, आपल्याला लेकुरवाळे कोणी नाही म्हणून ब्राह्मण समाजातला 'यशवंत' नावाचा मुलगा दत्तक घेतला असून मृत्युनंतर कदाचित त्याला वारसा हक्क देणार नाहीत, त्याला त्याचा त्रास होऊ नये म्हणून, त्यांनी ते मृत्युपत्र लिहून ठेवले. आणि 1890 साली आजारपणाने त्यांचा मृत्यू झाला. त्यांची अंत्ययात्रा निघाली. अंत्ययात्रेच्या वेळी यशवंतने शिंकाळे धरावे अशी त्यांची इच्छा होती. मात्र, भावकीने तसे घडू दिले नाही. त्यांना अडवले. शेवटी, सावित्रीबाईंनी काय करावे? सावित्रीबाईंनी स्वत: ते शिंकाळे हातात धरले व पतीच्या चितेला अग्नी देण्याचे काम सावित्रीबाईंनी केले. यावरून सावित्रीबाईंच्या अंगात क्रांतिची धग किती होती हे दिसून येते. या बाबतीतचा सगळा अनुभव त्यांनी या कालखंडात घेतला. प्लेगची साथ त्या काळी पुण्यात आलेली होती. त्या प्लेगच्या साथीत सावित्रीबाई व यशवंत, त्या वेळी तो डॉक्टर यशवंत झाला होता. त्यांनी प्लेगच्या साथीत गुलटेकडी भागात प्लेगच्या रुग्णांसाठी दवाखाना सुरू केला. त्यात सावित्रीबाई रुग्णांची सेवा करीत होत्या. त्यातच त्यांना प्लेगने घेरले व त्यातच त्यांचा मृत्यू झाला. अनेक गोष्टी स्पष्टपणाने या पुस्तकात आलेल्या आहेत. या कादंबरीच्या माध्यमातून भारस्करांनी जोतिबा फुले व सावित्रीबाईंचे उत्तम लिखाण केले आहे. त्याच्यात त्यांनी शेवट गंमतीचा केला आहे. सुरुवात कशी केली? पुणे विद्यापीठात चैत्राली रानडे व मुक्ता साळवी या दोन मैत्रिणी गप्पा मारत आहेत व शेवटी, या दोघींच्या डोळ्यांत अश्रू येतात. त्या सहज पाठिमागे वळून बघतात तर, पुणे विद्यापीठाला सावित्रीबाईंचे नाव दिलेले असते. या सगळ्या गोष्टी 'युगार्त'च्या माध्यमातून भारस्करांनी चांगल्या रीतीने मांडल्या आहेत. मी सबनीसांना विचारले, मी सगळ्या लेखकांना ओळखतो. पण, भारस्कर हे नाव कधी ऐकले नव्हते. तुम्ही अतिशय दर्जेदार लिखाण केल्याबद्दल मी तुमचे अभिनंदन करतो. या सगळ्या कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मला दिल्याबद्दल मी श्रीपाल सबनीस यांचे आभार मानतो. घाटे यांचेही अभिनंदन करतो. मला मोठी गंमत वाटली. विषय सावित्री-जोतिबांचा, लिहिणारा भारस्कर, आग्रह करणारे श्रीपाल सबनीस व पुस्तक प्रकाशित करणारे हे दोन. हे कसे काय जुळवून आणले हे कळत नाही. अनेक मोठ्या कार्यक्रमाला जाण्याची संधी मिळते. पण, अशा कार्यक्रमास जाण्याचा आनंद हा काही वेगळाच असतो.

# कलेशी प्रामाणिक अवलिया

ही गोष्ट आहे, जागतिक किर्तीचे चित्रपट दिग्दर्शक सत्यजित रे यांची. आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे नाव सगळ्यात प्रथम दिमाखाने मिरवले गेले ते सत्यजित रे यांच्या पथेर पांचाली या चित्रपटामुळे. सत्यजित रे यांनी चित्रपटाच्या सर्व अंगावर आपले

संस्कार केले होते. ते उत्तम साहित्यिक होते व उत्तम संगीतकरही होते. त्यांच्या चित्रपटांना भरपूर मानसन्मान मिळाले तरी शेवटपर्यंत त्यामधून त्यांना फारशी अर्थप्राप्ती करता आलेली



नव्हती. शेवटपर्यंत ते कलकत्त्याला भाडयाच्या घरातच राहिले. स्वत:चे घर घेण्याइतकी सुद्धा त्यांची परिस्थिती नव्हती. साधारणपणे १९८८ सालातली ही एक घटना आहे. त्यावेळी सत्यजित रे यांच वय होतं ६७ वर्षे आणि त्यांच्या पत्नी विजया ह्या होत्या ७० वर्षांच्या. त्यांच्याकडे वेगवेगळ्या क्षेत्रातली मंडळी घरी भेटायला येत असत. पण आज त्यांच्याकडे काही विशेष माणसं आली होती. ती माणसं होती एका प्रख्यात जाहिरात एजन्सीची आणि त्यांनी सत्यजित रे यांच्यासमोर प्रस्ताव ठेवला की त्यांना एका चहाच्या ब्रँडसाठी जाहिरात करण्याचे काम मिळाले आहे आणि त्या जाहिरातीमध्ये एजन्सीवाल्यांना रे पती-पत्नीला हातात चहाचे प्याले घेऊन त्यांचे चित्र वापरायचे होते. त्यासाठी ते लाखो रुपयांचा मोबदला देण्यास तयार होते. हे ऐकून सत्यजित रे यांच्या मनात आल की आपल्याला आजपर्यंत चित्रपट बनवून जे पैसे मिळाले नाहीत ते केवळ एका जाहिरातीमध्ये मिळणार आहेत. ते सहज पत्नीला म्हणाले की इतकी वर्षे कॅमेरा मागे घालवली पण कॅमेरासमोर उभे राहण्याचा माझा पहिलाच प्रसंग असेल. पत्नीने सांगितल खरतर आपले वय झाले आहे, आपण यापूर्वीच तजवीज करायला हवी होती, यानिमित्ताने ती होत असेल तर काय हरकत आहे? स्वत: सत्यजित रे यांना हे तितकसं पटत नव्हत. त्यांनी ठरवल की आपण यासंदर्भात आपला तरुण मुलगा संदीपचाही सल्ला घेऊ. त्याने तर यासंदर्भात चक्क नापसंतीच व्यक्त केली. तो म्हणाला जगभरात चित्रपटक्षेत्रात सर्वोच्च स्थान मिळालेले तुम्ही, केवळ पैशासाठी जाहिरातीत काम करीत आहात हे अजिबात न पटणार आहे. शेवटी हो - नाही, हो - नाही करता करता दोघांनीही जाहिरातीत मॉडेल म्हणून काम करण्याकरिता संमती दर्शविली. ठरल्याप्रमाणे हे शुटींग दार्जिलींग येथे करायचे होते.

त्याप्रमाणे त्यांची उत्तम बडदास्त ठेऊन शुटींगची तयारी पूर्ण झाली. पण सत्यजित रे यांच्यातला मनस्वी कलावंत अचानक पुन्हा बाहेर आला आणि त्याक्षणी त्यांनी जाहिरात न करण्याचे एजन्सीला सांगून टाकले. आपल्या कलेशी प्रामाणिक राहून



कोणतीही तडजोड न करणारा सत्यजित रे यांच्यासारखा एखादाच अवलीया असतो. नाहीतर आजकाल भरपूर पैसे मिळत असताना देखील त्यापेक्षा अधिक पैसे मिळविण्यासाठी बॉलीवुड मधील बिग बी पासून ते चिल्लर नटनटयांची रांगच लागलेली असते. मग चंपी तेल मालिश पासून अगदी संडास कसा साफ करायचा याची जाहिरात करायला हे तथाकथित कलाकार तयार असतात आणि मग पैसेच मिळतायत म्हणून अनिवासी भारतीय कलाकारसुद्धा थेट देशाच्या पंतप्रधानांची मुलाखत घेतो व देशात स्वत: मतदारही नसतो. एवढा विरोधाभास आपल्या देशाइतका बाहेर कुठे असेल का असाच प्रश्न पडतो.

## शेवटचे पान

